सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४० वे अंक ३४५ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# प्रकृती बिघडल्याने उद्धव ठाकरे रुग्णालयात दाखल

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१४ ऑक्टोबर:**

विधानसभा निवडणुकीसाठी येत्या काही दिवसात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असल्याने सर्वच राजकीय पक्षांची धावपळ असताना शिवसेना उध्दव ठाकरे गटाची चिंता वाढवणारी घटना घडली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची तब्येत बिघडल्याने त्यांना सोमवारी सकाळी रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आले.



त्यांच्या विविध तपासण्या करण्यात येत असून त्यांची अंन्जिओप्लास्टी केली जाईल. धमन्यांमधील ब्लॉकेज तपासण्यासाठी त्यांच्या चाचण्या केल्या जात असल्याचे सांगण्यात आले. उद्धव ठाकरे यांनी दसरा या दिवशी शिवाजी पार्कवर दमदार भाषण करून विधानसभा निवडणुकीचे रणसिंग फुंकले होते.त्यानंतर रविवारी महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या सह हॉटेल ताजदंड येथे पत्रकार परिषद घेत महायुतीच्या भ्रष्ट कारभाराबाबत पत्रिका प्रसिद्ध केली होती. त्याशिवाय ते राज्यातील विविध भागातील पदाधिकाऱ्यांशी भेट देत निवडणुकीची व्यूहरचना रचना बनवीत आहेत .त्यांच्या व्यस्त कार्यक्रमामुळे प्रकृतीवर परिणाम होत असल्याचे त्यांचा निकटवर्ती कडून सांगण्यात आले.

त्यांना आज बरे वाटत नसल्यामुळे रुग्णालयात नेण्यात आले. त्यांच्यासमवेत पत्नी रश्मी ठाकरे व आमदार मिलिंद नार्वेकर व अन्य पदाधिकारीही उपस्थित होते . उद्धव ठाकरे त्यांची अँजिओप्लास्टी देखील झाली आहे. अँजियोग्राफीमद्वारे हार्ट ब्लॉकेज तपासता येतात. अँजिओग्राफीत हार्ट ब्लॉकेज आढळले तर त्यांच्यावर पुन्हा एकदा अँजिओप्लास्टी व इतर उपचार केले जाऊ शकतात. तीन वर्षांपूर्वी मानेच्या दुखण्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मानेच्या दुखण्यावरील उपचारासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर १२ नोव्हेंबर २०२१ रोजी एचएन रिलायन्स रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यांच्यावर सर्व्हायकल स्पाईन संबंधित शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

# हिंदुत्व टिकले तर संविधान टिकेल : तोरसेकर

## ● विद्वेषमुक्त महाराष्ट्रासाठी १०० टक्के मतदानाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १४ ऑक्टोबर-**

देशात हिंदुत्व जिवंत ठेवायचे असेल, तर रामायणातल्या खारी प्रमाणे आपली भूमिका निश्चित करा आणि येणाऱ्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत १०० टक्के मतदान घडवून आणा, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी आज येथे केले.

केशव माधव प्रतिष्ठान तर्फे आयोजित केलेल्या ''सजग रहो - विद्वेष मुक्त महाराष्ट्रासाठी आणि देशहितासाठी मतदान'' ह्या विषयावर एस एन डी टी विद्यापीठातील तारापोर सभागृहात श्री तोरसेकर बोलत होते.

व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संभाजी भागाचे संघचालक अनिल व्यास, तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त राजीव बेंद्रे आणि योगेश कुलकर्णी उपस्थित होते. व्याख्यानास मोठ्या संख्येने श्रोतृवर्ग होता.



श्री तोरसेकर म्हणाले: ''समाजातील एक घटक ठरवून एक-गठ्ठा एका बाजूने मतदान करतो. आपण केवळ असंच म्हणतो पण त्यावर कृती करत नाही. आपण केवळ १०० टक्के मतदान करून उपयोग नाही, तर ते मतदान योग्य ठिकाणी, योग्य उमेदवार निवडण्याकरीता करावे.'' रामायणातील उदाहरण देत ते म्हणाले: ''सेतू बांधताना खारीने हा विचार नाही केला मी न केल्याने ते काम होणार नाही. त्याच प्रकारे आपण येत्या निवडणुकीत खारीचा वाटा बनून जबाबदारीने काम केले. स्वतःचे मत देऊन काम संपलं असं नाही, तर माझ्या भूमिकेने इतरांना मतदान करायला बाहेर काढणार, घेऊन जाणार, एवढा तरी आपण करू शकतो. आपलं मत सेक्युर झाल्यावर इतरांना मदत करा. नागरिक म्हणून आपली जबाबदारी ''


भाऊ तोरसेकर पुढे म्हणाले, हिंदुत्व किंवा हिंदू असणे म्हणजेच सेक्युलारिस्म आहे. ''जगात कुठल्या इस्लामी राष्ट्रांमध्ये मुस्लिम भारतापेक्षा सुखी आणि सुरक्षित आहे? मुस्लिम भारतात हिंदूंमुळेच सुरक्षित आहेत. आणि हिंदुत्व टिकले तर संविधान टिकेल.'' सतत होणाऱ्या खोट्या विमर्शच्या बाबतीत भाऊ तोरसेकर म्हणाले की सातत्याने संविधान खतरे में है लोकशाही वाचवली पाहिजे अशा प्रकारची विधाने केली जातात आणि लोकांची दिशाभूल केली जाते. त्यांना वेळीच रोखलं पाहिजे. ''कुठलीही संस्कृती, समाज हे अभिमानावर टिकते. कुठलाही राष्ट्र हे अभिमानावर उभं राहतं. तुम्हाला जर कशाचाच अभिमान वाटत नसेल तर तुम्ही डिफेन्ड काय करणार? हरियाणाच्या ताज्या निवडणुकांवर भाष्य करताना श्री तोरसेकर म्हणाले की विश्लेषक एक्झिट पोलचे योग्य प्रकारे संकलन करण्यात आणि वाचण्यात अयशस्वी ठरले. ''२०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत त्यांनी वाढलेल्या मतदान पद्धतीचा विचार केला नाही. तीन टक्के वाढ हेच एक सूचक होते. अंदाज आणि निकाल चुकल्यानंतर ब्लेम गेम सुरू झाला. नेहमी प्रमाणे ईव्हीएम वर खापर फोडण्यात आले.'' मुस्लिम समाज एक गठ्ठा मतदान विषयी ते म्हणाले: ''त्यांच्यासाठी त्यांची धार्मिक श्रद्धा महत्त्वाची आहे. ते नेहमी सतर्क असतात. ते एकत्र आहेत. आपण फक्त जिहाद या एका शब्दाचा विचार करतो.''

''पाकिस्तानचे ब्रिगेडियर एस. के. मलिक यांनी त्यांच्या ''युद्धाची कुराण संकल्पना'' या पुस्तकात आधुनिक जिहादचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात - एखाद्याला मारणे, जमीन बळकावणे, बॉम्ब फोडायचे इत्यादी जिहाद नसून ती जिहादची साधने आहेत. वास्तविक जिहाद म्हणजे इतर समाजाची इच्छाशक्ती मारून टाकणे. एकदा इच्छा शक्ती नष्ट झाली कि सगळ्या गोष्टी बळकावण्यास मार्ग मोकळा होतो, कारण तुमचं सगळ्या बाजूने खच्चीकरण झालेलं असतं.''

# विहिरीत बुडून बाळगीच्या माजी सरपंचाचा पत्नीसह मृत्यू

- **कपडे धुताना विहिरीत पडलेल्या पत्नीला वाचवायला गेले**
- **पत्नीने मिठी मारली अन् दोघेही बुडाले**





**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १४ ऑक्टोबर-**

पत्नी विहिरीत कपडे धुत असताना विहिरीतील पाण्यात पडली. तिला वाचवायला जाऊन पत्नीसह पती दोघेही पाण्यात बुडून मरण पावले. ही घटना बाळगी येथे सोमवारी सकाळी घडली.

पतीचे नाव संगप्पा चंदप्पा कोळी (वय ३८) असून ते बाळगीचे माजी सरपंच होते. सावित्री संगप्पा कोळी (वय ३१) असे मरण पावलेल्या पत्नीचे नाव आहे. संगप्पा कोळी हे शेतात द्राक्षांना औषधफवारणी करीत होते. यावेळी पत्नी सावित्री घरातील कपडे धुण्यासाठी शेतातील विहीरीत गेल्या होत्या. कपडे धुत असताना अचानक तोल जाऊन पाण्यात पडल्या. यावेळी जवळच द्राक्षाला औषधफवारणी करणाऱ्या संगप्पा कोळी यांना विहिरीतून आरडाओरडा ऐकू आल्याने ते विहिरीकडे गेले. त्यांना पत्नी पाण्यात पडल्याचे दिसले. त्यांनी क्षणाचाही विचार न करता पत्नीला वाचविण्यासाठी विहिरीत उडीही मारली. दरम्यान, पत्नीने त्यांना घट्ट मिट्टी मारली. यामुळे दोघेही पाण्यात बुडले. त्यांचा मृत्यू झाला. बुडताना दोघांनी आरडाओरडा गेला. हा आवाज जवळच असणाऱ्या संगप्पांच्या आईला येताच त्यांच्यासह इतर माणसे विहिरीकडे धाव घेतली. मात्र तोपर्यंत पती-पत्नी दोघे पाण्यात बुडाले होते. त्यांचा मृत्यूही झाला होता. गावातील तरूणांच्या सहाय्याने दोन्ही मृतदेह बाहेर काढून मंद्रुप ग्रामीण रूग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. बाळगी येथे दोघांवर अंतिमसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, आई, वडील व भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# महाराष्ट्राचा हरियाणा होऊ देऊ नका

## काँग्रेस हायकमांडची राज्यातील नेत्यांना तंबी

**तभा वृत्तसेवा/ जमीर काझी**
**मुंबई, दि.१४ ऑक्टोबर-**

हरियाणा विधानसभा निवडणुकीतील अनपेक्षित पराभवामुळे काँग्रेस हायकमांड कमालीचे सतर्क बनले आहे. त्याठिकाणचा फाजील आत्मविश्वास महाराष्ट्रात न दाखविता ग्राउंड लेव्हलवर जाऊन काम करण्याची सूचना त्यांनी राज्यातील प्रमुख नेत्यांना केली आहे.



काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या दिल्लीतील निवासस्थानी सोमवारी महाराष्ट्रातील काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक घेतली.यावेळी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खरगे, सी.वेणुगोपाल यांनी त्यांना निवडणुकीला सामोरे जाताना घ्यावयाच्या खबरदारीबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्राचे प्रभारी रमेश वेनिथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार,मुंबईच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड आदी नेते उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राप्रमाणे हरियाणातही काँग्रेसला चांगले यश मिळाले होते.मात्र नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत अनपेक्षित पराभवाला सामोरे जावे लागले.त्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीतून निवडणूक लढविताना योग्य खबरदारी घेण्याची सूचना हायकमांडने केली. सूत्रांनी दिलेल्या महितीनुसार काँग्रेस नेतृत्वानं हरियणातील पराभवाचा उल्लेख करत महाराष्ट्रातील नेत्यांना कोणत्याही प्रकारची गटबाजी सहन केली जाणार नाही. महाराष्ट्राचा हरियाणा होऊ द्यायचा नाही, अशा सूचना केंद्रीय नेतृत्वाने दिल्या. त्यामध्ये प्रामुख्याने मराठा-ओबीसी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेतृत्व अलर्ट मोडवर आहे. या दोनी समाजात सलोखा निर्माण रहावा , मुख्यमंत्रीपदाचा उमेदवाप कोण होणार? या वादात पडू नका, काँग्रेसचं केंद्रीय नेतृत्त्व ते निश्चित करेल. या विषयावर पक्षात आणि पक्षाच्या बाहेर कोणतीही टबाजी करु नये, महाविकास आघाडीमध्ये वाद असलेल्या कोणत्याही जागांवर जाहीरपणे चर्चा करु नये. तसेच ज्या जागांवर आघाडीमध्ये वाद आहे. उद्धव ठाकरे किंवा शरद पवार यांचा पक्ष त्यावर दावा करतोय त्याचा निर्णय केंद्रीय नेतृत्त्व करेल. या जागांवर कोणत्याही परिस्थितीमध्ये आघाडीमध्ये वाद निर्माण करु नका. ,राज्यातील नेत्यांना जाहीरनाम्यावर कोणतीही चर्चा करु नका, जास्तीजास्त लोकांच्या संपर्कात राहा. त्यांची कामं करा. काँग्रेसनं केलेल्या कामांचं मतदारांना स्मरण करुन द्या. फक्त सत्तारुढ पक्षांच्या टीकेवर अवलंबून न राहता अतिआत्मविश्वाचे बळी पडू नका, अशा सूचना केल्या आहेत.

# विविध क्षेत्रांतील दिग्गज सुशीलरत्न पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा गांधी फोरम यांनी आयोजित केलेल्या माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त फडकुले सभागृह येथे सुशीलरत्न पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगमेश्वर कॉलेजचे माजी प्राचार्य नरेंद्र बदनोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवाग्राम वर्धा महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. सोमनाथ रोडे सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष अँड. नंदकुमार पवार, माजी प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार होते. व्यासपीठावर मल्लिकार्जुन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रविकांत पाटील, चपळगाव, एस. एस. शेळके प्रसाराचे अध्यक्ष मल्लिनाथ शेळके वागदरी महात्मा गांधी ग्लोबल विलेजचे संस्थापक उमाकांत चनशेट्टी, जिल्हा काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुरेश हसापुरे, माजी महापौर सुशीला आबुटे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक संयोजक जिल्हा गांधी फोरमचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले. याप्रसंगी माजी महापौर प्रा. सुशीला आबुटे, प्रा. भीमाशंकर बिराजदार यांनी विचार व्यक्त केले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना सुशीलरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्हे, सन्मानपत्र, शाल, हार, फेटा, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. आभार राजश्री तडकासे यांनी केले. सूत्रसंचालन श्रीदेवी येळमेली यांनी केले.

### हे आहेत पुरस्कारांचे मानकरी

रविकांत पाटील (अध्यक्ष मल्लिकार्जुन शिक्षण प्रसारक मंडळ चपळगाव ता. अक्कलकोट, एम.डी. भीमा पाटस सहकारी साखर कारखाना पाटस), मल्लिनाथ शेळके (एस. एस. शेळके प्रशाला, वागदरी,ता.अक्कलकोट), आशुतोष शहा (जैन गुरुकुल प्रशाला), नीता येरमाळकर (सरस्वती कन्या प्रशाला), तिपण्णा कोळी (साईबाबा प्रशाला), माजी प्राचार्य मल्लेशी बिडवे (बसवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रश्नाला निम्बर्गी. ता. द.सोलापूर), गुरुपादप्पा तुप्पद (माजी प्राचार्य कोनापुरे हायस्कूल, आहेरवाडी ता. दक्षिण सोलापूर), देवेंद्र औटी (आदर्श कवी), लक्ष्मण नागणे (दामाजी हायस्कूल, मंगळवेढा), कविता पुजारी (अण्णासाहेब पाटील प्राथमिक शाळा), अर्चना जाधव (राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला, अक्कलकोट) नगमा शेख, (फरकंदा उर्दू प्राथमिक शाळा), नीता तमशेट्टी (सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम हायस्कूल), स्नेहल कुलकर्णी (सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम प्राथमिक शाळा) सुनील पवार (ग्रामीण विद्या विकास ज्युनिअर कॉलेज तालुका अक्कलकोट).

# उच्च न्यायालयाच्या खंडपीठांमध्ये ३० नोव्हेंबरला विशेष लोकअदालत

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद व नागपूर खंडपीठ येथे दि. ३० नोव्हेंबर २०२४ व १ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या विशेष लोक अदालतमध्ये उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर खंडपीठ येथे प्रलंबित असलेली प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत.

सोलापूर जिल्हयातील ज्या पक्षकारांची प्रकरणे उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर खंडपीठ येथे प्रलंबित असल्यास व ती तडजोडीनी मिटावित अशी ज्यांची इच्छा असेल ती प्रकरणे विशेष लोक अदालतीमध्ये ठेवता येऊ शकतात. विशेष लोक अदालत मध्ये पक्षकार प्रत्यक्ष व आभासी पद्धतीने सहभागी होऊ शकतात. सोलापूर शहर व जिल्हयातील प्रकरणे उच्च न्यायालयाच्या विशेष लोक अदालतीमध्ये ठेवण्यासाठी पक्षकारांनी सबंधित वकीलांना कल्पना दयावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, विधी सेवा समिती यांचेकडे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश मो. सलमान आझमी यांनी केलेले आहे.

# सिद्दीकी पिता-पुत्रांना संपवण्याची होती सुपारी

## रवी बिश्नोई गँगचे कृत्य असल्याचे स्पष्ट

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१४ ऑक्टोबर:**

माजी राज्यमंत्री बाबा सिद्दीकी यांची हत्या लॉरेन्स बिश्नोई टोळीने केल्याचे आता स्पष्ट झाले आहे केस नव्हे तर बाबा सिद्दिकी बरोबरच त्यांचे उत्तर आमदार दिशांत सिद्दिकी यांनाही ठोकण्याचे सूचना मारेकऱ्यांना देण्यात आल्या होत्या मुंबई पोलिसांनी हत्याप्रकरणी अटक केलेल्या आरोपी कडील तपासातून ही महत्त्वपूर्ण माहिती आली आहे.

यानंतर पोलिसांनी आमदार सिद्ध की यांच्या निवासस्थानी पोलीस बंदोबस्तात वाढ केली आहे शनिवारी रात्री वांद्रे तील खेरवाडी येथे बाबा सिद्धी कि यांच्यावर सहा गोळ्या झाडण्यात आल्या त्यामध्ये जागीच मृत्यू झाला असून या हत्याकांडाने देशभरात खळबळ उडाली सिद्धी यांचे राजकारणासह बॉलीवूडमध्येही कनिष्ठ संबंध असल्याने या घटनेने बॉलीवूड हीहा धरून गेले आहे याप्रकरणी आतापर्यंत अटक केलेल्या तिघा जणांना २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी मिळाली असून हत्येची जबाबदारी सोशल पोस्टद्वारे स्वीकारणाऱ्या लॉरेन्स बिश्नोई यांच्या सदस्य शुभम लोणकर मात्र फरार आहे त्याचा भाऊ प्रवीण लोणकर याला रविवारी रात्री मुंबई पोलिसांनी पुण्यातून अटक केली आज त्याला न्यायालयात हजर केले असता २१ ऑक्टोंबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आले. त्यापूर्वी अटक केलेल्या हरियाणाच्या गुरमेल बलजीत सिंग आणि उत्तर प्रदेशच्या धर्मराज कश्यपला इतकीच कोठडी मिळाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरानी दिलेल्या माहितीनुसार झिशान सिद्दीकी हे देखील बिश्नोई टोळीचे लक्ष्य होते.दोघांनाही एकत्र मारण्याची संधी मिळाली नाही तर जो समोर दिसेल, त्याला मारावे असे आदेश देण्यात आले होते.

### सिद्दीकीच्या मारेकऱ्यांना फासावर लटकवणार : मुख्यमंत्री

बाबा सिद्दिकी यांची हत्या व राज्यातील वाढते गुन्हेगारी बाबत विरोधकांकडून राज्य सरकारवर चौफेर टीका होत आहे त्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी प्रतिक्रिया देताना म्हणाले की विरोधकांनी राजकारण करण्याचे सोडून द्यावे ,बाबा सिद्दिकी यांच्या हत्येतील आरोपींना पकडण्यात यश आले असून मुख्य सूत्रधार नाही अटक केली जाईल, आरोपींना फासावर लटकवण्यात येईल.

दरम्यान, गुरमेल हा गुन्हेगारी रेकॉर्ड असलेला आरोपी आहे. तिसरा आरोपी शिवानंद कुमार हा घटनास्थळावरुन पसार झाला आहे. त्याचा तपास करत आहेत. तो पनवेलच्या आसपास दिसून आला होता. मात्र, अद्याप त्याला अटक करण्यात आलेली नाही. त्याला पकडण्यासाठी हरियाणा, उत्तर प्रदेश आणि दिल्लीत अनेक ठिकाणी पोलीस पथके तैनात करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा तपास मुंबई पोलिस करत आहेत.

बाबा सिद्दीकी आणि झिशान सिद्दीकी एकत्र असल्याची माहिती आरोपींना होती. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, हे तिन्ही आरोपी कुर्ला येथून दररोज वांद्रे येथे जात होते. ते कुर्ला इथं भाड्याने रुम करुन राहत होते. हे सर्व आरोपी ऑटो रिक्षाचा वापर करत होते. आरोपी बाबा सिद्दीकी आणि त्यांच्या मुलाशी संबंधित ठिकाणे, त्यांचे घर, कार्यालय आणि कार्यक्रमांवर पाळत ठेवत होते. गोळीबार करणाऱ्यांना झीशानलाही लक्ष्य करण्याचे आदेश मिळाल्याचा संशय पोलिसांना आहे. ज्या दिवशी ही घटना घडली त्या दिवशी बाबा सिद्दीकी आणि त्यांचा मुलगा झिशान सिद्दीकी दोघेही एकाच ठिकाणी होते. याबाबतची माहिती आरोपींना देण्यात आली होती.

# दिली तुतारी तर घेऊ... नाहीतर १९९५ ची छत्रीच धरु

## आ. बबनराव शिंदे; चव्हाणवाडी येथे विविध विकासकामांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १४ ऑक्टोबर-**

शरद पवार साहेबांबरोबर मी ३८ वर्षे झालं काम करत आहे. काही कारणास्तव मला बाहेर जावा लागलं. परंतु कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर आपण पुन्हा पवार साहेबांकडे रणजीतभैय्या शिंदे यांना तुतारी द्या म्हणून मागणी केली आहे. आपण पवार साहेबांबरोबर प्रामाणिकपणे काम करून माढा तालुक्याचा विकास केला आहे. आजही पवार साहेबांनी आपल्याला तुतारी दिली तर आपण लढवणार आहे. परंतु नाही मिळाली तर १९९५ ची पुनरावृत्ती म्हणून पुन्हा छत्री उघडणार आहे. आपण सगळ्यांनी रणजीतभैय्या शिंदे यांच्या पाठीशी उभे राहावे, असे माढा तालुक्याचे आ. बबनराव शिंदे यांनी चव्हाणवाडी येथे गाव भेट व विकासकामांच्या उद्घाटनादरम्यान ते बोलत होते.



चव्हाणवाडी टें (ता. माढा) येथील गावभेटीदरम्यान राजमुद्रा कट्टा ते बागल वस्ती रस्ता मजबुतीकरण करणे, चव्हाणवाडी (टें) ते वेणेगाव कॅनॉलपट्टी ते सिद्धेश्वर मारुती सलगर कॅनलपट्टी रस्ता मुरमीकरण करणे या कामांचे भूमिपूजन माढा विधानसभा मतदारसंघाचे आ. बबनराव शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी चव्हाणवाडी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी माजी उपसभापती तुकाराम ढवळे यांनी सांगितले की, भूलभुलैय्या करणाऱ्या आमदारकीची स्वप्ने पाहणाऱ्या संस्कृती कार्यक्रम घेऊन कुठे आमदार होतात का? त्याला विकासकामे दादांसारखी करावी लागतात. आमच्या भैय्यावर अजून वाळू माफियाचा शिका नाही, तडीपारचा शिका नाही, असे असताना माढा तालुक्यातील जनता रणजीतसिंहभैय्या शिंदे यांच्या पाठीशी उभे राहील, याची मला खात्री आहे. या चव्हाणवाडीमुळे रणजीतभैय्या शिंदे पंचायत समितीला निवडून आले होते. त्यामुळे चव्हाणवाडीकर नक्कीच चांगल्या पद्धतीने मतदान करतील असा मला विश्वास आहे. यावेळी विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक अशोक मिस्किन, चव्हाणवाडी तंटामुक्तीचे अध्यक्ष अरुण चव्हाण, चव्हाणवाडी विकास सेवा सोसायटीचे चेअरमन कैलास चव्हाण, राष्ट्रवादीचे माढा तालुका उपाध्यक्ष हनुमंत चव्हाण, चव्हाणवाडी विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन नरहरी नांगरे, चव्हाणवाडीचे सरपंच नवनाथ शिंदे, उपसरपंच अर्जुन सलगर, माजी सरपंच नानासाहेब काझी, सोसायटीचे व्हाईस चेअरमन अंकुश सलगर, माजी सरपंच संतोष जाधव, अ‍ॅड. सचिन चव्हाण, संजय मिस्कीन, सुनील मिस्कीन, सौदागर नांगरे, सुभाष चव्हाण, शरीफ काझी, बाळासाहेब मोटे, भाऊसाहेब सलगर, महावीर नांगरे, गोरख नांगरे, जयसिंग खडके,राजेंद्र खडके, ईश्वर तळेकर, भाऊसाहेब इंदलकर, सोमनाथ खडके, अनिल चव्हाण, राहुल पाटील, संग्राम चव्हाण यांच्यासह युवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लेखणीचा जादूगार श्रीकांत अणदूरकर

श्रीकांत अणदूरकर यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्त त्यांच्याबद्दल काही गोष्टी व्यक्त कराव्या वाटल्या. माणूस जन्माला येतो. पण येताना काहीतरी वेगळं घेऊन येतो इतरापेक्षा. अजय उर्फ श्रीकांत अगदी तसाच आहे. त्यांनी आपल्या जीवनामध्ये अनेक अडचणींना तोंड देत, संघर्ष करत पंचक्रोशीत स्वतःच्या कर्तुत्वाने एक वेगळा प्रकारचा ठसा उमटवला आहे. अशा या लेखणीच्या जादूगाराला कोटी कोटी शुभेच्छा.

शालेय व महाविद्यालयीन जीवनात त्यांच्याकडे परोपकाराचे गुण पहावयास मिळतात. वंदनीय आई, वडील, बहीण व मित्र परिवारांच्या सानिध्यात राहून त्यांनी बऱ्याच गोष्टी आत्मसात केले आहेत. वैद्यकीय, पत्रकारिता, समाज मनाशी अलीकडच्या काळात राजकारणाशी त्यांची नाळ घट्टपणे जोडलेली आहे.

नावातच जय असल्याने पाठीमागे वळून कधी पाहिलेच नाही डॉक्टर जितेंद्र कानडे, दीपक दादा आलुरे, सुनील चव्हाण, मधुकरअण्णा बंदपट्टे अशी अनेक नावे भरगच्च मित्रपरिवार. क्षेत्र कोणतेही असो त्यात नाव मात्र अजयचाच. हे समीकरण पहावयास मिळते. कर्म करीत रहा, फळाची अपेक्षा नको हे ब्रीद घेऊन वाटचाल करणारा सर्वांच्या सुख-दुःखात स्वतःला झोकून देऊन निर्मळ मनाने काम करणारा अजय... अजयच आहे म्हटल्यास अतिशोक्ती ठरणार नाही.खरे तर माझे संबंध विश्व हिंदू परिषदेचे संघटन मंत्री स्वर्गीय भुजंगरावजी घुगे यांच्यामुळे १९८७ काळात झाले. विघ्नहर्ता प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी व स्वदेशी चळवळ मोठ्या प्रमाणात राबवली. तसेच छोट्या उद्योगासाठी आर्थिक पाठबळ हे त्याकाळी अनेकांना झाली, हेही सर्वश्रुतच आहे. जे काही करायचं ते फक्त चांगल्यासाठीच हा पिंड मात्र प्रत्येकाला आशेचा वाटतो. समाजातील वंचित घटकांसाठी नेहमीच सहकार्याची भावना ठेवून शक्य तितके देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असतो. ८ फार्मा ग्रुप, जय मल्हार पत्रकार संघ, खडकाळी ग्रुप व स्वर्गीय दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्था या माध्यमातून जिल्ह्यात आदर्शवत उपक्रम राबवून एक सामाजिक संदेशचा हातखंडा मात्र अलौकिक आहे. खरंतर अजय हा वैद्यकीय क्षेत्राशी निगडित असला तरी समाजातील प्रत्येक घटकाशी नाळ मात्र पक्की आहे. हे मात्र विसरता येणार नाही. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम गेली अनेक वर्षापासून ८ फार्मा ग्रुपची फळी काम करताना दिसते. प्रश्न अनेक उत्तर मात्र एक हे गणित मात्र पंचक्रोशीत पहावयास मिळते याचाही आम्हा मित्र परिवारांना अभिमान आहे.



**- चंद्रकांत हगलगुंडे,**
जय मल्हार पत्रकार संघ, अणदूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

प्रारंभ : १९१९

सोलापूर | मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४


## महत्त्वाचे

### ५९२ अंकांनी उसळला निर्देशांक

**मुंबई** : जागतिक बाजारांतील सकारात्मक संकेतांमुळे आयटी आणि बँकिंग क्षेत्रात झालेल्या जोमदार खरेदीच्या बळावर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सोमवारी ५९२ अंकांनी उसळून ८१,९७३ अंकांवर बंद झाला. दिवसभराच्या व्यवहारात त्याने ६९० अंकांपर्यंत उसळी घेतली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १६३ अंकांनी उसळून २५,१२७ या पातळीवर बंद झाला. निफ्टीने १९५ अंकांची उसळी घेतली होती. आजच्या सत्रात मुंबई शेअर बाजारातील टेक महिंद्रा,इंड्सइंड बँक, कोटक महिंद्रा बँक, टायटन आणि एचसीएल टेक्नॉलाजीज या कंपन्यांना सर्वाधिक फायदा झाला.

### सोने ७८ हजार पार

**नवी दिल्ली** : सोन्याच्या दराने २०० रुपयांनी उसळी घेत सोमवारी ७८,७०० रुपये प्रती १० ग्रॅमची ऐतिहासिक उंची गाठली आहे. सोन्यात जागतिक पातळीवर होत असलेली गुंतवणूक आणि देशातही व्यापारी व साठेबाज मोठ्या प्रमाणात खरेदी करीत असल्याने सोन्याच्या दराने विक्रमी उंची गाठली, असे ऑल इंडिया सराफा असोसिशनने सांगितले. नागपुरात मात्र सोमवारी सोन्याचे दर प्रती १० ग्रॅममागे ७७,६२० रुपये होते. दिल्लीत शुक्रवारी सोन्याचे दर प्रती १० ग्रॅमममागे ७८,५०० रुपये होते. नव्याने औद्योगिक मागणी वाढल्याने चांदीचे दरही ५०० रुपयांनी वाढले आहेत. नागपूरमध्ये चांदीचा दर ९७ हजार प्रती किलो होता.

### नवनीत राणांना पुन्हा धमकीचे पत्र

भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा यांना आज पुन्हा एका धमकीचे पत्र मिळाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे तीन दिवसांपूर्वीच याच व्यक्तींने पत्राद्वारे नवनीत राणा यांना धमकी दिली होती. आमिर नाम क इसमाच्या नावाचा उल्लेख पत्रात असून सामूहिक अत्याचार करण्याची धमकी या पत्रातून देण्यात आलीय.

# मित्रपक्षांना मुळीच नाराज करू नका

## विधानसभा निवडणुकीबाबत भाजपाची बैठक

**नवी दिल्ली, १४ ऑक्टोबर**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात भाजपाची आज दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत जागावाटप आणि उमेदवारांच्या नावांवर चर्चा झाल्याचे समजते. कुठल्याही स्थितीत मित्रपक्षांना नाराज करू नका, असा सल्ला या बैठकीत केंद्रीय नेतृत्वाने राज्यातील नेत्यांना दिला आहे.

भाजपा मुख्यालयात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या बैठकीला गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे संघटन महासचिव बी. एल. संतोष, महासचिव विनोद तावडे, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रभारी भूपेंद्र यादव, सहप्रभारी अश्विनी वैष्णव, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे, आशीष शेलार प्रभृती नेते यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्रात आपल्याला महायुती म्हणून निवडणूक लढवायची आहे. त्यामुळे मित्रपक्षांना नाराज करू नका, असा सल्ला या बैठकीत देण्यात आला. सामूहिक नेतृत्वात विधानसभा निवडणूक लढवली जाईल. मुख्यमंत्रिपदाचा निर्णय निकालानंतर मित्रपक्षांशी चर्चा करून घेतला जाईल, असेही सांगण्यात आले.

हरयाणातील निवडणूक आपण अतिशय प्रतिकूल वातावरणात जिंकली. महाराष्ट्रातील निवडणूकही आपल्याला कोणत्याही स्थितीत जिंकायची आहे, त्यामुळे सर्वांनी जिद्दीने कामाला लागण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

दरम्यान, निवडणूक आयोगाकडून येत्या एक दोन दिवसात राज्यात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### केंद्रीय निवडणूक समितीची आज बैठक

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे भाजपाचे उमेदवार निश्चित करण्यासाठी मंगळवारी भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होणार असल्याचे समजते.



दोन गटांत उसळलेल्या हिंसाचारात प्रचंड जाळपोळ करण्यात आली

# बहराईचमध्ये दुर्गा मूर्ती विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक

**बहराईच, १४ ऑक्टोबर**

मन्सूर गावात दुर्गा मूर्ती विसर्जन मिरवणुकीत उसळलेल्या जातीय हिंसाचारात एका तरुणाचा मृत्यू झाला. या हिंसाचाराच्या पृष्ठभूमीवर पोलिसांनी एका व्यक्तीवर गुन्हा दाखल केला व सुमारे ३० जणांना ताब्यात घेतले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हिंसाचारानंतर पोलिस आणि सुरक्षा दलांचे मोठ्या संख्येत जवान तैनात करण्यात आले असून, यामुळे परिसराला छावणीचे स्वरूप आले आहे.

गावातील महाराजगंज परिसरात रविवारी दुर्गा मूर्ती विसर्जन मिरवणूक जात असताना दगडफेक झाली; यादरम्यान दोन गटात हाणामारी व गोळीबार झाला. या हिंसाचारात अनेक जण जखमी झालेत. परिस्थिती हाताळण्यासाठी घटनास्थळा दंगली नियंत्रण वाहने तैनात करण्यात आली आहेत, असे बहराईचचे पोलिस अधीक्षक वृंदा शुक्ला यांनी सांगितले.

**इंटरनेट सेवा बंद**

अफवा पसरवून हिंसा आणखी भडकविण्याचा कट हाणून पाहण्यासाठी संपूर्ण बहराईचमधील इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. *(वृत्तसंस्था)*

# ‘श्रीं’च्या पालखीचे ‘जय हरी विठ्ठला’च्या गजरात सीमोल्लंघन

**शेगाव, १४ ऑक्टोबर**

श्रीसंत गजानन महाराजांची पालखी व टाळकरी मंडळींनी आई साहेबांचा जोगवा, पावलीसह सीमोल्लंघन करून दसरा उत्सव साजरा केला. या कार्यक्रमात रथ, मेणा व अश्वासह भाविक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

श्री गजानन महाराज संस्थानतर्फे आश्विन शु. ९, शनिवारी येथील विसावा संकुल परिसराच्या मैदानावर पारंपरिक पद्धतीत दसरा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्रींची पालखी मंदिरातून दुपारी ४ वा. रथ, मेणा व अश्वासह सीमोल्लंघनाकरिता मार्गस्थ झाली.

श्रींची पालखी टाळ-मृदंगाच्या गजरात जय गजानन, जय हरी विठ्ठल श्रीहरी विठ्ठल, नामाचा जप करीत विसावा संकुल परिसरातील मैदानावर पोहोचली. याप्रसंगी टाळकरींनी आई साहेबांचा जोगवा, पावलीसह सादर केला. यावेळी श्री गजानन महाराज व दुर्गा देवीची आरती करण्यात आली.

पारंपरिक पद्धतीने आपट्याच्या झाडाच्या फांद्यांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी सोने लुटले. श्री गजानन महाराजांची पालखी व दुर्गा देवीच्या प्रतिमेचे भक्तांनी शिस्तीने दर्शन घेतले. *(तभा वृत्तसेवा)*



सीमोल्लंघन करताना श्रींची पालखी

# अभिनेते अतुल परचुरे काळाच्या पडद्याआड

## अकाली एक्झिट घेतल्याने कलाविश्व दुःखात



**मुंबई, १४ ऑक्टोबर**

ज्येष्ठ अभिनेते अतुल परचुरे यांचे वयाच्या ५७ व्या वर्षी निधन झाले. मराठीसह हिंदी चित्रपट आणि मालिकांमध्ये भूमिका साकारत त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडली होती. त्यांनी कॅन्सरला लढा देत त्यावर मात केली होती. त्यानंतर त्यांनी पुन्हा जोमात काम करण्यास सुरुवात केली होती.

सूर्याची पिल्ले नाटकाची तालिम सुरू होती. मात्र पाच दिवसांपूर्वी त्यांना त्रास सुरू झाला होता. त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अतुल परचुरे यांची प्राणज्योत सोमवारी रात्री मालवली.

पु. ल. देशपांडे त्यांची भूमिका त्यांनी साकारली होती. त्याला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली होती. अतुल परचुरे यांच्या जाण्याने मराठी कलाविश्वाला मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी आणि आई असा परिवार आहे.

अनेक मराठी नाटकांमध्ये त्यांनी भूमिका साकारल्या होत्या. वासुची सासू, प्रियतमा, तरुण तर्क म्हातारे अर्क या नाटकांतील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. त्यांनी अनेक चित्रपटांमधून सह-अभिनेता म्हणून काम केले. ‘सलाम-ए-इश्क’, ‘पार्टनर’, ऑल दबेस्ट: फन बिन्स’, ‘खट्टा मीठा’ अशा हिंदी चित्रपटांमध्येही त्यांनी अभिनयाची छाप पाडली. ‘जागो मोहन प्यारे’ आणि अळी मिळी गुपचिळी या मालिकांमधून त्यांनी मोठ्यांसह लहानांच्या मनावर अधिराज्य मिळवले होते.

अलिबाबा आणि चाळिशीतले चोर हा त्यांचा शेवटचा चित्रपट ठरला. नुकतेच त्यांनी सूर्याची पिल्ले या नाटकाची घोषणा केली होती. कॅन्सरवर मात करून ते पुन्हा एकदा रंगभूमीवर काम करण्यास सज्ज झाले होते.

**निधनाचे वृत्त मनाला चटका लावणारे : मुख्यमंत्री शिंदे**

अतुल परचुरे यांची अकाली एक्झिट मनाला चटका लावून जाणारी आहे. त्यांच्या निधनामुळे एका गुणी कलाकाराला आपण मुकलो आहोत. शाब्दिक, वाचिक विनोद यांमध्ये त्यांनी अंगभूत गुणांनी रंग भरले. परचुरे यांच्या असंख्य चाहत्यांपैकी एक म्हणून मी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संवेदना व्यक्त केल्या.

**वेदनादायी वृत्त : देवेंद्र फडणवीस**

मराठी आणि हिंदी दोन्ही सिनेसृष्टी गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते अतुल परचुरे यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायक आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या विनोदी भूमिकांमधून त्यांनी प्रेक्षकांच्या मनामध्ये ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनाने सिनेमाजगत आणि नाट्यसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबीयांना व चाहत्यांना लाभो, ईश्वरचरणी प्रार्थना! असे देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*





72198 21111 | BAJAJ SECURE | pine labs PAY LATER | HDFC BANK INSTANT CASHBACK UP TO ₹ 5 000 ON CREDIT CARDS*

*नियम आणि अटी लागू. *ऑफर फक्त निवडक मॉडेल्सवर. ऑफर 15 नोव्हेंबर 2024 पर्यंत उपलब्ध. बजाज ऑटोने कोणतीही पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. ₹10,000 पर्यंत *बचतीमध्ये मॉडेलवर आधारित ₹5000* कॅशबॅक आणि ₹5000* एचडीएफसी कार्ड कॅशबॅकचा समावेश. एक्सपर्ट्सने प्रोफेशनल सुपरविजन अंतर्गत नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून इतर स्थानावर साहसी कृती केली आहे. ह्या साहसाचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे नियम आणि सुरक्षिततेचे नियम पाळा. विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात एएमसी उपलब्ध. अधिक माहिती बजाज डीलरकडून मिळवा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षाने दिली आहे आणि त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे. कॅशबॅक ऑफर 15 ऑक्टोबर 2024 पर्यंत फक्त पाइन लॅब्स मशिन्सद्वारे एचडीएफसी क्रेडिट कार्डांच्या ईएमआय व्यवहारांवर उपलब्ध आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवरील ऑफर्स त्यांच्या नियम आणि अटींच्या अधीन आहेत.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956069355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956320060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007. **Authorised Service Centre: Mangalwedha** 9890214155, **Marwade** 9028703555, **Akkalkot** 9011556800, **Sangola** 8888109109, **Karkamb** 7057447777, **Vairag** 8308006007, **Karmala** 8888984084, **Kandar** 9673005524, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060, **Akluj** 7756999799, **Temburni** 9552679777, **Natepute** 9850738876, **Mohol** 8830070701.

## अग्रलेख...

# विकास पथावर अग्रेसर मोदी सरकार!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील सरकारला अलिकडेच सव्वाशे दिवस पूर्ण झाले. या शंभर दिवसांमध्ये अल्प कालावधीत मोदी सरकारने केलेल्या घोषणा आणि आखलेल्या योजना पाहता सरकार पायाभूत विकासाच्या ट्रॅकवर गतिमान आहे. त्याचबरोबर शेतकरी आणि गोरगरिबांची चिंता असल्यामुळे सरकार त्यांच्यासाठीही काम करत असल्याचे विविध योजनांमधून दिसते. महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुका होणार आहेत. मोदी सरकारच्या कामगिरीचा उपयोग भाजपाला या निवडणुकांमध्ये होईल, यात शंका नाही. मोदी सरकारने १५ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू केले आहेत. पहिल्या सव्वाशे दिवसांमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तीन कोटी घरांना मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी एक कोटी घरे शहरी, तर दोन कोटी घरे ग्रामीण भागासाठी मंजूर करण्यात आली. पायाभूत सुविधांच्या विकासावर सरकारचा भर होता. त्यासाठी तीन लाख कोटी रुपयांच्या प्रकल्पांना हिरवा कंदील दाखवण्यात आला होता. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात सरकारने लडाख ते हिमाचलला जोडणाऱ्या 'शिन-कुन-ला' बोगद्याची पायाभरणी केली आणि ९३६ किलोमीटर अंतराच्या आठ राष्ट्रीय हाय-स्पीड रोड कॉरिडॉर प्रकल्पांना मंजुरी दिली. महाराष्ट्रातील वाढवण येथे ७६ हजार २०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या जगातील पहिल्या १० बंदरांमध्ये मोडणाऱ्या बंदराला मंजुरी दिली. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना-४ अंतर्गत ४९ हजार कोटी रुपयांच्या केंद्रीय साहाय्याने २५ हजार गावांमध्ये रस्ते आणि पुलांचे बांधकाम-उन्नतीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. रेल्वे आणि हवाई सेवा क्षेत्रातही सरकारने मोठी पावले उचलली आहेत. वाराणसीमधील लालबहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास, पश्चिम बंगालमधील बागडोगरा आणि बिहारमधील बिहता येथे नवीन नागरी एन्क्लेव्ह आणि अगाट्टी-मिनिकॉय येथे नवी हवाई पट्टी बांधताना आठ नवीन रेल्वेलाईन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. बंगळुरू मेट्रोचा तिसरा टप्पा, पुणे मेट्रोचा विस्तार आणि ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पांनाही मंजुरी देण्यात आली, ही मोठी उपलब्धी मानली पाहिजे. या दृष्टीने पाहता मोदी सरकार तिसऱ्या कार्यकाळात वेगाने ठाम निर्णय घेत विकासाभिमुख योजना राबवताना स्पष्टपणे दिसते आहे. याच मोदी सरकारने शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. शेतकऱ्यांकडेही मोदी सरकारचे विशेष लक्ष आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीच्या १७ व्या हप्त्यांतर्गत ९.३ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यावर २० हजार कोटी रुपये पाठविण्यात आले. आतापर्यंत १२ कोटी ३३ लाख शेतकऱ्यांना तीन लाख कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. खरीप पिकांच्या किमान आधारभूत किमतीमध्ये वाढ झाल्यामुळे १२ कोटी शेतकऱ्यांना सुमारे दोन लाख कोटी रुपयांचा फायदा होणार आहे. आंध्रप्रदेशमध्ये १२ हजार १०० कोटी रुपयांच्या पोलावरम सिंचन प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली तर जम्मू आणि काश्मीरमध्ये ३,३०० कोटी रुपयांच्या कृषी योजना आणि विकास प्रकल्पांना सुरुवात झाली, ही बाब आनंददायी आहे. सरकारी घोषणांमुळे मध्यमवर्गीयांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. आता सात लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नाही, तर प्रमाणित वजावट ७५ हजार रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी 'युनिफाईड पेन्शन' योजना लागू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत २५ वर्षे सेवा असलेल्या कर्मचाऱ्यांना सरासरी मूळ वेतनाच्या ५० टक्के पेन्शन म्हणून मिळेल. मुद्रा कर्ज मर्यादा २० लाख रुपयांपर्यंत वाढविणे आणि 'एमएसएमई'साठी क्रेडिट हमी योजनेचा विस्तार यासारख्या 'स्टार्टअप' आणि छोट्या व्यापाऱ्यांनाही दिलासा देण्यात आला. अल्पावधीत सरकारने जलद आर्थिक सुधारणा आणि पायाभूत सुविधांच्या विकासाद्वारे देशाला पुढे नेण्यासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत. तिसऱ्या कार्यकाळाला सुरुवात करण्यापूर्वी मोदी यांनी वचन दिल्याप्रमाणे काम केले; मग तो शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांचे कल्याण असो वा महामार्ग, मेट्रो, बंदरे, विमानतळ, संरक्षण, पर्यावरण, गरीब आणि मध्यमवर्गाचा विकास; दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या जवळपास प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाचे निर्णय घेण्यात मोदी सरकार कोणतीही दिरंगाई करत नाही. त्यांनी तिसऱ्या कार्यकाळात शंभर दिवसांत भारताची ताकद जगाला दाखवून दिली आहे. 'मेक इन इंडिया'अंतर्गत, भारत सध्या ९० हून अधिक देशांमध्ये लष्करी हार्डवेअर निर्यात करत आहे. सरकार सुलभ परवाना प्रणाली आणि मंजुरीला प्रोत्साहन देत असून प्राणघातक शस्त्रांच्या पुरवठ्यातील त्रुटी दूर करत आहे. आफ्रिका आणि इतर देशांना संरक्षण वस्तू पुरविण्यावरही सरकार लक्ष केंद्रित करत आहे; ज्यामध्ये मुत्सद्दी राजनयिक प्रयत्नांचा समावेश आहे. संरक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०२४-२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये निर्यातीमध्ये ७८ टक्के मोठी वाढ झाली आहे. एप्रिल-जूनमध्ये संरक्षण निर्यात ३,८८५ कोटी रुपयांवरून वाढून ६,९१५ कोटी रुपये झाली. संरक्षणसंबंधित निर्यात आधीच सुरू होती. २०२३-२४ मध्ये अशा निर्यातीमधून आपण विक्रमी २१,०८३ कोटी रुपये (सुमारे २.६३ अब्ज) कमावले. मागील आर्थिक वर्षातील १५ हजार ९२० कोटी रुपयांपेक्षा ही रक्कम ३२.५ टक्के अधिक आहे, हे लक्षणीय आहे. २०२० मध्ये मोदी सरकारने पुढील पाच वर्षांसाठी 'एरोस्पेस' आणि संरक्षण वस्तू आणि सेवांमध्ये ३५ हजार कोटी रुपये (५ अब्ज) निर्यातीचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले होते. २०२५ पर्यंत संरक्षण उत्पादनात १.७५ लाख कोटी रुपयांची (२५ अब्ज डॉलर्स) उलाढाल साध्य करण्याच्या सरकारच्या योजनेचा हा एक भाग होता. सरकारने पहिल्या सव्वाशे दिवसांमध्ये सुमारे १५ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू केले. त्यात पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्यसेवा, विज्ञान आणि तंत्रज्ञान, ऊर्जा, रस्ते, रेल्वे, बंदरे इत्यादींकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. भारताला जागतिक स्तरावर अधिक स्पर्धात्मक आणि गुंतवणुकीसाठी आकर्षक बनवण्यासाठी विदेशी कंपन्यांसाठी कॉर्पोरेट कर ४० टक्क्यांवरून ३५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात आला आहे. मुद्रा कर्ज मर्यादा १० लाख रुपयांवरून २० लाख रुपये करण्यात आली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान 'स्पेस स्टार्टअप्स'साठी एक हजार कोटींची व्हेंचर कॅपिटल फंड योजना घोषित करण्यात आली आहे. गुजरातमधील साणंद येथे सेमीकंडक्टर युनिट उभारण्यात येणार आहे. ३,३०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह त्याची उत्पादन क्षमता प्रतिदिन सहा दशलक्ष चिप्स इतकी असेल. मोदी सरकारने कांदा आणि बासमती तांदळावरील किमान निर्यात मूल्य काढून टाकण्याचा आणि कांद्यावरील निर्यात शुल्क ४० टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल. युवकांच्या रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी दोन लाख कोटी रुपयांचे पॅकेज मंजूर करण्यात आले असून, सरकारने शीर्ष भारतीय कंपन्यांमध्ये एक कोटी तरुणांना इंटर्नशिप देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. 'ईपीएफओ'अंतर्गत प्रथमच, सरकार कर्मचाऱ्यांना तीन हप्त्यांमध्ये १५ हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर रक्कम देणार आहे. मोदी सरकारने ४.३ लाख बचत गटांच्या ४८ लाख सदस्यांना मदत देण्यासाठी मोदी सरकारने कम्युनिटी इन्व्हेस्टमेंट फंडमध्ये २५०० कोटी रुपयांची तरतूद केली. कॅन्सरच्या महत्त्वाच्या औषधांनाही सीमा शुल्कात सूट देण्यात आली. ११३ नवीन वैद्यकीय महाविद्यालये उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे वैद्यकीय पायाभूत सुविधा तर मजबूत होतीलच; शिवाय एमबीबीएसच्या जागांची संख्याही वाढेल. एकंदरीत, समृद्ध, सुखी आणि विकसनशील भारताच्या अखंड कथेत विकासाचे नवनवीन मापदंड प्रस्थापित होत असताना ग्रामीण जनता, गरीब, शेतकरी, मागासलेले, आदिवासी, तरुण आणि महिला यांच्या कल्याणाची दृष्टी आवर्जून जोपासली जात आहे.

## आंतरराष्ट्रीय

# भारत, अमेरिका आणि खलिस्तानवादी

**वसंत गणेश काणे**

गेली काही वर्षे भारत आणि अमेरिका यातील मैत्री अधिकाधिक वृद्धिंगत व्हावी या दृष्टीने उभय देशांकडून विशेष प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांना बऱ्यापैकी यश येताना दिसते आहे. हे ज्यांच्या डोळ्यात सलते आहे, त्यांच्या यात अडथळे आणण्याच्या प्रयत्नांनाही यामुळे वेग आलेला दिसतो आहे. पण मोदी हे अमेरिकेच्या दौऱ्यावर येणार असल्याचा मुहूर्त साधून खलिस्तानवाद्यांनी एक कुटिल डाव टाकला. अमेरिकेतील न्यायालयाने गुरपतवंत पन्नू या खलिस्तानवाद्याच्या हत्येच्या कटाच्या प्रकरणात भारत सरकार, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल तसेच इतर काही भारतीयांवर समन्स बजवावे, हा योगायोग असूच शकत नाही. गुरपतवंत पन्नू हा केवळ खलिस्तानी दहशतवादी नाही तर 'शीख फॉर जस्टिस' या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेचा प्रमुख आहे. त्याने अमेरिकेतील न्यायालयात आपल्या हत्येचा कट भारत सरकार, या सरकारच्या यंत्रणा आणि काही अधिकाऱ्यांनी आखला, असा आरोप असणारा बिनबुडाचा दावा दाखल केला आणि त्या दाव्याची दखल घेत न्यायालयाने हे समन्स बजावले आहेत. आम्हाला संरक्षण द्या, अशी मागणी खलिस्तानींच्या शिष्टमंडळाने अमेरिकन प्रशासनाकडे केली आणि प्रशासनाने ती मान्य केली आहे. खरे तर प्रशासनाने यांच्यापासून इतरांना संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. असो.

भारताने खलिस्तान्यांचा हा आरोप सपशेल फेटाळून लावला असून याच काळात आपल्या देशाचे पंतप्रधान अमेरिकेत असणार आहेत, ही बाब लक्षात घेऊन संयमित पण स्पष्ट शब्दात निषेध नोंदवून, योग्य व खंबीर पाऊल उचलले आहे. भारताने दहशतवादी म्हणून जाहीर केलेल्या अनेक गुन्हेगारांचा गेल्या काही वर्षांत अनेक देशांमध्ये संशयास्पद मृत्यू झाला. यातील सर्वाधिक हत्या पाकिस्तानात झाल्या आहेत. यातील हरदीपसिंग निज्जर या दहशतवाद्याचा कॅनडात खून झाल्यानंतर कॅनडा सरकारने हा मुद्दा लावून धरला आणि त्या देशाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी भारतावर आरोप केला केला आहे. ट्रुडो यांच्या या विधानानंतरच पन्नूच्या हत्येच्या कटाची अधिक चर्चा सुरू झाली. एका भारतीय उद्योगपतीने पन्नूला संपविण्यासाठी एक लाख डॉलरची रक्कम मारेकऱ्याच्या हवाली केल्याचा आरोप आहे. न्यू यॉर्कमधील न्यायालयाने या उद्योजकावरही समन्स बजावले. मुळात भारतविरोधी कारवाया करणाऱ्यांना आणि हे आरोपी भारताला हवे असताना अमेरिकेने त्यांना आश्रय दिलाच कसा, हा मुद्दा सर्वप्रथम विचारात घ्यायला हवा आहे. ओसामा बिन लादेनने अमेरिकेवर हल्ला केला तेव्हा अमेरिकेने पाकिस्तानच्या हद्दीची पर्वा न करता त्याला तेथे जाऊन ठार केले. हे कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्यात बसत नव्हते. मग भारताच्या एकात्मतेला धोका असणाऱ्या किंवा दहशती कारवाया करणाऱ्या गुन्हेगारांना कठोर शिक्षा होण्यासाठी भारताने काय करावे किंवा करू नये, हे सांगण्याचा इतरांना अधिकारच पोहोचत नाही. सर्वात महत्त्वाचा मुद्दा वेगळाच आहे. अमेरिकन अधिकारी किंवा कॅनेडियन अधिकारी हे आरोप कशाच्या आधारे करत आहेत, हे समोर आले आहे का? असे विषय टाळले नाहीत, तर त्याचे प्रतिकूल परिणाम होतील, हे अमेरिका आणि कॅनडा यांनी लक्षात घ्यायला हवे. एकेकाळी भारत या दोन देशांचा फक्त एक गिऱ्हाईक असेलही; पण आज पूर्वीची स्थिती राहिलेली नाही. आज विक्रेत्यालाही गिऱ्हाईकाची तेवढीच गरज निर्माण झाली आहे, हे या राष्ट्रांना भारताने बजावले, हे बरे झाले. यानंतर घडलेल्या घटना आणि झालेले करारमदार मात्र नोंद घ्यावी असे झाले आहेत.

अमेरिकेत किंवा इतरत्रही गेल्यावर मोदी नेहमीच तेथील भारतीयांशी जाहीर संवाद साधतात. यावेळी तर त्यांनी प्रदीर्घ भाषणच केले. त्याला मिळालेला प्रतिसाद जबरदस्त होता. कोणत्याही देशाची शक्ती ही केवळ त्याच्या सैनिकी सामर्थ्यापुरती किंवा आर्थिक प्रगतीमुळेच नसते. जगभरात पसरलेले त्या देशातील मूळ नागरिक आपल्या मायदेशाकडे कशाप्रकारे पाहतात, हा मुद्दाही सैनिकी आणि आर्थिक बळाच्या इतकाच महत्त्वाचा ठरतो. कारकीर्दीच्या तिसऱ्या कालखंडातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेला हा पहिलाच अमेरिका दौरा होता. त्याचे महत्त्व अनेक दृष्टींनी उभयपक्षी होते. मोदी यांनी अलिकडेच रशियाचा दौरा केला होता. अमेरिका आणि मित्रदेशांना ते आवडले नव्हते. नंतर तर मोदी युक्रेनमध्येही जाऊन आले. अमेरिकेत जी क्वाडची बैठक झाली, त्यातील अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या तीनही सदस्यांची युक्रेन संघर्षाबाबत भूमिका एकसारखी आहे. भारताचे तसे नाही. भारताचे रशियाबरोबरचे मैत्रिपूर्ण संबंध आजही कायम आहेत. अशावेळी अमेरिकेशीही द्विपक्षीय संबंध चांगले राखणे, एवढेच नव्हे तर ते अधिक वृद्धिंगत कसे होतील हे पाहणे ही भारतासाठी एक तारेवरची कसरतच होती आणि आहे. त्याचबरोबर दिवसेंदिवस क्वाडचे जागतिक राजकारणातील महत्त्व वाढत चालले आहे, त्यालाही बाधा पोहोचणार नाही असा प्रयत्न करणे, ही बाबही सोपी नव्हती आणि नाही. या भेटीत या दोन्ही बाबी भारताने यशस्वीरीत्या हाताळल्या आहेत. ही घटना जागतिक राजकारणातील एक महत्त्वाची घटना ठरणार आहे. याशिवाय या भेटीत अमेरिका आणि भारत यात जे द्विपक्षीय करार झाले आहेत, त्यांच्यामुळे भारताची संरक्षणसिद्धता वाढणार आहे, हे वेगळेच.


जगात जिथे जिथे म्हणून भारतीय समाज पोहोचला आहे, तिथे त्याने आपल्या बौद्धिक आणि आर्थिक उन्नतीसोबत त्या देशाच्या उन्नतीलाही हातभारच लावला आहे. या समाजाने भारताच्या प्रगतीतही साह्यभूत व्हावे, अशी अपेक्षा मोदींनी ठिकठिकाणी व्यक्त केली आहे. या निमित्ताने बोलताना त्यांनी 'एआय'चा उल्लेख केला आहे. एआय म्हणजे केवळ 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' एवढेच त्यांना अपेक्षित आणि अभिप्रेत नव्हते तर अमेरिका आणि इंडिया (भारत) हेही अपेक्षित आणि अभिप्रेत होते. अशा प्रकारच्या शब्दयोजना मोदी करतात आणि श्रोतेही त्यांना भरभरून प्रतिसाद देतात. अमेरिकेचे अध्यक्ष बायडेन यांनी भारत आणि अमेरिका यांच्या मैत्रीचे महत्त्व त्यांच्या राजकीय कारकीर्दीच्या अगदी प्रारंभापासूनच जाणले होते. ही भूमिका त्यांनी सतत कायम ठेवली, ही दाद द्यावी अशी बाब आहे. आज अमेरिका भारताला अत्याधुनिक ड्रोन देत आहे. हे ड्रोन बहुद्देशीय आहेत. सामरिकदृष्ट्या ते समुद्रात, वाळवंटात आणि बर्फाच्छादित उत्तर सीमेवर उपयोगी पडणारे आहेत. क्वाडला शक्तिशाली करायचे असेल तर सर्वात अगोदर भारत शक्तिशाली व्हावा लागेल, ही जाणीव अमेरिकेला झाली आहे. जपान आणि ऑस्ट्रेलिया हे भारताची बरोबरी करू शकणार नाहीत. नुसते विस्तीर्ण क्षेत्र (जसे ऑस्ट्रेलिया) किंवा जिद्द आणि नैपुण्य (जसे जपान) यांच्या भरवशावर चीनला आवरता येणार नाही, हे बायडेन जाणतात. अमेरिका ते ऑस्ट्रेलिया हे क्षेत्र हे एक अति विशाल क्षेत्र आहे. यातील भूभाग आणि सागर यांचा व्याप सारखाच अवाढव्य आहे. हा सामरिक तसेच व्यापारी दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. चीनचे या क्षेत्रावरील आक्रमण थोपवण्यासाठी केवळ एक लष्करी आघाडी तयार करून थांबणे पुरेसे नाही तर एक बहुसमावेशी आणि बहुद्देशीय आघाडीच आवश्यक आहे, हे जाणून कर्करोगासारख्यावर नियंत्रण मिळविण्याची रचनात्मक मोहीम हाती घेण्यावर या चार राष्ट्रांचे एकमत झाले आहे. असा कार्यक्रम भारतासाठी तर सर्वात अधिक लाभदायक ठरणारा असणार आहे.

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# राज्याचे सजग प्रहरी व्हा!



हरयाणाच्या निकालानंतर काँग्रेसचे सर्व मनसुबे पार धुळीस मिळाले आहेत. निव्वळ सत्ता हस्तगत करण्यासाठी काँग्रेस देशामध्ये कोणत्याही स्तरावर जाऊ शकते, हे आता जनतेच्याही लक्षात आले आहे. राहुल गांधी यांचे विखारी आणि द्वेषाचे राजकारण लोकशाहीसाठी अतिशय घातक असून, देशाच्या फाळणीचा गंधही त्यामधून जाणवतो. हरयाणाच्या निकालाने महाराष्ट्रामध्ये काँग्रेसची पंचाईत झाली असून, मतदारांसमोर काय घेऊन जावे, या विचाराने काँग्रेस त्रस्त आणि हतबल झाली आहे. या घटनेने हादरलेल्या काँग्रेसला महाराष्ट्रामध्ये आपली सर्व ताकद आपल्या अस्तित्वासाठी पणाला लावावी लागणार आहे.

ज्यावेळी अस्तित्वासाठी लढाई सुरू होते, त्यावेळी सिंहासन काबीज करण्याची क्षमता त्या फौजेकडे नसते, हे महाविकास आघाडीच्या अन्य घटक पक्षांच्या लक्षात आल्याने काँग्रेस पक्ष पहिल्यापेक्षाही अधिक दुबळा व अपंग झाला आहे. मागील लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने ९९ जागा काय जिंकल्या अन् काँग्रेसच्या डोक्यामध्ये सत्तेची हवा शिरली. हा निव्वळ हवेचा फुगा होता. हरयाणाच्या निकालाने तोही फुटला. यापुढे राज्याच्या राजकारणात काँग्रेसचा तोल गेल्यास त्याचे नवल वाटू नये. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये अन्य घटक पक्षांसाठी आता एक निव्वळ ओझे झाले आहे. चाणाक्ष शरद पवारांनी हे कधीचेच हेरले असेल. त्यामुळे काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपा आणि हिंदुत्वाला शिव्या देऊन राजकारणामध्ये पोळी शेकण्याचे ते दिवस आता इतिहासजमा झाले आहेत. हिंदूंच्या जाती-जातीमध्ये भांडणे लावून काँग्रेसने हिंदूंच्याच मतावर देशामध्ये जवळपास ६० वर्षे राज्य करूनही हिंदूंवर आपल्याच देशामध्ये आश्रितांसारखे जगण्याची वेळ काँग्रेसने आणली, हे मतदारांना २०१४ साली समजले. त्यामुळे सत्तेची चटक लागलेली काँग्रेस सत्तेसाठी आता बेफाम झाली आहे. त्यासाठी वाट्टेल ते करण्याची दुबळ्या काँग्रेसची मानसिकता तयार झाली आहे. त्यासाठी काँग्रेसचे राहुल गांधी देशाबाहेरही भारताला बदनाम करण्यासाठी कोणतीच कसर ठेवत नाही. देशाच्या शत्रूंबरोबर काँग्रेस पक्ष हातमिळवणी करत असेल तर देशभक्त नागरिक हे कदापिही सहन करणार नाही, हे हरयाणाच्या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. काँग्रेस पक्षाला या देशाची परंपरा, इतिहास व संस्कृतीशी काहीएक देणे-घेणे नसून साम, दाम, दंड, भेद वापरून फक्त सत्ता काबीज करणे हा एकमेव उद्देश आहे. त्यामुळे नोव्हेंबर महिन्यामध्ये होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जनतेने डोळ्यात तेल घालून दक्ष राहण्याची गरज आहे. राज्यामध्ये काँग्रेसची वाट खडतर असली, तरी राज्यात सजगता असायला हवी. अपंगत्व प्राप्त झालेली काँग्रेस पुन्हा राज्यामध्ये अराजकतेचे बीज रोवू शकते, हे आधीच ध्यानात घ्यायला हवे. हरयाणाच्या निकालामुळे राज्यातील महाविकास आघाडीच्या समीकरणावर निश्चित परिणाम होणार आहे. हरयाणाच्या धक्कादायक निकालाने राज्यामधील महाविकास आघाडीचेही मनोबल खच्ची झाले आहे. यापूर्वीच्या दोन विधानसभा निवडणुकांमध्येही काँग्रेसच्या मनसुब्यावर जनतेने पाणी फेरले होते. यावेळी तर लाडकी बहीण आणि लाडक्या भावाने महाविकास आघाडीच्या तोंडचे पाणी पळविले आहे. २०१४ पर्यंत काँग्रेसच्या डोक्यात सत्तेचा उन्माद ठासून भरला होता. काँग्रेस म्हणजेच भारत देश हे समीकरण त्यांनी जनतेच्या डोक्यात ठासून भरले होते. या समीकरणामध्ये मात्र हिंदूंना कोणतेच स्थान नव्हते. निराश आणि हतबल झालेल्या हिंदूंसाठी या देशामध्ये जगणेही असह्य झाले होते. त्याची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेणे काळाची गरज आहे. धादांत खोट्या धर्मनिरपेक्षतेच्या ओझ्याखाली दबलेल्या लोकांना काढण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशामध्ये खऱ्या लोकशाहीचा उदय केला अन् एक नवी पहाट उगवली. ही परंपरा महाराष्ट्रानेही जपली आहे. येत्या नोव्हेंबरमध्येही त्यासाठी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले जाणार आहे. त्यामुळे एक सजग प्रहरी म्हणून या राज्याच्या मान आणि सन्मानासाठी जागरूक राहायलाच हवे. हेही एक राष्ट्रभक्तीच्या यज्ञात समिधा ठरणार आहे.

९८८१७१७८५६

## दखल

# मराठी भाषेचे संवर्धन : आव्हाने, जबाबदारी

**विजय पांढरीपांडे**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही अत्यंत आनंदाची, अभिमानाची बाब आहे. मराठीवर प्रेम करणाऱ्या सर्वांसाठी हा संकल्पपूर्तीचे समाधान देणारा क्षण आहे. यासाठी ज्या साहित्यिकांनी, विचारवंतांनी गेले दहा वर्षे प्रयत्न केलेत त्या सर्वांचे कृतज्ञापूर्वक आभार मानायला हवेत. अभिजात दर्जा मिळाल्याने केंद्र सरकारकडून जी काय भाषा संवर्धनासाठी, संशोधनासाठी आर्थिक मदत मिळायची ती मिळेलच. त्या देणगीतून विद्यापीठे जे काही योगदान द्यायचे ते देतीलच. पण महत्त्वाचा मुद्दा वेगळाच आहे.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून उच्च शिक्षण यावर भर दिला आहे. ग्रामीण भागातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा अडचणीची वाटते पदवीचे किंवा पदव्युत्तर उच्च शिक्षण घेताना. ही अडचण दूर करताना अनेक ठिकाणी मातृभाषेतून बोलण्याचा प्रयत्न काही प्राध्यापक करतात. पण अनेक इंग्रजी शब्दांना, संकल्पनांना पर्यायी मराठी शब्द नाहीत. असेल तरी ते क्लिष्ट आहेत. त्यामुळे विषय नीट समजावताना, समजून घेताना दोन्ही पक्षी अडचणी येतात. सायन्स, इंजिनीयरिंग, मेडिकल, संगणक, अशा अनेक विषयात मराठीत उत्तम पुस्तके नाहीतच. या प्रक्रियेत कोणते शब्द मराठीत वापरायचे अन् कोणते शब्द मूळ इंग्रजीतले तसेच ठेवायचे हे तार्किक विचाराने ठरवावे लागेल. याबाबतीत प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले यांनी गेल्या दहा-बारा वर्षांत लिहिलेली विविध विषयांवरील मराठी पुस्तके आदर्श वस्तुपाठ ठरू शकतील. त्यात सुधारणाही करता येतील. फिजिक्स, केमेस्ट्री, गणित, बायोलोजी, इलेक्ट्रॉनिक्स अशा इंजिनीयरिंगसह सर्व विषयांत मराठीतून सोपी पुस्तके येणे गरजेचे आहे. हिंदीत हा प्रयोग आयआयटी कानपूरचे प्रा. एच. सी. वर्मा यांनी फिजिक्स विषयात उत्तम प्रकारे केला आहे. एखादा प्राध्यापक अमुक विज्ञान विषयाचा इंग्रजी माध्यमातून शिकवणारा उत्तम प्राध्यापक असेल. पण तो मराठी अनुवादाचे काम तितक्याच प्रगल्भपणे करू शकेल याची खात्री नाही. मुळात विषय उत्तम समजणे अन् तो इंग्रजीतून मराठीमध्ये तितक्याच प्रभावीपणे समजावणे हे सोपे काम नाही. पण हे अशक्यही नाही. सरकारकडून अभिजात दर्जा मिळाल्यानंतर लाभणारे अनुदान या भाषांतर प्रकल्पासाठी विवेकाने वापरता येईल. सर्व विषयांत, सर्व विभागांत नव्या व्याख्या, नव्या संकल्पना, नवी समीकरणे, प्रयोगपद्धती हे सारे सध्या सोप्या भाषेत लिहावे लागेल. अनुवादित करावे लागेल.नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर खरे तर हे काम युद्धपातळीवर सुरू व्हायला हवे होते. पण सरकारपासून विद्यापीठापर्यंत शैक्षणिक काम कमी अन् राजकारण जास्त अशी दुर्दैवी परिस्थिती असल्याने या बाबतीत फारशी हालचाल झाल्याचे ऐकिवात नाही. आता तरी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने निमित्त साधून आपण खडबडून जागे व्हायला हवे.



याचबरोबर महाराष्ट्राबाहेरील राज्यांत अनेक मराठी भाषिक राहतात. त्यांच्याही भाषिक अडचणी सोडवल्या पाहिजेत. हैदराबाद येथे शंभर वर्षांपेक्षा जुनी विवेकवर्धिनी शिक्षण संस्था आहे. त्याच्या मराठी शाळा, कॉलेजची अवस्था फार वाईट आहे. त्यासारख्या संस्थेला संजीवनी देणे गरजेचे आहे. एके काळी उत्तम असलेल्या उस्मानिया विद्यापीठातील मराठी विभागातील विद्यार्थ्यांची रोडावलेली संख्या अन् अभिजात संशोधनाचा दर्जा हेही चिंतेचे विषय आहेत. याप्रमाणेच इतर राज्यांतील आकाशवाणी केंद्रांवरील मराठी कार्यक्रमाचा दर्जा सुधारणे, चांगल्या कार्यक्रमासाठी अनुदान वाढवणे आवश्यक आहे. मराठी नाटके फारशी महाराष्ट्राबाहेर जात नाहीत. गेलीच तर तिकिटाचे दर अवास्तव असतात. महाराष्ट्रातही नाटकाच्या थिएटरची अवस्था दयनीय आहे. त्याबद्दल प्रशांत दामले यांच्यासारख्या अनेक ज्येष्ठ नटांनी घसाफोड तक्रारी केल्या आहेत. खरे तर मराठी रंगभूमी, मराठी नाट्य संगीत, भावगीत, लोककला अशा सर्वच बाबतीत खूप काही करण्यासारखे आहे. जितकी दळणवळण साधने, इंटरनेट, बिग डेटा हे गरजेचे तितकेच नाट्य, चित्रपट, संगीत, लोककला ही मराठी संस्कृती जपणे, तिचे संवर्धन करणे देखील गरजेचे आहे. आधीच इंग्रजीने आपल्या भाषेची वाट लावायला सुरुवात केली आहे. जिथे पर्याय नाही तिथे इंग्रजी शब्द वापरायला हरकत नाही. टेबल, पेन, रेल्वे, बँक, चेक, आधार कार्ड, पॅन नंबर असे अनेक शब्द मराठीच्या अंगणात छानपैकी रुळले आहेत. तरीही बोलताना धेडगुजरी भाषा न बोलता प्रमाण भाषा बोलणे, लिहिणे गरजेचे आहे. आज इंग्रजी माध्यमातून शिकलेल्या अनेक तरुण मुला-मुलींना मराठी वाचता येत नाही. बोलणे देखील अनेकदा अशुद्ध असते. इकडून परदेशात गेलेल्या कुटुंबात नव्या पिढीचे मराठी वाचन नसल्यात जमा म्हणता येईल.

मराठी मासिके ही एकेकाळी फार मोठी वाचनसंस्कृती होती. गेल्या काही दशकात अनेक अभिजात दर्जेदार मासिके बंद पडली. आता फक्त दिवाळी अंक उरलेत. तेही काही मोजके अपवाद वगळता दर्जा पार घसरलेले! कोविडचे निमित्त काय झाले, मराठी प्रकाशन व्यवसाय देखील खिळखिळा झाला. हौशी लेखकावर स्वतः पैसे खर्च करून पुस्तके प्रसिद्ध करण्याची वेळ आली. मग मानधन, कॉपी राईटची बातच सोडा. मासिके बंद पडल्याने कथा, कविता लेखन कमी झाले. नव्या दर्जेदार कादंबऱ्यांची प्रतीक्षाच करावी लागते. पूर्वीसारख्या जाडजूड ऐतिहासिक कादंबरीची बातच दूर! मराठी वाचनालये ओस पडली आहेत. अनेक बंद देखील पडली. पूर्वी फिरते घरपोच वाचनालय असायचे. आता नव्या पिढीला अर्थ सांगावा लागेल! एकूणच मराठी वाचनसंस्कृती मंदावली आहे. त्यातही मोबाईल, सोशल मीडिया या नव्या व्यसनाच्या आहारी गेलेल्या नव्या पिढीने मराठी पुस्तक हातात घेणे जवळपास बंद केले आहे. अनेक मुलाखतीत एकही पुस्तक न वाचलेले उमेदवार मी बघितले आहेत. जी वाचत नाहीत ती माणूस म्हणून वाचणार कशी असा प्रश्न पडतो अशा वेळी?

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला म्हणून आनंदोत्सव साजरा करताना, मराठी भाषेचे संवर्धन, तत्संबंधी आव्हाने, त्या अनुषंगाने येणारी जबाबदारी याचे भान ठेवणे तितकेच गरजेचे आहे.

७६५९०८४५५५

### अतिक्रमण जागोजागी

नागपुरात वाहनचालकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या हेतूने कंपन्यांनी मुख्य रस्त्यावर आपली आस्थापने थाटली आहेत. कोणत्याही वस्तीत जा, जिथेही अशी दुकाने आहेत तिथे रस्त्यावर अनेक नवीन गाड्या पार्क करून ठेवल्या जातात. यांना पार्किंगबद्दल कोणतीही बंधने लागू नाहीत का? फूटपाथवर तर सोडाच पण अर्धाधिक रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या असताना, पायी चालणाऱ्यांना जीव मुठीत धरून कसाबसा रस्ता पार करावा लागतो. चालणारी वाहने सतत हॉर्न वाजवून आणखी भीती निर्माण करतात.

स्थानिक प्रशासन याकडे लक्ष देईल का? आरटीओ येथे लक्ष का देत नाही? अन्यथा दुचाकी उचलून नेणारे किती तत्पर असतात हे सर्वांना माहीत आहे. कुंपणच शेत खातं म्हटल्यावर तक्रार तरी कुठे करणार हा सामान्य माणसाचा प्रश्न आहे.

**अतुल ठाकरे**/नागपूर

### वाचनसंस्कृती पुनर्स्थापित करण्याचे आव्हान

नवी पिढी वाचनसंस्कृतीपासून दुरावत चालली आहे. पुस्तकांपासून दूर गेलेली मुले टीव्ही, मोबाईल, विविध सोशल मीडिया साईटवर रममाण झाली असून, त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. पूर्वी गजबजलेली वाचनालये आणि ग्रंथालये आता ओस पडू लागली आहेत. या नव्या पिढीत पुन्हा वाचनसंस्कृती रुजवण्याची मोठी जबाबदारी समाजापुढे आहे. त्यासाठी मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी याकरिता वेगवेगळे उपक्रम राबवणे गरजेचे आहे. वाचन प्रेरणा दिन हा त्यापैकीच एक उपक्रम. मुलांमध्ये वाचनसंस्कृती निर्माण करण्यासाठी वाचन प्रेरणा दिनासारखे उपक्रम निश्चितच हातभार लावतील. या उपक्रमासोबतच शासन स्तरावर व सामाजिक संस्थांनी शाळा, महाविद्यालये दत्तक घेऊन शाळा, महाविद्यालयांना कथा, कादंबरी, गोष्टींची पुस्तके, कविता संग्रहे, नाटके, आत्मचरित्रे, सामान्य ज्ञानावर आधारित पुस्तकांचे मोफत वाटप करावे तसेच शाळेत उत्कृष्ट वाचक स्पर्धा आयोजित करून सर्वात जास्त पुस्तके वाचणाऱ्या मुलाचा गौरव करावा जेणेकरून इतर विद्यार्थी त्यापासून प्रेरणा घेतील. शाळेतील विविध स्पर्धांमध्ये विजय मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके, ग्रंथ भेट म्हणून द्यावीत. वाचाल तर वाचाल या सुविचाराप्रमाणे नव्या पिढीला जर वाचवायचे असेल तर त्यांच्यात पुन्हा वाचनसंस्कृती रुजवायला हवी.

**श्याम ठाणेदार**/ ९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### ही व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी!

गोवा येथील ख्रिस्ती संत फ्रान्सिस झेव्हियर यांच्या शवाची डीएनए चाचणी करण्याची मागणी प्राध्यापक सुभाष वेलिंगकर यांनी केल्याची बातमी वाचण्यात आली. या विरोधात गोवा येथील ख्रिस्ती संघटनांनी प्राध्यापक वेलिंगकर यांना अटक करण्यात यावी यासाठी आंदोलन केले. या संदर्भात सविस्तर रीतीने बघितल्यावर लक्षात आले की अन्य राज्यांनी देखील ते शव फ्रान्सिस झेव्हियर यांचेच आहे याबद्दल शंका व्यक्त केली आहे. तेव्हा केवळ डीएनए चाचणी केल्यानंतर खरे काय ते सिद्ध होईल. अशावेळी चाचणी करणे हा एकच पर्याय उरतो. तेव्हा अशी मागणी करणाऱ्या विरुद्ध आंदोलन करणे किंवा अटक करण्याची मागणी करणे हे कितपत योग्य आहे? अजून महत्त्वाची बाब म्हणजे या संदर्भात अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि त्यांच्या समविचारी अन्य संघटना ज्यांना केवळ हिंदू धर्मातील कृती या अंधश्रद्धा वाटतात, ते याबद्दल काहीही बोलताना दिसत नाही. इतर वेळी हिंदूंना विज्ञाननिष्ठ व्हा असे सांगणारे अंनिसवाले या प्रकरणात मूग गिळून बसले आहेत. तेव्हा सर्वसामान्य व्यक्तीच्या मनात प्रश्न निर्माण होतो की हिंदू धर्मातील धार्मिक कृतींना अंधश्रद्धा ठरवणारी अंनिस ख्रिस्ती धर्मातील शवाची पूजा करणे हे विज्ञाननिष्ठ नाही असे का सांगत नाही? मुळातच प्रेताची पूजा करणे कितपत विज्ञानाला धरून आहे? तेव्हा खरे काय किंवा खोटे काय याचा निकाल लागण्याआधी कुणाला अटक करण्याची मागणी करणे हे क्लेशदायक आहे. तसेच ती व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी आहे.

**प्रिया बागडदेव**/ छिंदवाडा

### सत्तारूढ आणि विरोधक सारखेच

निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने राज्यातील प्रत्येक मदरशाला १० लाख रुपये आर्थिक साहाय्य देण्याचा निर्णय घेतला होता. झाकिर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजना अंतर्गत ही आर्थिक मदत देण्यात येणार होती. विधानसभा निवडणुकीपूर्वी सत्तारूढ महायुती सरकार सध्या सर्वच घटकांना खुश करण्यात व्यस्त आहे. या पृष्ठभूमीवर राज्य सरकारने मदरसा शिक्षकांच्या पगारात वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. पण सरकारच्या या निर्णयावर उद्धव ठाकरे यांच्या गटाने महायुती सरकारवर मत जिहाद केल्याचा आरोप केला आहे. भाजपाद्वारा काँग्रेस पक्षावर मुस्लिम तुष्टीकरणाचा आरोप सातत्याने केला जातो. पण आपण सुद्धा तेच तुष्टीकरण करत असाल तर मग कोणाकडे पाहावे. मराठीत एक म्हण आहे नाकाने कांदे सोलणे याचा अर्थ फुकटच्या बढाया मारणे. याचे उदाहरण आपण सगळे रोजच न्यूज चॅनलवर बघत असतो. भाजपा प्रवक्ते असो की काँग्रेस प्रवक्ते यांच्या जागी आम्ही असतो तर असं केलं नसतं, तसं केलं असतं. पण प्रत्यक्षात संधी मिळते तेव्हा मात्र सत्ताधारी आणि विरोधक गप्प बसतात.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

तेलगाव सीना (ता. उत्तर सोलापूर) येथे विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी रात्री उघडकीस आली. कविता काकासाहेब डुबल (वय ३३, रा. देगाव, ता. पंढरपूर) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. कविता डुबल या १३ ऑक्टोबर रोजी तेलगाव सिना येथे माहेरी असताना अज्ञात कारणावरून छताच्या फॅनला फेटा बांधून अज्ञात कारणावरून गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्याने भाऊ रामदास माने व पती काकासाहेब डुबल यांनी कविताला खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. आकाश माने यांनी कविताचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बसण्याच्या कारणावरून दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

हॉटेलमध्ये बसण्याच्या कारणावरून दोघांना काचेच्या बाटलीने मारहाण करून जखमी करण्यात आले. अजय आमरप्पा आनागुंदी (वय २१, रा. नवाज हॉटेलमागृ, हैद्राबाद रोड, सोलापूर) आणि श्रीशैल निनिन हरसुरे (वय २३, रा. सरवदे नगर, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. १३ ऑक्टोबर रोजी रात्री दहाच्या सुमारास जुना विडी घरकुल येथील प्रगती चौकात हॉटैलमध्ये बसण्याच्या कारणावरून विशाल अण्णम व इतर पाचजणांनी मिळून काचेच्या बाटलीने व दगडाने आनागुंदी व हरसुरे या दोघांना मारहाण केली. जखमी असवस्थेत दोघांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### रेल्वे गाडीतून पडून तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

कोणत्या तरी रेल्वे गाडीतून पडून तरूणाचा मृत्यू झाला. कृष्णा मारूती जाधव (वय ३०, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास सोलापूर रेल्वे स्टेशन पी. एल. नं. ०३ वर वाडीकडील बाजूस कृष्णा जाधव हा कोणत्या तरी धावत्या रेल्वे गाडीतून पडून त्याचे दोन पाय गुडघ्यातून कट होऊन जखमी झाला. त्यामुळे त्यास सोलापूर लोहमार्ग पोलिस ठाण्याकडभल हवालदार पी बी सुरवसे यांनी बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता जाधव याचा उपचारादरम्याने १४ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास मृत्यू झाल्याचे डॉ. प्रदीप सायनाडे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## विवाहितेच्या आत्महत्याप्रकरणी पती व सासूस जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

येथील एका विवाहितेस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणीच्या गुन्हयात पती उमेश रमेश काळे व सासु इंदुबाई रमेश काळे (दोघे रा. बोरामणी ता. दक्षिण सोलापूर) या दोघांना सोलापूर येथील सत्र न्यायाधीश केद्रे यांनी जामीन मंजूर केला.

या प्रकरणातील विवाहिता मयत पूजा व उमेश यांचा विवाह दि.०९ डिसेंबर २०२२ रोजी झालेला होता, विवाहानंतर काही दिवस सासरच्या लोकांनी चांगले नांदविले, तथापि त्यानंतर पैशासाठी व तिच्या दिसण्यावरुन सासरच्या लोकांनी त्रास देण्यास सुरु केले होते, त्या त्रासाला कंटाळुन तिने माहेरी, राहत्या घरी दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी मयत विवाहितेने ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली, अशा आशयाची फिर्याद मयत विवाहितेच्या आईने दाखल केली. त्यावरुन पती उमेश रमेश काळे यास दि.१५ ऑगस्ट २०२४ रोजी पोलिसांनी अटक केली होती. तसेच इंदुबाई यांच्याही अटकेची शक्यता निर्माण झाली होती. त्यानंतर पती उमेश यांचा नियमीत जामिन (अटकेतील जामीन) व सासु इंदुबाई यांचा अटकपूर्व जामिन अर्ज सोलापूर येथील सत्र न्यायालयात दाखल केला होता. त्याची सुनावणी होऊन, त्यामध्ये पती व सासु तर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, मयत विवाहितेच्या मृत्युस पती व सासु जबाबदार नाहीत, अशी कोणतीही घटना घडली नाही की जेणेकरुन पती व सासु यांनी तिला आत्महत्येस प्रवृत्त केले असे म्हणता येईल, त्यामुळे दोघांनाही जामिन मंजूर करण्यात यावा असा युक्तीवाद करण्यात आला. सदरचा युक्तीवाद विचारात घेऊन न्यायालयाने आरोपींनी तपासात सहकार्य करण्याचे अटीवर त्यांना जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपी पती व सासुतर्फे ॲड. शशि कुलकर्णी, ॲड. सचिन कोळी, ॲड. रणजित चौधरी, ॲड. आदित्य आदोने तर सरकार तर्फे सरकारी वकील सौ. शैलजा क्यातम यांनी काम पाहिले.

### खरेदी खत हरवले आहे

विजय शिवाजी भुतेकर रा खामसवाडी ता कळंब जि धाराशिव व्यवसाय शेती दिनांक १२-०९-२०२४ सोलापूर बस स्टँड मध्ये दस्त क्र २९८८/२०१६ हे दस्तावेज हरवले आहेत. तरी कोणास मिळाल्यास खालील नंबर वर संपर्क करावा.

**विजय शिवाजी भुतेकर**
मो.९५२७३०३५८१
अंबाजोगाई

**ॲड. शरद बी. भिसे**
मो. ९०७५३३६४६४
अंबाजोगाई

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर व शहर हद्दीतील तसेच आजूबाजूच्या परसिरातील लोकांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीने वर्णन :- डिाा व सब डिाा सोलापूर, पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी, सोलापूर महानगरपालिका गवसु विभाग शहर हद्दीतील पेठ-तालुका ऑफिस झोपडपट्टी, या नावांने ओळखले जाणारे नगरातील झोपडी घर नं. २९९ ही मिळकत घरजागा असून सदची मिळकत **मीरा सुभाष गोडगे** यांचे नावावर असून सदर ठिकाणी त्यांचे मालकीचे पुर्वपश्चिम ५० फुट व दक्षिणोत्तर २० फुट असे एकूण १००० चौ. फुट जागेत १०X१५ ची एक पत्रा शेड खोली आहे. सदरची संपूर्ण मिळकत त्यांनी विक्रीस काढलेली आहे. सदरची मिळकत आमचे अशिल अ. वहाब अ. हैई सगर, यांनी खुषखरेदीने विकत घेण्याचे ठरवून सदर खरेदी व्यवहारापोटी आमचे अशिलाकडून योग्य ती रक्कम इसार म्हणून **मीरा सुभाष गोडगे** यांनी स्विकारलेली असून रोखीने घेतलेली आहे या उपरही काही कायदेशीर कागदपत्रांची आवश्यकता भासल्यास ते सर्व कागदपत्रांची पुर्तता करण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.

परंतु वर वर्णन केलेल्या घरजागेबाबत कोणाचेही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दावा, लीज, टाच, बोजा, पोटगी, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, करार, मदार, कुलमुख्त्यार, वहिवाटी हक्क, वारसदार वाटणी हक्क, खरेदी-विक्री वगैरे अन्य स्वरुपाचा वाद असल्यास व कोणत्याही वित्तीय संस्थेचे अथवा बँकेचे कर्ज बोजा असल्यास त्यांनी खलील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची तक्रार, हरकत न आल्यास सदर वर नमुद जागेबाबत आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मात्र कोणाचेही कसलेही तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर सदर घरजागेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचेही फसगत होऊ नये व सदर व्यवहाराची तमाम लोकांस यांची जाहीर माहिती व्हावी म्हणून सदरची खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली आहे.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली तारीक १४/१०/२०२४

**सही**
**ॲड. एस.एम ढेकणे**
**मु. पो. वाणी गल्ली बाळे**
**ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर**

## मध्य रेल्वेने तिकीट तपासणी कामगिरीत उच्चांक गाठला

### सणासुदीच्या हंगामासाठी विशेष उपक्रम केले सुरू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

मध्य रेल्वेने सणासुदीच्या काळात प्रवाशांचा प्रवास सुरळीत आणि आरामदायी व्हावा यासाठी विशेष उपाययोजना राबवून विनातिकीट आणि अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये लक्षणीय यश मिळवले आहे.

मध्य रेल्वेने एप्रिल २०२४ - सप्टेंबर २०२४ विनातिकीट/अनियमित प्रवास आणि बुक न केलेल्या सामानाच्या १९.०९ लाख प्रकरणांमधून एकूण १११.६२ कोटी रुपयांचा महसूल मिळवला.

सणासुदीच्या हंगामासाठी विशेष तिकीट तपासणी मोहिम मध्य रेल्वे, रेल्वे बोर्डाच्या निर्देशांच्या अनुषंगाने, आरक्षित डब्यांमधील अनधिकृत प्रवासाला आळा घालण्यासाठी सर्वाधिक प्रवासाच्या कालावधीत विशेष तिकीट तपासणी ड्राइव्ह आयोजित करत आहे. दि. १ ऑक्टोबर २०२४ ते दि. १५ ऑक्टोबर २०२४ दि. २५ ऑक्टोबर २०२४ ते दि. १० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत तिकीट तपासणी मोहिमा घेण्यात येणार आहेत. सणासुदीच्या गर्दीत सुव्यवस्था राखणे आणि आरक्षित डब्यांमध्ये विनातिकीट किंवा अनधिकृत प्रवासाला प्रतिबंध करणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी आणि गर्दी रोखण्यासाठी पुढाकार प्रवाशांच्या सोयीसाठी आणि उन्हाळा आणि सणासुदीच्या काळात आरामदायी




प्रवास सुनिश्चित करण्यासाठी, वाणिज्य विभागाने खालील उपक्रम सुरू केले आहेत

गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहिम (दि. १४ जून २०२४ पासून) : मध्य रेल्वेने गर्दीच्या समस्यांना तोंड देत असलेल्या गाड्या निवडल्या आणि या मार्गांवर समर्पित तिकीट तपासणी पथके तैनात केली. या टीम्स विनितिकीट आणि अनारक्षित प्रवाशांना आरक्षित डब्यांमध्ये चढण्यापासून रोखत आहेत आणि त्याऐवजी त्यांना सामान्य डब्यांकडे जाण्यासाठी प्रवृत्त करीत आहेत.

**प्रवासी व्यवस्थापन**

१४ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत २,५४,७९५ अनारक्षित प्रवाशांना १२,९३० गाड्यांमधून उतरवण्यात आले किंवा त्यांना चढण्यापासून रोखण्यात आले, ज्यामुळे आरक्षित तिकिटांसह रास करणाऱ्या प्रवाशांसाठी आरामदायी आणि त्रासमुक्त प्रवास सुनिश्चित करण्यात आला.

**क्विक रिस्पॉन्स टीम्सची तैनाती** : जास्त प्रवासी संख्येच्या अपेक्षेने, गर्दीचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यासाठी आणि सुरळीत बोर्डिंग सुनिश्चित करण्यासाठी क्विक रिस्पॉन्स टीम्स महत्वाच्या स्थानकांवर तैनात करण्यात आल्या आहेत.

## लाच स्वीकारल्याच्या आरोपातून सहकार अधिकाऱ्यांसह दोघांची मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**



चार लाख ५० हजार रुपयांची लाच स्विकारल्याच्या आरोपातून सहकार अधिकाऱ्यांसह दोघांना जिल्हा न्यायाधीश योगेश राणे यांनी मुक्त करण्याचे आदेश दिले.

राहुल रंगराव ठोंबरे आणि अमोल रामलिंग लोंढे (रा. सोलापूर) अशी निर्दोष मुक्त करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत हिराचंद वसंत जोजारे (रा. सोलापूर) यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल केलेल्या तक्रारीवरून पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील तक्रारदार हिराचंद वसंत जोजारे यांचा खाजगी सावकारीचा व्यवसाय होता. यातील आरोपी सहकारी अधिकारी उपनिबंधक सहकारी संस्था राहुल ठोंबरे व खासगी व्यक्ती अमोल लोंढे यांनी तक्रारदारच्या घराची झडती घेवून, पंचनामा करुन कागदपत्रे ताब्यात घेतले. कागदपत्रावरुन खाजगी सावकारी गुन्हा दाखल न करण्यासाठी जोजारे यांच्याकडे दोघांनी ४ लाख ५० हजार रूपयांच्या लाचेची मागणी करून ती पंचासमक्ष मागणी करुन स्वीकारले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. सरकारतर्फे या खटल्यात चार साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीचे वकीलांचा युक्तिवाद मान्य करुन न्यायालयाने दोघांची निर्दोष मुक्तता केली. यात सरकारतर्फे ॲड. प्रकाश जन्नू यांनी तर आरोपीतर्फे ॲड. राहूल खंडाळ यांनी काम पाहिले.

## सिंगल युज प्लास्टिक टाळा!

### स्वच्छता पंधरवड्यात सोलापूर रेल्वे विभागाची जनजागृती मोहीम




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

रेल्वे बोर्डाच्या स्वच्छता पंधरवडा उपक्रमांतर्गत, सोलापूर विभागाने " नो सिंगल युज प्लास्टिक" या विशेष मोहिमेचे आयोजन केले होते. यावेळी सोलापूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे आणि अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार यांच्या उपस्थितीत रेल्वे कार्यालयात या मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला.

सोलापूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करत प्लास्टिकमुळे होणारे पर्यावरणीय धोके लोकांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला. तदनंतर स्वच्छता पंधरवडा कार्यक्रमा दरम्यान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सिंगल युज प्लास्टिकच्या दुष्परिणाम या विषयी जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी स्टेशन, रेल्वे कॉलनी आणि ईतर वसाहतींमध्ये प्रवाश्यांना व कुटुंबीयांना सिंगल युज प्लास्टिक न वापरण्याचा संदेश दिला. तसेच जनजागृतीचा एक भाग म्हणून कापडी पिशव्या वाटण्यात आल्या, त्यावर पर्यावरण विषयक संदेश छापले होते. शेवटी वरिष्ठ विभागीय सुरक्षा अधिकारी यांनी रेल्वे विभागाच्या या उपक्रमामुळे प्लास्टिक मुक्ती संदेश प्रभावीपणे पसरवण्यात येईल, असा विश्वास व्यक्त करत या उपक्रमात सहभाग घेतलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

### महाराष्ट्र महसूल व वन विभाग
### तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात
संकलन अभिलेख कक्ष

दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा. क्र.२०२४/अभिलेख/कवि/८५०/२०२४ दिनांक २३/९/२०२४

#### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्री लिकायत बाशामिया बिराजदार - अर्जदार**
रा. कोर्सेगांव ता. अक्कलकोट
विरूध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कायार्लय - सामनेवाला**
**ग्रामपंचायत, कोर्सेगांव ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील लियाकत बाशामिया बिराजदार ता. अक्कलकोट जि. सोलापूर यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि. ०१/१२/१९६७ रोजी मौजे कार्सेगांव ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाले आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन लियाकत बाशामिया बिराजदार या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनिय २०२३ चे कलम १३ (२)(३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.०८/०८/२०२४ रोजी अर्ज दाखला केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज जि. ०९/१०/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसिलदार, अक्कलकोट**

### जाहीर सूचना

**डॉ. चिटणीस यांचे चिटणीस नर्सिंग होम हे अधिकृतपणे दि. 2019 पासून कार्यरत नाही. सदर दवाखान्याची अंतररुग्ण व बाह्यरुग्ण संबंधित सर्व कागदपत्रांची विल्हेवाट लावण्याचे डॉ. अंजली चिटणीस यांना ठरवले आहे. तरी ज्या रूग्णांना ही कागदपत्रे हवी असतील त्यांनी ती या नोटीसच्या तारखेनंतर १५ दिवसांच्या आत रितसर अर्ज करून घेऊन जाणे. त्यानंतर ही कागदपत्रे उपलब्ध होणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. सदर नोटीस दिली ता. 14.10.2024**

**चिटणीस नर्सिंग होम**
**रामलाल चौक, सोलापूर**

### नावात बदल

माझे लग्नापुर्वीचे जुने नाव **हेमलता शिवाजी होटकर** असे होते ते लग्नानंतर बदलून **सौ. महानंदा मल्लिकार्जुन पाताळे** रा. अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापूर असे ओळखले जाईल . अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर प्रतिज्ञापत्र क्र . ऑफिडेव्हीट नं . बी६/९/२०२४-२४५२६४२५४१२६८५००५४३८२१

### जाहिर निविदा प्रसिध्दीकरण
### करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर
#### जाहिर निविदा प्रसिध्दीकरण सूचना

करमाळा नगरपरिषदेकडील बांधकाम विभागासाठी कामांसाठी **सन २०२४-२५** या आर्थिक वर्षासाठी **अ. क्र. १ ते ६ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) अंतर्गत** करावयाच्या खालील कामांसाठी जाहिर निविदा अनुभवी ठेकेदारांकडून तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | कोरी निविदा किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | चांदगुडे गल्ली येथील न.पा. मुलांची शाळा नं. ४ कोपरा ते बरडे टपरी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९९९३८१.०० | १००००/- | १०००/- |
| २ | चांदगुडे गल्ली येथील बरडे टपरी ते संजय मुरकुटे घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९९८८७४.०० | १००००/- | १०००/- |
| ३ | चांदगुडे गल्ली येथील कल्याण रजपूत ते संजय मुरकुटे घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९९८८७४.०० | १००००/- | १०००/- |
| ४ | चांदगुडे गल्ली येथील रामगुडे घर ते क्षिरसागर घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ६२३२९८.०० | १००००/- | १०००/- |
| ५ | चांदगुडे गल्ली येथील कल्याण रजपूत घर ते महादेव मंदिर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९९९९९९.०० | १००००/- | १०००/- |
| ६ | चांदगुडे गल्ली येथील अभिमान चांदगुडे घर ते राऊत घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. Part - A | ५०१४५१.०० | १००००/- | १०००/- |

१. जाहिर निविदा फॉर्म न.पा. कार्यालयात दि.१५/१०/२०२४ पासून ते दि. २२/१०/२०२४ सायं. ६.०० वाजेपर्यंत विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
२. जाहिर निविदा फॉर्म स्वीकृती दि. १५/१०/२०२४ पासून ते दि.२३/१०/२०२४ दु.४.०० वाजेपर्यंत राहिल.
३. जाहिर निविदा उघडण्याचा दि. २४/१०/२०२४ रोजी दु ४.०० वा. (शक्य झाल्यास).
४. सर्व पात्र/इच्छुक निविदाधारकांसाठी निविदा फॉर्म न.पा.च्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपलब्ध आहेत.

**शर्ती व अटी :-**
१. कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नामंजूर करणेचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.
२. निविदा धारकांनी निविदा फॉर्म लिफाफे दि. २३/१०/२०२४ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत करमाळा नगरपरिषद कार्यालयात जमा करावयाची आहेत.
३. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास याबाबत नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहिल.

**सही/-**
**श्री. आकाश वाघमारे**
**बांधकाम अभियंता**
**करमाळा नगरपरिषद**

**सही/-**
**श्री. सचिन तपसे**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## उत्तम सेवा — मंगळवार दि. १५ ऑक्टोबर २०२४ — नोकरीच्या शोधात

उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, उत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | **(मुदतवाढ)** | | |
| | १) तिकीट सुपरवायझर (१७३६) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | २०/१०/२४ |
| | २) ट्रेन मॅनेजर (३१४४ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | |
| | ३) स्टेशन मास्तर (९९४ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | |
| | ४) टायपिस्ट (१५०७ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३६ पर्यंत | |
| | ५) वरिष्ठ लिपीक (७३२ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३६ पर्यंत | |
| २) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | **(मुदतवाढ)** | | |
| | १) लिपीक (२०२२ पदे) | बारावी (५०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | ३३ पर्यंत | २७/१०/२४ |
| | २) अकौंट क्लर्क (३६१ पदे) | बारावी (५०%) व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३३ पर्यंत | |
| | ३) कनिष्ठ लिपीक (९९० पदे) | बारावी (५०%) व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३३ पर्यंत | |
| | ४) ट्रेन क्लर्क (७२ पदे) | बारावी (५०%) गणांसह उत्तीर्ण असावे | ३३ पर्यंत | |
| ३) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | **(गट-ब)** | | |
| | १) कर निरीक्षक (२०९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | ०४/११/२४ |
| | २) कक्ष अधिकारी (५५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) पोलिस उपनिरीक्षक (२१६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३१ पर्यंत | |
| ४) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | **(गट-क)** | | |
| | १) लिपीक (७८६ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ०४/११/२४ |
| | २) कर सहाय्यक (४८२ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| | ३) तांत्रिक सहाय्यक (०९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| | ४) नगरपाल (१७ पदे) | पदवी व मराठी/इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| | ५) उद्योग निरीक्षक (३९ पदे) | पदवी/पदविका (इंजिनियरींग)/B.Sc | ३८ पर्यंत | |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ५) | **समाजकल्याण आयुक्तालय, पुणे** | | | |
| | १) अधीक्षक- महिला (९२ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | ११/०४/२४ |
| | २) अधीक्षक- सर्वसाधारण (६१) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) समाजकल्याण निरीक्षक (३९) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ४) वरिष्ठ निरीक्षक (०५ पदे) | पदवी व MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ५) लघुलेखक (२२ पदे) | दहावी व टायपिंग-स्टेनो उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| ६) | **महिला व बालविकास विभाग, WCD** | | | |
| | १) परिविक्षा अधिकारी (७२ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | ०३/११/२४ |
| | २) वरिष्ठ लिपीक (५६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| | ३) वाहक (३६ पदे) | दहावी उत्तीर्ण असणारे उमेदवार | ३८ पर्यंत | |
| | ४) स्वयंपाकी (०६ पदे) | दहावी उत्तीर्ण असणारे उमेदवार | ३८ पर्यंत | |
| | ५) क. संरक्षण अधिकारी (५७) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| | ६) लघुलेखक (०३ पदे) | दहावी व टायपिंग-स्टेनो उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| | ७) संरक्षण अधिकारी (०२ पदे) | MSW व ३ वर्षे अनुभव आवश्यक | ३८ पर्यंत | |
| ७) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | **(नगरविकास विभाग)** | | |
| | सहाय्यक रचनाकार (१४८ पदे) | B.E (सिव्हील/आर्किटेक्चर) उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ०४/११/२४ |
| ८) | **युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि., UIIC** | | | |
| | ॲडमिनीस्ट्रेटिव ऑफिसर (२००) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०५/११/२४ |
| ९) | **नॅशनल बँक ऑफ ॲग्रीकल्चर ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट, NABARD** | | | |
| | ऑफिस अटेंडंट (१०८ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३० पर्यंत | २१/१०/२४ |
| १०) | **रेल्वे रिक्रुटमेंट सेल, RRC** | **(ॲप्रेंटिस करण्याकरिता)** | | |
| | ॲप्रेंटिस (५०६६ पदे) | दहावी व ITI (इले./इलेक्ट्रॉ/फिटर/वेल्डर/टर्नर/पेंटर/मशिनिस्ट/डिझेल/मोटार/वायरमन/एसी/प्लंबर) उत्तीर्ण | २४ पर्यंत | २२/१०/२४ |
| ११) | **बृहन्मुंबई महानगरपालिका** | | | |
| | निरीक्षक (१७६ पदे) | पदवी व मराठी-इंग्रजी टायपिंग तसेच MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | १९/१०/२४ |
| १२) | **अन्न व औषध प्रशासन विभाग, FDA** | | | |
| | वरिष्ठ तांत्रिक सहा. (३७ पदे) | पदवी (फार्मासी) उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | २२/१०/२४ |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

उत्तम सेवा १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. www.uttamseva.org

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### शशी थरूर यांनी केले संजू सॅमसनचे स्वागत



**तिरुअनंतपूरम** : सोमवारी काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी भारतीय क्रिकेटपटू संजू सॅमसन याची भेट घेऊन त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली व शाल देऊन त्याचा गौरव केला. अलीकडेच हैदराबादमध्ये खेळल्या गेलेल्या बांगलादेशविरुद्धच्या टी-२० सामन्यात संजू सॅमसनने सामना जिंकणारी १११ धावांची शतकी खेळी केली होती. त्यामुळे भारताला टी-२० क्रिकेटच्या इतिहासात दुसऱ्या क्रमांकाची (६ बाद २९७) नोंदवण्यात मदत झाली. भारताने ३-० ने टी-२० मालिका जिंकली. सॅमसनचे हे फॉरमॅटमधील पहिले शतक होते आणि भारतीय फलंदाजाचे दुसरे सर्वात जलद शतक होते. जबरदस्त शतकानंतर सॅमसन तिरुअनंतपुरमला परतला, तेव्हा त्याला सन्मानित करण्यासाठी थरुर त्याच्या घरी पोहोचले.

### महेला जयवर्धने पुन्हा मुंबई इंडियन्सचा मुख्य प्रशिक्षक



**मुंबई** : श्रीलंकेचा माजी कर्णधार महेला जयवर्धने याने मुंबई इंडियन्स संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून पुनरागमन केले आहे, असे फ्रॅन्चायझीने जाहीर केले. जयवर्धनेने २०१७ ते २०२२ या कालावधीत मुंबई इंडियन्सचे प्रशिक्षकपद भूषवले होते, या दरम्यान त्याने आपल्या पहिल्या सत्रासह मुंबईला तीन वेळा आयपीएल विजेतेपद पटकावले होते. त्यानंतर त्याच्या जागी दक्षिण आफ्रिकेचा माजी यष्टिरक्षक मार्क बाऊचर आला, परंतु मुंबई इंडियन्सने बाऊचरच्या मार्गदर्शनाखाली अपेक्षित कामगिरी केली नाही. गत वर्षी साखळी फेरीतून संघ बाहेर झाला होता. त्यामुळे जयवर्धनेला परत आणण्यात आले आहे. गत मोसमापूर्वी मुंबई इंडियन्स संघ व्यवस्थापनाने कर्णधार रोहित शर्माच्या जागी अष्टपैलू हार्दिक पांड्याला स्थान दिले होते, त्यामुळे चाहत्यांची निराशा झाली होती, परंतु १० संघांच्या आयपीएलमध्ये त्यांचे नशीब फिरू शकले नाही. मुंबई इंडियन्सला १४ पैकी १० साखळी सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला.

### सुमतीबाई स्कूलच्या गौरव चव्हाण याची शालेय राज्य योगासन स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोंबर-**



पी. एस. इंग्लिश मीडियम स्कूलच्या गौरव चव्हाण याची राज्य योगासन स्पर्धेसाठी निवड झाली. करमाळा येथे झालेल्या पुणे विभागीय योगासन स्पर्धेत ट्रॅडिशनल प्रकारात त्याने चतुर्थ व आर्टिस्टिकमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला. या कामगिरीवर त्याची निवड झाली. त्यास क्रीडाशिक्षक अजित पाटील, रोहन घाडगे व सोमनाथ मगर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सचिव हर्षवर्धन शहा, मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांनी अभिनंदन केले.

# विदर्भ रणजी संघाची विजयी सलामी

### आंध्रप्रदेशवर ७४ धावांनी मात

### आदित्य ठाकरे, हर्ष दुबेचा प्रभावी मारा

### शतकवीर अथर्व तायडे सामनावीर

◆ **नागपूर, १४ ऑक्टोबर**

मध्यम गती वेगवान गोलंदाज आदित्य ठाकरे व डावखुरा फिरकी गोलंदाज हर्ष दुबेच्या भेदक गोलंदाजीच्या बळावर विदर्भने एलिट ब गटात सलामीच्या सामन्यात आंध्रप्रदेशवर ७४ धावांनी मात करून प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट हंगामात आपली विजयी सुरुवात केली. शतकवीर अथर्व तायडे सामनावीर ठरला. अक्षय वाडकरच्या नेतृत्वाखालील विदर्भ संघाने पहिला विजय नोंदवून ६ गुणांची कमाई केली.

एलिट ब गटात या ब गटात हिमाचल प्रदेश ८ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. गुजरात व विदर्भाचे प्रत्येकी ६ गुण असून सरस धवगतीच्या आधारावर ते अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत.

सामन्याच्या शेवटच्या दिवशी आंध्रप्रदेश संघाने दुसरा डाव ७९ धावांवरून पुढे खेळणे सुरू केले. अभिषेक रेड्डी (७८), शेख रशीद (७८), हनुमा विहारी (२२) व कर्णधार रिकी भुई (२६) व के. व्ही. शशिकांतने (२५) संयमाने फलंदाजी करत संघाच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या, परंतु विदर्भाच्या गोलंदाजांनी प्रभावी मारा करत सामन्याचा कल आपल्या बाजूने झुकविला. आदित्य ठाकरे व हर्ष दुबेने प्रत्येकी ४ बळी, तर अक्षय वखरेने २ बळी टिपलेत.

दिवसाच्या सुरुवातीला अभिषेक रेड्डीला रशीदने चांगली साथ दिली. परंतु विदर्भाचे आदित्य ठाकरे व हर्षल दुबे यांच्या भेदक गोलंदाजीसमोर आंध्रप्रदेश संघाचे खेळाडू टिकाव धरू शकले नाही. काही वेळेच्या अंतराने गडी बाद होण्याचा क्रम कायम होता.



आंध्रचे ४ खेळाडू टिपणारा विदर्भाचा गोलंदाज आदित्य ठाकरे आनंदोत्सव साजरा करताना

विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या सिव्हिल लाईन्स येथील मैदानावर सुरू असलेल्या रणजी चषक स्पर्धेत आंध्रप्रदेश संघाला पराभवाचा सामना करावा लागला.

विदर्भ संघाकडून ठाकरे व दुबे यांनी प्रत्येकी ४-४ गडी बाद केले, तर अक्षय वखरे याने २ गडी टिपले. आंध्रप्रदेशचा संघ २४३ धावा काढू शकला. विदर्भने ७४ धावा राखून विजय प्राप्त केला.

आंध्रप्रदेशचा अभिषेक ७८ धावांवर बाद झाला, तर रशीदने ७४ धावा काढल्या. या दोघांच्या ४९ धावांच्या भागीदारीमुळे आंध्रप्रदेश संघाने सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र विदर्भाच्या गोलंदाजीपुढे आंध्रचे फलंदाज टिकाव धरू शकले नाहीत. कर्णधार रिकी भुई याने २६, हनुमा विहारी याने २२, के. ससिकांत याने २५ धावा काढल्या. टी. विजय, ललित मोहन, पी. राजू एकही धाव काढू शकले नाहीत.

तत्पूर्वी, पहिल्या डावात विदर्भने सर्व गडी बाद ११८, तर आंध्रप्रदेश संघाने १६७ धावा काढल्या होत्या. दुसऱ्या डावात विदर्भातर्फे अथर्व तायडेने १५ चौकार व २ षटकारांच्या साहाय्याने ११८ धावा काढल्या. त्यामुळे विदर्भ संघ ३६६ धावा काढू शकला. अथर्व तायडेला सामनावीर घोषित करण्यात आले.

आंध्रप्रदेश संघाला विजयासाठी ३१८ धावा पाहिजे होत्या. ९ गडी शिल्लक होते. मात्र विदर्भाच्या गोलंदाजी पुढे आंध्रप्रदेशचे फलंदाज टिकाव धरू शकले नाहीत. ◂(तभा वृत्तसेवा)

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑलिम्पिक खेळाडूंचा सन्मान

### नागपूरच्या दिव्या देशमुखला १ कोटी, स्वप्निल कुसळेला २ कोटी, सचिन खिलारीला ३ कोटींचा धनादेश

◆ **मुंबई, १४ ऑक्टोबर**

पॅरिस, फ्रान्स येथे यावर्षी झालेल्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत पदकप्राप्त खेळाडूंना सह्याद्री अतिथीगृह येथे सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या हस्ते धनादेश व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर रायफल थ्री पोझीशन या नेमबाजी प्रकारात कास्यपदक प्राप्त करणाऱ्या स्वप्निल कुसळे व पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये गोळाफेक प्रकारात रौप्यपदक प्राप्त करणाऱ्या सचिन खिलारी या खेळाडूंचा तसेच स्वप्निलचे प्रशिक्षक दीपाली देशपांडे व सचिनचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले.

राज्य शासनाने नुकत्याच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडू व प्रशिक्षकांच्या पारितोषिकाच्या रकमेत केलेल्या भरघोस वाढीच्या पृष्ठभूमीवर पॅरिस, ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजी स्पर्धेमधील कांस्यपदकविजेत्या स्वप्निल कुसळे यास २ कोटी रुपये तसेच त्यांच्या प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांना २० लाख रुपये व पॅराऑलिम्पिक स्पर्धेमधील रौप्यपदक विजेत्या सचिन खिलारीला ३ कोटी रुपये तसेच त्यांचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना ३० लाख रुपयांचा धनादेश व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.



नागपूरच्या दिव्या देशमुखला एक कोटीचा धनादेश प्रदान करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार

बुडापेस्ट, हंगेरी येथे नुकत्याच झालेल्या ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या संघाने सुवर्णपदक संपादन करून ऐतिहासिक कामगिरी केली. या संघात राज्याचे बुद्धिबळपटू विदित गुजराथी व नागपूरच्या दिव्या देशमुख यांचा समावेश होता. या दोन्ही खेळाडूंचा राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी एक कोटी रुपये रोख व त्यांचे मार्गदर्शक अनुक्रमे संकल्प गुप्ता व अभिजीत कुंटे यांना प्रत्येकी १० लाख रुपये इतकी रक्कम व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

विदित गुजराथी स्पर्धेकरिता विदेशात असल्यामुळे त्याच्यावतीने त्यांचे वडील डॉ. संतोष गुजराथी यांनी, तर अभिजीत कुंटे यांच्या वतीने त्यांच्या पत्नी मेघना कुंटे आणि संकल्प गुप्ता यांच्यावतीने त्यांचे वडील संदीप गुप्ता यांनी सन्मान स्वीकारला. ◂(तभा वृत्तसेवा)

# सिंधूचे लक्ष्य पुन्हा फॉर्म मिळवण्याचे

### डेन्मार्क ओपन बॅडमिंटन आजपासून

◆ **ओडेन्स, १४ ऑक्टोबर**

भारतीय बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू व लक्ष्य सेन मंगळवारपासून सुरू होणाऱ्या डेन्मार्क ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत पुन्हा फॉर्म मिळवण्यासाठी उत्सुक असतील.

गत आठवड्यात फिनलंडमधील वांता येथे झालेल्या आर्क्टिक ओपनमध्ये दोन्ही खेळाडूंना खेळणे अवघड झाले होते, यात माजी विश्वविजेती सिंधूला पहिल्या फेरीतून बाहेर पडावे लागले, तर २०२१ च्या विश्व स्पर्धेतील कांस्यपदक विजेता लक्ष्य सेन दुसऱ्या फेरीतच पराभूत झाला.

जागतिक बॅडमिंटन महासंघाच्या २०२४ च्या जागतिक स्पर्धा वेळापत्रकातील ओडेन्स येथील एरिना फिन येथे होणाऱ्या या १३ व्या प्रतिष्ठित स्पर्धेत भारतीय बॅडमिंटनपटूंना अधिक चांगल्या निकालांची आशा आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिलेल्या लक्ष्य सेनने गत आठवड्यात चीन तैपेईच्या चौ तिएन चेनशी झुंज दिली होती, या स्पर्धेत अल्मोराच्या २३ वर्षीय लक्ष्य सेनचा सलामीचा सामना चीनच्या लू गुआंग झू याच्याशी होईल. सेनने आगेकूच केली तर दुसऱ्या फेरीत त्याचा सामना इंडोनेशियाच्या जोनाटन क्रिस्टीशी होऊ शकतो, विद्यमान विश्वविजेता थायलंडचा विटिडसार्न उपांत्यपूर्व फेरीत त्याची वाट पाहत असेल.



दोन वेळा ऑलिम्पिक पदकविजेत्या सिंधूला पहिल्या फेरीत कॅनडाच्या मिशेल ली हिच्याकडून निराशाजनक पराभव झाल्यानंतर तिच्या कामगिरीवर परिणाम करणाऱ्या समस्यांकडे त्वरीत लक्ष देणे आवश्यक आहे.

नवीन प्रशिक्षक अनुप श्रीधर व कोरियाची ली ह्यून-इल यांच्या मार्गदर्शनाखाली सिंधू चीन तैपेईच्या पै यू पोविरुद्ध खेळेल व हा सामना जिंकल्यास सिंधू दुसऱ्या फेरीत चीनच्या हान यूशी होऊ हिच्याविरुद्ध खेळेल.

सिंधूशिवाय भारताकडून महिला एकेरीत फॉर्ममध्ये असलेली नागपूरची मालविका बनसोड, आकर्षी कश्यप व उन्नती हुडा सुद्धा खेळणार आहे. मालविकाची पहिली लढत व्हिएतनामच्या गुयेन थुई लिन्हशी होईल, तर कश्यपचा सामना थायलंडच्या सुपानिडा कातेथोंगशी होईल. २०२२ ओडिशा ओपन विजेता हुड्डाता पहिला सामना अमेरिकेच्या लॉरेन लॅमशी होईल.

महिला दुहेरीच्या पहिल्या फेरीत ट्रिसा जॉली व गायत्री गोपीचंद ही भारतीय जोडी पाचव्या मानांकित पर्ली टॅन व थिना मुरलीधरन या मलेशियान जोडीशी लढतील.

स्वेतापर्णा व ऋतपर्णा या म भगिनीचा सामना चीन तैपेईच्या चांग चिंग हुई व यांग चिंग तुंगशी होणार आहे.

मिश्र दुहेरीत बी. सुमित रेड्डी व एन. सिक्की रेड्डी या पती-पत्नी जोडीचा सामना कॅनडाच्या केविन ली आणि एलियाना झांग यांच्याशी होणार आहे, तर सतीश करुणाकरन आणि आद्य वरियथ यांचा सामना इंडोनेशियाच्या रेहान कुशारजंटो लिसा कुसुमावती यांच्याशी होईल. ◂(वृत्तसंस्था)

# तिलक वर्मा भारत 'अ' संघाचा कर्णधार

### इमर्जिंग आशिया चषक टी-२० स्पर्धेसाठी संघ जाहीर

◆ **नवी दिल्ली, १४ ऑक्टोबर**

आगामी १८ ते २७ ऑक्टोबर या कालावधीत मस्कत, ओमान येथे होणाऱ्या पुरुषांच्या टी-२० इमर्जिंग आशिया चषक सांघिक क्रिकेट स्पर्धेसाठी बीसीसीआयने भारत अ संघाची घोषणा केली असून मुंबई इंडियन्सचा स्टार खेळाडू तिलक वर्मा संघाचे नेतृत्व करणार आहे, तर अभिषेक शर्मा संघाचा उपकर्णधार म्हणून काम पाहणार आहे.

२१ वर्षीय तिलक वर्माने चार वन-डे व १६ टी-२० सामन्यांचा अनुभव घेतला आहे, तर शर्माने आठ टी-२० सामने खेळला आहेत. या संघात लेगस्पिनर राहुल चहरचाही समावेश आहे. चहरने भारतासाठी सहा टी-२० आणि एक वन-डे सामना खेळला आहेत.



कर्णधार तिलक वर्मा



उपकर्णधार अभिषेक शर्मा

भारत अ संघात आयपीएलचा अनुभव असलेले अनेक खेळाडू आहेत, यात पंजाबचा प्रभसिमरन सिंग, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा अनुज रावत, लखनौ सुपर जायण्ट्सचा आयुष बदोनी, कोलकाता नाईट रायडर्सचा रमणदीप सिंग आणि मुंबई इंडियन्सचा नेहल वढेरा यांचा समावेश आहे.

गोलंदाजी विभागात, संघात वैभव अरोरा (केकेआर), आर. साई किशोर (गुजरात टायटन्स), हृतिक शोकीन (मुंबई इंडियन्स), रसिक सलाम (दिल्ली कॅपिटल्स) आणि आकिब खान यांचा समावेश आहे. या स्पर्धेत भारत अ संघाला ब गटात स्थान मिळाले आहे. भारत अ संघ १९ ऑक्टोबर रोजी मस्कत येथील ओमान क्रिकेट अकादमी मैदानावर पाकिस्तानविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल.

भारताच्या ब गटात ओमान आणि यूएई संघांचा समवेश आहे, तर अ गटात अफगाणिस्तान अ, बांगलादेश अ, हाँगकाँग आणि श्रीलंका अ संघांचा समावेश आहे. ही स्पर्धा पहिल्यांदाच टी-२० स्वरूपात खेळवली जाईल. मागील आवृत्त्या ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये झाल्या होत्या.

**भारत अ संघ** : तिलक वर्मा (कर्णधार), अभिषेक शर्मा (उपकर्णधार), प्रभसिमरन सिंग (यष्टिरक्षक), निशांत सिंधू, रमणदीप सिंग, नेहल वढेरा, आयुष बदोनी, अनुज रावत (यष्टिरक्षक), साई किशोर, हृतिक शोकीन, राहुल चहर, वैभव अरोरा, अंशुल कम्बोज, आकिब खान, रसिक सलाम. ◂(वृत्तसंस्था)

# २६ वर्षानंतर प्रथमच बडोद्याची मुंबईवर मात

### फिरकीपटू भार्गव भट्टचे १० बळी

◆ **वडोदरा, १४ ऑक्टोबर**

रणजी करंडक हंगामामम्या सलामीमम्या सामन्यात बडोद्याच्या डावखुरा फिरकी गोलंदाज भार्गव भट्टने मुंबईच्या फलंदाजांना आपल्या जाळ्यात ओढले. भार्गवने केलेल्या प्रभावी फिरकीच्या जोरावर बडोद्याने २६ वर्षानंतर प्रथमच रणजी सामन्यात गतविजेत्या मुंबईवर ८४ धावांनी विजय नोंदविला. भार्गवने पहिल्या डावात ५३ धावांत ४ बळी व दुसऱ्या डावात ५५ धावांत तब्बल ६ बळी असे एकूण १० बळी टिपण्याची किमया केली. त्यालाच सामनावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला.



बडोद्याने मुंबईसमोर विजयासाठी २६२ धावांचे लक्ष्य ठेवले होते, परंतु भार्गव भट्टसह महेश पीठिया (२ बळी) व ज्योत्सनील सिंगने (१ बळी) अचूक मारा करत मुंबईच्या फलंदाजांना लक्ष्य गाठण्याआधीच तंबूत परत पाठविले. सिद्धेश लाडने तेवढी ५९ धावांची व श्रेयस अय्यरने तेवढी ३० धावांची मोठी खेली केली, परंतु पृथ्वी शॉ, अजिंक्य रहाणे (१२), शम्स मुलानी (१२), शार्दुल ठाकूर (८) व तनुष कोटियानसारखे (१) अनुभवी फलंदाज बडोद्याच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरू शकले नाहीत.

पश्चिम विभागीय प्रतिस्पर्ध्यांमधील ६६ सामन्यात बडोद्याने मुंबईला केवळ चार वेळा पराभूत केले होते, शेवटचा विजय १९९८-९९ मध्ये आला होता. त्यानंतर आता बडोद्याने मुंबईवर विजय नोंदविला. ◂(वृत्तसंस्था)



### सॉफ्टबॉल स्पर्धेत द. का. आसावा प्रशाला दुहेरी मुकुटाचा मानकरी

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

शालेय शहर सॉफ्टबॉल स्पर्धेत दयानंद काशिनाथ असावा प्रशालेने १४ वर्षांखालील मुलींबरोबरच १७ वर्षांखालील मुलींच्या गटातही विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

मल्लिकार्जुन प्रशालेच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत त्यांनी सुरुवातीचा सामना एसव्हीसीएस प्रशालेबरोबर एक डाव व १२ धावेच्या फरकाने एकतर्फी विजय मिळवून अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात मल्लिकार्जुन प्रशालेस ११ धावेच्या फरकाने हरविले. यात साक्षी मोदाणी, वैष्णवी बजरंगी, आदिती चौगुले, अक्षरा कापसे या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांना क्रीडाशिक्षका मनीषा पाटील व क्रीडाशिक्षक प्रमोद कुनगुलवार यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्या संघास संस्थेचे स्थानीय सचिव महेशजी चोपडा, मुख्याध्यापक जितेंद्र पवार, पर्यवेक्षक संतोष हंपे यांनी अभिनंदन केले.

### तामिळनाडूची सौराष्ट्रवर एक डाव, ७० धावांनी मात

◆ **कोईम्बतूर, १४ ऑक्टोबर**

गुरजपनीत सिंगने स्वप्नवत पदार्पण करत २२ धावांत ६ बळी टिपण्याची शानदार कामगिरी केली. येथे झालेल्या रणजी करंडक स्पर्धेच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात सोमवारी गुरजपनीतच्या शानदार कामगिरीच्या बळावर तमिळनाडूने सौराष्ट्र संघावर एक डाव वर ७० धावांनी विजय नोंदविला.

तामिळनाडूला पुन्हा दुसऱ्या डावात फलंदाजी करण्यासाठी सौराष्ट्रला आणखी १२९ धावांची गरज होती, त्यांनी ५ बाद ३५ धावांवरून आपल्या शेवटच्या दिवसाचा खेळ सुरू केला, परंतु ९० मिनिटांतच त्यांचा दुसरा डाव ९४ धावांवर आटोपला. ◂(वृत्तसंस्था)

# कुमार गटात वेळापूर, मुलींच्या गटात वाडीकुरोली विजेते





### जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत कुमार गटात वेळापूरच्या (ता. माळशिरस) अर्धनारी नटेश्वर क्लबने तर मुलींच्या गटात वाडीकुरोलीच्या (ता. पंढरपूर) कल्याणराव काळे स्पोर्टस् क्लबने विजेतेपद पटकाविले.


वेळापूर येथील पालखी मैदानावर झालेल्या कुमार गटाच्या अंतिम सामन्यात वेळापूरने किरण स्पोर्टस् सोलापूरला १३-१२ असे ६ मिनिटे १० सेकंद राखून नमविले. मध्यंतरासच त्यांनी १२-४ अशी ८ गुणाची निर्विवाद आघाडी घेतली होती. मुलींच्या गटात वाडीकुरोलीने वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्लबला २०-११ असे ९ गुणांनी हरविले. मध्यंतराची ११-७ ही ४ गुणाची आघाडीच त्यांनी विजय मिळवून दिली.

तृतीय स्थान कुमार गटात शिवप्रतिष्ठान मंगळवेढा व मुलींच्या गटात किरण स्पोर्टस् क्लबने संपादिले. त्यांनी अनुक्रमे उत्कर्ष क्रीडा मंडळ व विकास विद्यालय अजनाळेवर विजय मिळविला.

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन वेळापूर येथील इंग्लिश स्कूलचे कमिटीचे चेअरमन प्रतापराव पाटील, मुख्याध्यापक रमेश पवार, सरपंच रजनीश बनसोडे, सदस्य आबा मंडले, त्रिमूर्ती केसरी बापूसाहेब मंडले विनायक चंदनशिव, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे व खो-खो असोसिएशनचे सचिव ए. बी. संगवे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष सुनील चव्हाण, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सहसचिव राजाराम शितोळे, मोहन रजपूत, पंच मंडळ सचिव गोकूळ कांबळे, सदस्य शिवशंकर राठोड, पुंडलिक कलखांबकर तसेच निवड समिती सदस्य शरद व्हनकडे, संतोष कदम व अजित शिंदे आदी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत सोमनाथ बनसोडे, जावेद आत्तार व शिवाजी जाधव यांनी केले. सतीश कदम यांनी सूत्रसंचालन केले.

### सुयश गुरुकूलच्या श्रेया जाधव हिची पुणे विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**



कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या शालेय शहर बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सुयश गुरूकुलच्या श्रेया जाधव हिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला बुद्धिबळ प्रशिक्षक इरण्णा जमादार व क्रीडा शिक्षक नितीन खांडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थेचे सचिव केशव शिंदे, प्राचार्या विद्या शिंदे व मुख्याध्यापिका श्रद्धा लकडे यांनी अभिनंदन केले.



# पडत्या पावसात सांगोलकरांच्या प्रेमात न्हाऊन निघालो

**माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१४ ऑक्टोबर-**
हाताला काम आणि आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून आपल्या जन्मभूमीपासून शेकडो मैल दूर पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात येऊनही सांगोलकरांनी आपल्या जन्मभूमीतील नेत्याचे धो धो कोसळणाऱ्या पावसातही प्रचंड प्रमाणात स्वागत केल्याने मातृभूमीतील आपल्या लोकांच्या प्रेमाने अक्षरशः मी न्हाऊन गेलो आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी केले. रविवारी पुणे येथील नवले लॉन्स येथे पार पडलेल्या सांगोलकरांच्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.

जन्मभूमीपासून शेकडो मैल दूर असणाऱ्या कोलकत्ता, हैद्राबाद, बंगलोर, मुंबई आणि पुण्यातील सांगोलकरांनी जो माझ्यावर विश्वास दर्शवला आहे त्याला कधीही तडा जाऊ देणार नाही. तसेच केवळ निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मी तुमच्याशी संवाद साधणार नाही तर दरवर्षी दसरा ते दीपावली दरम्यान पुणे येथे तमाम सांगोलकरांचा स्नेहमेळावा आयोजित करणार असल्याचे अभिवचनही शेवटी दिपकआबा साळुंखे-पाटील यांनी उपस्थितांना दिले. दरम्यान स्नेहमेळावा सुरू असतानाच मुसळधार पावसाने हजेरी लावली तरी एकही सांगोलकरांनी आपली जागा सोडली नाही.या सभेला सांगोला तालुक्यातील प्रत्येक गाव खेड्यातील नागरिक, महिला, तरूण वर्ग यांनी उपस्थिती मोठ्या संख्येने लावली होती.

### सांगोल्यातील विद्यार्थिनींना मोफत वसतिगृहाचे काम अंतिम टप्प्यात

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी व नोकरीच्या मुलाखतीसाठी सांगोला येथून पुण्यात आलेल्या गरीब आणि गरजू विद्यार्थिनीना हक्काचा निवारा मिळावा व त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी पुणे येथे मोफत पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने वसतिगृह निर्माण करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. दीपावलीनंतर हे मोफत वसतिगृह विद्यार्थिनींना वापरण्यासाठी खुले करण्यात येईल

**- मुक्तादीदी गायकवाड**

# आचारसंहिता निरीक्षण, नियंत्रण पथकांची तयारी सुरु

## विधानसभा निवडणूक; बार्शीचे तहसीलदार शेख यांची महत्त्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ ऑक्टोबर-**
आगामी विधानसभा निवडणुका २०२४ च्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी प्रशासनाच्या तयारीला वेग आला आहे. बार्शीतील तहसीलदार एफ. आर. शेख यांच्या अध्यक्षतेखाली आज आचारसंहिता निरीक्षण व नियंत्रण पथकांच्या रचना आणि त्यांच्या कार्याबाबत एक महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत निवडणुकीसाठी प्रशासनाने आखलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती देण्यात आली.

तहसीलदार शेख यांनी बैठक सुरु करताच आचारसंहिता अंमलबजावणीवर विशेष जोर देण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी निवडणूक काळात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती टिकवून ठेवण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सजग राहण्याचे निर्देश दिले. तसेच आचारसंहिता उल्लंघनाच्या कोणत्याही घटनेवर त्वरित आणि कठोर कारवाई करण्याचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीत आचारसंहिता अंमलबजावणीसाठी नियंत्रण पथकांची रचना जाहीर करण्यात आली. विविध पथकांना विशिष्ट कार्यक्षेत्र दिले गेले असून प्रत्येक पथकाला वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने आचारसंहिता उल्लंघनाच्या प्रकरणांची तपासणी, प्रचार साहित्याची पाहणी, बेकायदा फलक उभारणीवर नियंत्रण, सरकारी यंत्रणांच्या दुरुपयोगावर देखरेख इत्यादी बाबींचा समावेश आहे. प्रत्येक पथकात महसूल, पोलीस, नगरपरिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी सहभागी असून त्यांनी निवडणूक काळात कोणतीही गडबड होऊ नये याची काळजी घेण्याची जबाबदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

आगामी निवडणुकांमध्ये आचारसंहिता उल्लंघनाच्या तक्रारी तत्काळ नोंदविण्यासाठी व त्यावर कार्यवाही करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. हा कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून तक्रारींची नोंदणी, त्याचे वर्गीकरण आणि संबंधित पथकाला माहिती देण्याचे काम केले जाईल. यासाठी एक स्वतंत्र हेल्पलाईन क्रमांक देखील जाहीर करण्यात येणार आहे, ज्याद्वारे नागरिक तक्रारी नोंदवू शकतील. बैठकीत नागरिकांना आचारसंहितेचे महत्त्व पटवून देण्यासाठी जनजागृती मोहीम राबविण्याची योजना तयार करण्यात आली आहे. विविध माध्यमांद्वारे जनतेला मतदान प्रक्रियेची माहिती, आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार कशी करावी, अशा विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.



### विशेष पथके तैनात

तहसीलदारांनी निवडणुकीच्या काळात बार्शीत सुरक्षिततेसाठी विशेष पथके नेमण्याची सूचना केली. या पथकांमध्ये पोलिसांचा समावेश असेल आणि ते मतदान केंद्रांवर तसेच संवेदनशील भागात तैनात राहतील. आचारसंहिता उल्लंघनाच्या घटनांवर नजर ठेवण्यासाठी व्हिजिलन्स पथकांचीही स्थापना करण्यात येणार आहे.

### प्रशासन सज्ज

बैठकीला बार्शीतील पोलीस अधिकारी, महसूल अधिकारी, नगरपरिषद अधिकारी, निवडणूक निरीक्षक आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीतून निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या तयारीची झलक मिळाली असून, निवडणुका शांततामय वातावरणात पार पडाव्यात यासाठी सर्व विभाग सज्ज आहेत.

### आचारसंहितेचे पालन करा

तहसीलदार एफ. आर. शेख यांनी नागरिकांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करुन शांततामय निवडणूक प्रक्रियेचे समर्थन करण्याचे आवाहन केले. 'प्रत्येक नागरिकाचा मतदान हा हक्क असून, त्याचा योग्य प्रकारे वापर करणे ही आपली जबाबदारी आहे. आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



# 'सिंहगड'मध्ये मानसिक आरोग्य दिन साजरा

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**
केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड कालेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयात युवक युवतींना समुपदेशन करुन जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा केला. मानसिक आरोग्य दिनानिमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

मानसशास्त्रीय समुपदेशक डॉ. संगीता पाटील यांनी शैक्षणिकसह इतर समस्यांना तोंड देताना कसे सामोरे जायचे यावर मार्गदर्शन केले. यातून विद्यार्थ्यांना मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यात मदत होणार आहे. दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी मानसिक आरोग्य शिक्षणाविषयी जनजागृती करण्यासाठी साजरा केला जातो. त्या अनुषंगाने महाविद्यालयात समुपदेशन पर कार्यक्रम आयोजित केला. यावेळेस प्राचार्य डॉ. शंकर नवले, प्रा. बीटेकच्या प्रथम वर्षाचा विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सत्र झाले. भावनिक निरोगीपणा आणि आनंद वाढवणे हा या सत्राचा उद्देश होता. डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना ताणतणाव, अतिविचार आणि सकारात्मकता कशी आणावी, अभ्यास, मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करावे याबद्दल मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.एस.डी.नवले यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे मार्गदर्शन केले. प्रत्येक आठवड्यात एक दिवस मानसशास्त्रीय समुपदेशक डॉ. संगीता पाटील हे महाविद्यालय येणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी, काही अडचणी असल्यास युवक - युवतींसाठी डॉ. पाटील वेळ देणार आहेत. काही प्रश्न असतील ते लिखित स्वरूपात मांडू शकता, स्वतःचा नामोल्लेख न करताही आपली प्रायव्हसी जपून ही विद्यार्थी भेटू शकता, याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन विद्यार्थी ओंकार बिल्ला याने केले तर आभार प्रा. के.एस.पाटील (एचओडी एफवाय .बी.टेक) यांनी मानले. सत्रासाठी प्राध्यापक आणि सर्व प्रथम वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतीसाठी उजनीतून जानेवारीदरम्यान पहिले आवर्तन


## उजनी धरणातून सोडलेले कॅनॉलचे पाणी बंद; धरणात सध्या १२३ टीएमसी पाणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, १४ ऑक्टोबर-**
सध्या उजनी धरण १११ टक्के भरले असून, धरणात १२३ टीएमसी पाणी आहे. ४ ऑगस्टपासून कॅनॉलमधून सोडलेले पाणी आता मंगळवारी (ता. १५) बंद केले . १५ ऑक्टोबरला धरणात जेवढा साठा असेल, त्या पाण्याचे नियोजन करून आवर्तने निश्चित केली जातात. ऑक्टोबरअखेर कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आवर्तनांचा निर्णय होईल, पण १५ डिसेंबरनंतर शेतीसाठी पहिले आवर्तन सोडण्यात येणार आहे.

उजनी धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर ४ ऑगस्टपासून कॅनॉलमधून पाणी सोडण्यात आले. याशिवाय दहिगाव, सीना-माढा उपसा सिंचन योजनांमधूनही पाणी सोडण्यास सुरवात झाली. धरणावरील विद्युत प्रकल्पासाठी देखील दररोज १६०० क्यूसेक पाणी सोडण्यात आले. आता केवळ कॅनॉलमधीलच पाणी सुरू असून, तेही आता १५ ऑक्टोबर रोजी बंद केले आहे. मागील अडीच महिन्यांपासून धरणातून पाणी सोडण्यात आले असून, समाधानकारक पाऊस झाल्याने ते पाणी नदीच्या दिशेनेच वाहून गेले.

आता पावसाळा संपल्याने धरणातून सोडले जाणारे सर्व पाणी बंद केले जाणार आहे. आगामी आठ महिन्यांचे पाण्याचे नियोजन आता कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत होणार आहे. १५ जानेवारीपर्यंत पहिल्या आवर्तनाचा निर्णय होईल.

मार्च-एप्रिलमध्ये दुसरे तर आवश्यकतेनुसार मे महिन्यात शेवटचे आवर्तन सोडले जाऊ शकते. त्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत काही दिवसांतच होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.



### उजनी धरणाची सद्य:स्थिती

| | |
|---|---|
| **एकूण पाणीसाठा :** | **१२३.०५ टीएमसी** |
| **उपयुक्त पाणीसाठा :** | **५९.३९ टीएमसी** |
| **पाण्याची टक्केवारी :** | **११०.८५ टक्के** |



# महादेव कोगनुरे यांच्याकडून कलसुरे कुटुंबियांचे सांत्वन

**मंद्रुप, दि. १४ ऑक्टोबर-**
हत्तुर येथे दि ८ ऑक्टोबर रोजी शेतातील मोटार चालू करताना विजेचा धक्का बसून अनिल महादेव कलसुरे यांचा मृत्यू झाला होता.

अनिल कलसुरे यांना तीन वर्षाचे दोन जुळी मुली आहेत. तरुण वयातच अनिल कलसुरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण हत्तुर गावावर शोककळा पसरली होती. घरातून कर्ता पुरुष निघून गेल्याने कलसुरे कुटुंबियावर दु:खाचा डोंगर कोसळला होता म्हणून एके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी कलसुरे कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेऊन कुटुंबियांना धीर दिला. यावेळी एमके फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.



# तुळजाभवानी भक्तांना औषध वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १४ ऑक्टोबर-**
अखिल भारतीय औषध विक्रेता संघटना अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूरला पायी चालत जाणाऱ्या भक्तांसाठी दक्षिण सोलापूर तालुका केमिष्ट अँड ड्रगिष्ट असोसिएशनकडून मोफत औषध वाटप करण्यात येत आहे.

डॉ. विश्वेश्वर मैंदर्गी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष व्यंकटेश पुजारी, सी. व्ही. बिराजदार, निलेश राठी, विपुल शेंडगे, मल्लिकार्जुन उप्पीन, बसवराज मणुरे, मनिष बलदवा, सिद्धेश्वर घाले, अनंत चिरकुल, सतीश पोतदार, राजशेखर बारोळे, राम जोडमोटे यांच्यासह तालुकाध्यक्ष जमीर आवटे, खजिनदार संजय धप्पाधुळे, समाधान बनसोडे, चंद्रकांत पिरगोंडे, सोमेश्वर मोकाशी, गनी मोमीन, मलकप्पा बिराजदार, प्रकाश शहा, अविनाश स्वामी, महादेव शिंगडगाव , सिद्धाराम जानराव, भीमा देशमुख, सुनिल व्हनमाने, आर. डी. गोसावी आदी उपस्थित होते. कर्नाटकातून मोठ्या प्रमाणात भक्तगण पायी चालत येत असतात. त्यांना वेदनाशमकसह इतर औषधे मोफत देण्यात येत असल्याचे तालुकाध्यक्ष जमीर आवटे यांनी सांगितले.

# तामदर्डी बंधारा निर्मिती माझ्या आमदारकीची फलश्रुती

## आ. समाधान आवताडे : शेतकऱ्यांकडून कृतज्ञतापूरक सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १४ आक्टोबर-**
गेल्या अनेक वर्षांपासून संवेदनशील राजकारणाचा कळीचा मुद्दा ठरलेला तामदर्डी बंधारा निर्मितीसाठी मी केलेले प्रामाणिक प्रयत्न हीच माझ्या आमदारकीची फलश्रुती असल्याचे भावनिक उद्गार पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी काढले.

आ. आवताडे यांच्या प्रयत्नांतून तामदर्डी बंधाऱ्यासाठी ३५ कोटी निधी मंजूर होऊन प्रत्यक्ष कामाला आरंभ झाला आहे. आ. समाधान आवताडे यांच्या माध्यमातून आपला गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असणारा अतिशय महत्वाचा प्रश्न मार्गी लागल्याने या भागातील माचणूर, ब्रह्मपुरी, तामदर्डी सिद्धापूर, अरळी, तांडोर, बठाण, उचेठाण, रहाटेवाडी येथील शेतकऱ्यांनी संयुक्तपणे आ. आवताडे यांचा माचणूर येथील श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरात नागरी सत्कार व शेतकरी मेळावा पार पडला, यावेळी ते बोलत होते. उद्योजक जनार्दन शिवशरण यांनी आ. आवताडे यांच्या माध्यमातून बंधाऱ्याचा प्रश्न सुटल्याने शेतकऱ्यांचे शिवार अक्षरशः नंदनवन होईल. मतदारसंघातील धोरणात्मक विकासाच्या अनुषंगाने मूलभूत आणि पायाभूत विकास बाबींना ऐतिहासिक निधी खेचून आणणाऱ्या आ. समाधान आवताडे यांच्या २०२४ मधील आमदारकीसाठी आपण सर्वांनी आपापसातील गट, मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने आणि एक दिलाने काम केल्यास या मतदारसंघामध्ये परिवर्तनाचे एक वेगळेच चित्र निर्माण होईल, असे सांगितले. यावेळी माजी मुख्याध्यापक जगदीश पाटील, भागवत बेदरे, दत्तात्रय पवार, विकास पुजारी यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी श्री संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ पवार, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजीव बाबर, जिल्हा लेबर फेडरेशन संचालक शाम पवार, माजी संचालक राजन पाटील, बबन पाटील, तानाजी पाटील, कॉन्ट्रॅक्टर प्रकाश शेवाळे, सचिन शिवशरण, हरिभाऊ काकडे बबन सरवळे, डॉ. अविनाश शिवशरण, सतिश पवार, सरपंच दत्तात्रय कोळी, बठाणचे सरपंच कोडग, आबासो डोके, माजी सरपंच गोपाळ पवार, बिभिषण बेदरे, उपसरपंच प्रकाश डोके, गणेश बेदरे, विकास पवार उपस्थित होते. सूत्रसंचालन दिलीप बिनवडे यांनी केले तर लाडिक डोके यांनी आभार मानले.





# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विजयादशमीनिमित्त शस्त्रपूजन

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे भगतसिंग नगर येथे विजयादशमीनिमित्त शस्त्रपूजन उत्सव उत्साहात झाला आहे.

शस्त्रपूजन कार्यक्रमात सूर्यनमस्कार, सामत, खेळ चिरघोड, लाहोर किस है इत्यादी प्रात्यक्षिके सादर केली आहे. सांघिक पद्य, वैयक्तिक गीत, अमृत वाचन, इत्यादी बौद्धिक कार्यक्रम झाला आहे. प्रमुख वक्ते शाम मालपुरी यांनी संघाचे शताब्दी वर्ष पदार्पण करत आहे. कुटुंब प्रबोधन. विविध मुद्द्यांवर बौद्धिक दिली आहे. शस्त्रपूजन उत्सवास ५३ जण उपस्थित होते.

यावेळी शहर सहकार्यवाह प्रविण चिक्कळी, भावनाऋषि घोष प्रमुख शाम मालपुरी, भगतसिंग नगर कार्यवाह भालचंद्र मच्छा, भगतसिंग नगर सहकार्यवाह विनायक कुरापाटी, भगतसिंग नगर श.शि.प्रमुख भास्कर चिलवेरी, वस्ती विकास प्रमुख अशोक कल्पवृक्ष, अरुण नंदाल, शंकर इमडे, अनिश अंधयाला व इतर सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वाचन प्रेरणा दिन विशेष

**वाचाल तर वाचाल' ही म्हण आजच्या घडीला किती समर्पक आहे. हे आपण सर्वच जाणतो. आजच्या मनुष्याच्या ठिकाणी असणारे ज्ञान ही त्याची फार मोठी शक्ती आहे. या शक्तीच्या साह्याने तो सुबुद्ध आणि प्रगल्भ तर होतोच परंतु त्याच्या कार्यसंस्कृतीवर सुद्धा त्याचा प्रभाव पडतो. मागल्या पिढीपेक्षा आताच्या पिढीचे वाचन अगदी अल्प झाले आहे. अशी तक्रार सर्वचथरातून वाढले आहे. ती गोष्ट सत्यही आहे. कारण वाचना,व्यतिरिक्त रेडिओ,टेलिव्हिजन, संगणक,चित्रपट,नाटके, इतर मनोरंजनाची साधइतकी जास्त वाढली आहेत की या सर्व गलबल्यात मनुष्याला वाचण्यासाठी निवांतपणाचमिळत नाही झाला.काळानुसार वाचनाची माध्यमे बदलली असली तरी वाचनाचे महत्त्व कमी झालेले नाही. शरीरासाठी जसा व्यायाम गरजेचा असतो तसे मेंदूसाठी वाचन महत्त्वाचे असते.**

अलीकडच्या काळात आपल्या मोबाईल फोनवरसुद्धा विशिष्ट नंबर फिरविल्याबरोबर आजच्या घडीला जगातील कानाकोपर्यात घडणाऱ्या घटनांची अद्ययावत माहिती प्राप्त होते. जुन्या पिढीपाशी ही अद्ययावत साधने नसल्यामुळे जास्तीत जास्त वाचनातून ते आपली ज्ञानलालसाभागवीत असत. परंतु जुन्या पिढीमध्ये शिक्षणाचाफारसा प्रसार झालेला नव्हता. जवळ-जवळ ८० टक्क्याच्या वर जनता निरक्षरच होती. त्यामुळे वाचनाचा मक्ता काही सुधारलेल्या सुशिक्षित समाजापुरताच सिमीत होता असे नाही. आता शिक्षण सर्व सामान्यापर्यंत पहोचले आहे.



परंतु इतर प्रसार माध्यमांच्या बाहुल्यामुळे प्रत्यक्ष वाचन आणि ते ही कसदार वाचन निश्चितच कमी झालेले आहे. वाचन संस्कृती ही माणसाला जगायला शिकवते, चांगले साहित्य संस्कार घडवते, पुस्तकांशी मत्री झाली तर वैचारिक बैठक तयार होते, वाचनाची बदलती माध्यमे सध्या संक्रमण अवस्थेत आहेत. छापील माध्यमांचा डिजिटल माध्यमांच्या दिशेने प्रवास सुरू आहे.येणारे युग हे डिजिटल युग आहे. त्यामुळे काळानुसार बदलणाऱ्या या वाचन माध्यमांना आपण स्वीकारले पाहिजे,जगभरात

## वाचन संस्कृती माणसाला जगायला शिकवते

इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे त्याचा स्वीकार केला पाहिजे. चांगले साहित्य लोकांपर्यंत पोहोचवायचे असेल तर ग्रंथालय आणि माध्यमांना लोकांपर्यंत जावे लागेल. ही काळाची गरज आहे.चांगले साहित्य ही समृद्ध जीवनाची शिदोरी आहे. वाचनाची तीन माध्यमे आहेत. माहिती माध्यमे, विचार माध्यमे आणि वैकल्पिक माध्यमे.माहिती माध्यमांमध्ये वृत्तपत्र, मासिके, रेडिओ, टीव्ही आणि इंटरनेट सारख्या माध्यमांचा समावेश होतो. वैकल्पिक माध्यमांमध्ये विशिष्ट ध्येय आणि उद्दिष्ट घेऊन काम करणाऱ्या माध्यमाचा आण नियतकालिकांचा समावेश होतो. कथा, कादंबऱ्या, ग्रंथ आणि कवितासंग्रह ही विचार माध्यमे म्हणून ओळखली जातात. काळानुसार वाचनाच्या माध्यमांचे स्वरूप बदलत गेले असले तरी त्याचे महत्त्व आज ही अबाधित आहे. शिक्षणाच्या संस्कारतून प्रबोधन काळाची महूर्तमेढ रोवली गेली. नवशिक्षणातून ज्ञानाची नवीन खिडकी उघडली गेली. आणि पाश्चात्य, तत्वज्ञान, विज्ञान, संस्कृती, इतिहास आणि परंपरा यांची ओळख आम्हाला झाली. त्यातूनचविचारांची नवी दिशा आम्हाला प्राप्त झाली. त्याचा आपल्या जीवन शैलीवर प्रभाव पडू लागला.पाश्चात्याचेअनुकरण करण्याची वृत्ती बळावली.यांच्यातील शिस्त,प्रामाणिकपणा, चिकाटी आणि कर्तव्यत्परता इत्यादी गुणांचा स्वीकार करण्याऐवजी त्यांची बिनधास्त, स्वैर आणि बेपर्वा वृत्ती आम्ही घेतली. संस्कारांची मातब्बरी आम्हाला वाटेनाशी झाली.अर्ध्या हळकुंडाने पिवळे होऊन आम्ही त्यांच्या जीवन शैलीची भ्रष्ट नक्कल करू लागलो. त्यांतून आपल्या संस्कृतीमधील काय मूल्यवान आहे. याचे भान आम्ही हरवून बसलो आणि त्यांच्या संस्कृती तील मूल्यवान गोष्टी स्वीकारण्याचे आम्ही टाळू लागलो. सध्याची अवस्था तर एक प्रकारची कुंठावस्था आहे. असे मला वाटते.लहानपणी जुन्या पिढीत मुलांच्या हातात इसापनीती, साने गुरूजींच्या संस्कारक्षम गोड गोष्टी,'श्यामची आई' या सारखी पुस्तके असायची. आताची मुले सलग पानभर लिहिलेले असेल तर ते सुद्धा वाचायची तसदी घेतनाहीत.चित्रामार्फत दोन-दोन ओळींची माहिती संकलित केलेली-कार्टून्स त्यांना जास्त आवडतात,दीर्घ-कथा,लघु कादंबरी, मोठी वैचारिक पुस्तके,सुंदर कवितांचा संग्रह या गोष्टी तर त्यांच्या आजुबाजुला फिरकत सुद्धा नाहीत. कारण आमच्या घरी माझ्या लहानापासून मोठ्यापर्यंत सगळ्यांनाच वाचनाची आवड होती. लहानपणी एकदा हा वाचन संस्कारझाला म्हणजे तो तरुण, प्रौढ आणि वृद्धावस्थे- पर्यंत कायम राहतो.

**-पद्माकर कुलकर्णी,**
अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद,जुळे सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## सारथी शिक्षण संस्थेच्या अधिकाऱ्यांसोबत उपमुख्यमंत्र्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**
सारथी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजेच एमपीएससी यांसह अन्य परीक्षा व योजनांतर्गत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी या प्रवर्गातील यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती घेतली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी मुंबईत आयोजित बैठकीत घेतली.

तसेच संस्थेला भेडसावणाऱ्या समस्या व प्रश्न आणि त्यावरील उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा केली. याप्रसंगी उपस्थित सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे (आयएएस) व इतर अधिकारी.

# कर्मचारी बदलीमध्ये संघटनेच्या अध्यक्षाचा प्रस्तावाला आडकाठी

### ● संबधित कर्मचाऱ्यांचा आंदोलन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ ऑक्टोबर-**
राज्याच्या कार्यकरिणीत काम करणाऱ्या मागासवर्गीय जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदलीचा प्रस्ताव विभागीय आयुक्ताकडे न पाठविताच प्रलंबित ठेवला आहे. त्यामुळे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या बदलीमध्ये राजकारण करून आडकाठी करीत असल्याबाबत संबधित कर्मचाऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे वेगवेगळ्या कारणासाठी कर्मचाऱ्यांनी बदलीसाठी प्रस्ताव पाठविले आहेत. परंतु यातील बोटावर मोजण्याइतकेच प्रस्ताव विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठवून उर्वरीत प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले असल्याची चर्चा झेडपीत सुरू आहे. विशेषतः दोन मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी बदलीसाठी सीईओकडे प्रस्ताव पाठविला होता. मात्र, यातील एकाही कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आला नाही. त्यामुळे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची गळचेपी जाणून बुजून प्रशासन करीत तर नाही ना असा सवाल उपस्थित केला जात आहे. काही कर्मचारी तालुक्याच्या मुख्यालयात ठिकाणावरून येण्यासाठी बदलीसाठी प्रस्ताव पाठविले आहेत. तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक यांचाही बदलीसाठी विभागीय आयुक्ताकडे प्रस्ताव पाठविला असल्याचे चर्चा आहे. परंतु कर्मचाऱ्यांच्या बदलीमध्ये राजकारण होत असल्याची चर्चा झेडपीत वाऱ्यासारखी पसरत आहे.

**जि.प.मध्ये कर्मचारी बदलीमध्येही राजकारण**



बदलीसाठी आमच्याकडे ३० ते ४० प्रस्ताव आले होते. त्यापैकी आम्ही जवळपास २ २ ते ३ प्रस्ताव विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठविले आहेत. उर्वरीत प्रस्ताव मी पाहणार असल्यामुळे ठेवले आहे.
**- कुलदीप जंगम, सीईओ, झेडपी**



## फिर्यादीचा जीव वाचवणे महत्त्वाचे, फिर्याद घेणे नव्हे

### ● मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**
गंभीर जखमीचा जीव वाचवणे याला प्राधान्य देणे महत्त्वाचे असते, फिर्याद घेणे नव्हे असे महत्त्वपूर्ण मत नोंदवून मुंबई उच्च न्यायालयाने सोलापुरातील एका प्रकरणात खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून आरोपीस दिलेली ७ वर्षे सक्तमजुरी व आरोपीने जखमीस ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचा हुकूम कायम केला.

याची हकीकत अशी की, फिर्यादी दीपक चव्हाण या परिवहन खात्यातील कंडक्टरने आरोपी रविकांत जत्ती या खाजगी सावकाराकडून पैसे व्याजाने घेतलेले होते. ते परत केले असताना देखील व्याजाच्या रकमेचा घोळ घालून आरोपीने चव्हाण यांच्यावर चाकूने हल्ला केला होता. सोलापूर सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश रेखा पांढरे यांनी आरोपीला ७ वर्षे शिक्षा व आरोपीने जखमी फिर्यादीला ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला होता. या शिक्षेविरुद्धच्या अपिलाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात झाली. जखमीला हल्ल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आले होते, त्यावेळी त्याची परिस्थिती गंभीर होती, अशा परिस्थितीत त्याचा जीव वाचवण्यास प्राधान्य देणे महत्त्वाचे होते फिर्याद देण्यास नव्हे असे महत्त्वपूर्ण मत न्यायालयाने व्यक्त केले आहे. हल्ल्यातील फिर्यादीची गंभीर परिस्थिती बघून पोलिसांनी त्यास त्वरित उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले होते. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांनी आरोपी रविकांत जत्ती याचे अपील फेटाळून लावले.

## २५९ रोजंदारी कामगारांना कायम करण्याचा लवकरच निर्णय घेणार

● उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पवार यांची ग्वाही

● आ. विजयकुमार देशमुख, आनंद चंदनशिवेंचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ ऑक्टोबर-**
महानगरपालिकेतील रोजंदारी बदली कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत आ. विजयकुमार देशमुख व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी पुढाकार घेतला आहे. दरम्यान, आनंद चंदनशिवे यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन या संदर्भात चर्चा केली. याप्रकरणी तत्काळ सकारात्मक निर्णय घेणार असल्याची ग्वाही दोन्ही मुख्यमंत्र्यांनी दिली.



आज मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर या निवासस्थानी तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची देवगिरी निवासस्थानी सकाळी भेट घेऊन त्यांचा राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी सोलापूर महानगरपालिका बदली रोजंदारी कामगारांना कायम करण्याबाबत निवेदन दिले.

सोलापूर महानगरपालिकेमध्ये गेल्या २५ ते ३० वर्षापासून रोजंदारी व बदली या पदावर २५९ कामगार काम करीत आहे.या सेवकांना सेवेत कायम करण्यात यावे यासंदर्भात आ. विजय देशमुख व प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी दोन्ही उपमुख्यमंत्री आणि नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांना निवेदन दिले. बदली रोजंदारी कामगारांना कायम करण्यासंदर्भात लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेऊ अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी सोलापूर महानगरपालिका माजी नगरसेवक गणेश पुजारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सदस्य इरफान शेख, श्रीपती गायकवाड, गौतम नागटिळक, अमर सोनकांबळे, धीरज वाघमोडे, शिवकुमार चलवादी, अजहर तांबोळी, दीपक वाघमारे आदी उपस्थित होते.

## गुजराती विभागातर्फे दिवाळी शॉपिंग उत्सवाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**
येथील श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळाच्या महिला विभागातर्फे आयोजित दिवाळी शॉपिंग उत्सव व फूड फेस्टिवल चे उदघाटन गुजराती मित्र मंडळाचे अध्यक्ष मुकेश महेता यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी मंडळाचे विश्वस्थ बिपीन पटेल, केशव राम्भीया, विजय पटेल व रमेश गोरडिया यांची प्रमुख उपस्थिती होती .

अध्यक्ष मुकेश मेहता यांनी या उपक्रमाचे कौतुक करीत प्रदर्शनास शुभेच्छा दिल्या. अध्यक्षा प्रीती शाह यांनी प्रास्ताविक केले व सहसचिवा ज्योती देढीया यांनी आभार मानले. सूत्रसंचालन महिला विभागाच्या समन्वयक स्वाती देसाई यांनी केले. याप्रसंगी महिला विभागाच्या माजी अध्यक्षा पारुल पटेल, उपाध्यक्षा कविता पटेल, खजिनदार सीमा गांधी




संचालिका रिटा पटेल, बिना पंचमीया, कलावती पटेल, नीता दंड, संगीता मेहता, भारती प्र. पटेल, तेजल जागाणी ,वनिता पटेल तसेच सल्लागार भारती बी. पटेल, इंदिरा पटेल व हसुमती जव्हेरी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रदर्शन दोन दिवस १४ व १५ ऑक्टोबर, सकाळी १० ते रा. ९ दरम्यान गुजरात भवनच्या वातानुकूलित सभागृहात सुरु असणार आहे. ह्या प्रदर्शनात दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर साड्या, ड्रेस मटेरियल, ड्रेसेस, इमिटेशन ज्वेलरी, डायमंड ज्वेलरी, सजावटीचे आयटम्स, दिवे आदींचे स्टॉल्स सह विविध स्वादिष्ट खाद्य पदार्थांचे विविध स्टॉलसही उभारण्यात आले असून सोलापूरकरांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. प्रदर्शनात दर दोन तासाला लकी ड्रॉ काढण्यात येत आहे. प्रथम दिवशी ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे सचिवा अर्पिता बक्षी यांनी सांगितले.

## वंचितचे श्रीनिवास संगेपाग शहर मध्यसाठी इच्छुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोंबर -**
सोलापूर शहर मध्य विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडीचे शहर उपाध्यक्ष श्रीनिवास संगेपाग यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली आहे.



सोलापूर येथील शासकीय विश्रामगृह या ठिकाणी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांची मुलाखत घेण्यात आली. यावेळी संगेपांग यांनी पक्षश्रेष्ठींकडे शहर मध्य मतदार संघासाठी दावा दाखल केला आहे. श्रीनिवास संगेपाग यांनी पक्षाच्या निरीक्षकांकडे आपल्या उमेदवारीसाठी अर्ज शासकीय विश्राम गृह येथे दिला आहे. दरम्यान मागील अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात अग्रेसर तसेच वंचित बहुजन आघाडीच्या स्थापनेपासून सदैव पक्षात असणारे श्रीनिवास संगेपाग हे शहर मध्य मतदारसंघात आपल्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून सक्रिय आहेत. शहर मध्ये मतदारसंघात बहुलक प्रमाणात असणाऱ्या मोची समाजाचे श्रीनिवास संगेपांग हे प्रतिनिधित्व करतात.

त्यांचा मोची समाजासह, दलित समाज, तसेच इतर सर्व मागासवर्गीय समाजामध्ये सामाजिक कार्य असल्याने येणाऱ्या निवडणुकीत त्यांना जनतेची साथ मिळू शकते.

सामाजिक कार्याच्या माध्यमातून मागितली उमेदवारी गेल्या अनेक वर्षांपासून वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत आहे. पक्षाच्या स्थापनेपासून सक्रिय कार्यकर्ता असून सामाजिक बांधिलकीच्या नात्याने प्रत्येक समाजाशी एकरूप नाते आहे.
**- श्रीनिवास संगेपांग, शहराध्यक्ष वंचित बहुजन आघाडी.**

# आता सोलापुरात बोन्साय पार्क अनोखे विश्व

### ● लिली नर्सरीत ४०० देशी-विदेशी विविध जातीचे 'बोन्साय' वृक्षांचे दर्शन

**तभा वृत्तसेवा । ॲड. विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**
माणसाला आवड असली की सवड मिळते. आपल्या व्यस्त जीवनातून सवड काढत त्रिभुवन जयंत जक्कल यांनी चक्क आपल्या 'लिली' या परसबागेत विविध जातीचे ४०० च्यावर बोन्साय वृक्ष तयार केले आहेत. याच बरोबर त्या अनेक छंद जोपासतात.अनेकदा काही गोष्टीचे प्रशिक्षण घ्यावे लागते, तर काही उपजतच माणसाच्या अंगी भिनल्या जातात. तर काहींना आपली आवड स्वस्थ बसू देत नाही. त्या आवडीनुसार वेळोवेळी आगळीकता निर्माण होत असते. असेच आगळ्यावेगळे प्रयोग करून, टाकून दिलेल्या पुरातन वस्तूपासून त्रिभुवन जयंत जक्कल यांनी विशेष वस्तूंची निर्मितीही केली आहे.

त्यांच्या बंगल्याचे इंटेरिअर वहाडी खांब-चौक लामणदिव्यांनी घडविले आहेत. त्याच बरोबर त्यांच्या घरातील झोपाळा, झुंबर, हंड्या आजही लक्ष वेधून घेतात. त्यांच्या विविध छंद, कलेने घराचा परिसर निश्चितच आकर्षून घेतो. बागेतील पारंपरिक पद्धतीने तयार करण्यात आलेले लाकडी फर्निचर काष्ठ कलेचा उत्तम नमुना आहे. 'बोन्साय' ही भारतील कला आहे. बौध्द धर्मातील साहित्यासह वेदनांमध्येही तिचे दाखले आहेत. बौध्द धर्माच्या प्रसारासोबत ही कला पौर्वात्य देशांमध्ये गेली; मात्र भारतात लोप पावली. या कलेचे पूनरुज्जीवन सोलापूरातील लिली नर्सरी मध्ये त्रिभूवन जयंत जक्कल यांनी दिले आहे.

त्रिभुवन जयंत जक्कल यांच्या 'लिली' या परसबागेतील झाडे पाहताना 'देता अनंत हस्ते, घेशील किती 'दो कराने' असा अनुभव आल्या शिवाय राहत नाही. परमेश्वर हा निर्गुण निराकार आहे. त्यातील निराकरात घालवून त्याला आकार देता येईल अशी ही कला. आपण सगळे वनस्पतीपासून त्यांच्या गुणातूनच तयार झालेली आहेत. वनस्पती आपल्या सर्वांचे मूळ आहे. आपले वडील, आजोबा, पणजोबा असे करत आपल्या मूळ पुरुषापर्यंत गेले तर वंशवृक्षाच्या मुळाशी वृक्षच आहे. आयुर्वेद वनस्पती हा आयुर्वेदाचा मुख्य आधार आहेत. गंभीर रोगांवर उपचार करत असताना वैद्यांना कांही वेळा ताजी वनस्पती हाताशी असण्याची आवश्यकता असते. दोन-चार पानेही पुरेशी असतात;पण आपल्या वेळी ताजी वनस्पती कोठे मिळणार? ;पण आपल्या 'वामन' वृक्ष उपयोगी पडतात.





शोहीन, स्मॉल बोन्साय, मिडीयम बोन्साय, लार्ज व एक्स्ट्रा लार्ज बोन्साय अशा इतर अनेक प्रकारांचा समावेश असेल. ज्यामध्ये १ मीटर उंचीचे सर्वांत जुने ४० वर्षांचे उंबराचे बोन्साय आहे, तर ३ इंच उंचीचे बोन्साय हे सर्वांत लहान बोन्साय अशा प्रजातींचे बोन्साय वृक्ष या ठिकाणी पहायला मिळतात. इटाली, जपान, मित्र, ऑस्ट्रेलिया, अमेरिका सह जवळपास १६ देशांमधील बोन्साय प्रकारची झाडे लिली नर्सरीत तयार करण्यात आली आहेत. भारतात असलेले वृक्षांचे अनेक विविध प्रकार लक्षात घेत बोन्साय कलेच्या वाढीसाठी आपला देश एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरू शकतो. मात्र हे करीत असताना सातत्य आणि संयम हा महत्त्वाचा आहे.
**- त्रिभूवन जयंत जक्कल, वनस्पती अभ्यासक**

व्यवसायात रूपांतर करण्यासाठी आधुनिक जैवतंत्रज्ञानाचा वापर करता येऊ शकतो. त्यातून शेतकऱ्यांसाठी अर्थार्जनाचा नक पर्याय उपलब्ध होईल. बोन्साय ही केवळ श्रीमंतांची कला नाही. ग्रामीण भागातील महिलांना या कलेचे योग्य प्रशिक्षण दिल्यास फायदा होऊ शकतो. कृषी महाविद्यालयांमध्ये बोन्साय कलेचे प्रशिक्षण देणारा स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करणे व या कलेच्या वाढीसाठी केंद्र सरकारने धोरण निश्चित करणे गरजेचे आहे.



सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री गद्रे लक्ष्मी मंदिरात विना संभावना अनुष्ठान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

श्री गद्रे लक्ष्मी मंदिरात श्री क्षेत्र अयोध्येत प्रभू श्री रामाचे मंदिर पुनर्निर्माण कार्य यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी अयोध्या येथे वेदानुष्ठान या कार्यक्रमात सहभाग घेऊन विना संभावना अनुष्ठान पूर्ण केले. या योगदानाबद्दल वेदमूर्ती जयंत फडके गुरुजी वेदमूर्ती प्रसाद कोरंगळेकर गुरुजी, वेदमूर्ती अनिकेत तांबेकर गुरुजी यांचा मंदिर प्रमुख सुभाष अभ्यंकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानपत्र महालक्ष्मी प्रतिमा



देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी पंचांगकर्ते मोहन दाते, 'प्रिसीजन'चे यतीन शहा व सुहासिनी शहा उपस्थित होते.



दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860





# पाऊले चालती तुळजापूरची वाट

## तुळजापूरला निघाले कर्नाटकचे भक्त

### ● कोजागिरी पौर्णिमानिमित्त तुळजापूर रस्ता वाहतुकीसाठी बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

आई राजा उदो उदो.. सदानंदीचा उदो उदो...बोल तुळजाभवानी माता की जय, श्रीरूपाभवानी माता की जय...! या जयघोषात कर्नाटकातील विजापूर येथील देवीभक्तांनी तुळजापूरची वाट धरली आहे. सोलापूरची कुलस्वामिनी श्रीरुपाभवानी मातेचे दर्शन घेऊन अबालवृद्ध देवीभक्त तुळजापूरकडे पायी प्रवास करत आहे.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त असंख्य देवीभक्त मातेच्या दर्शनासाठी तीर्थक्षेत्र तुळजापूरला पायी जातात. परराज्यातून आलेले भाविक दोन दिवस अगोदरच आपला प्रवास सुरू करतात. त्यानुसार सोमवार, (दि.१४) ऑक्टोबर रोजी सकाळपासून भक्तांच्या रांगा तुळजापूर रोडकडे लागल्या होत्या. यामध्ये महिला, पुरुष तसेच आबालवृध्द देवी भक्तांचा समावेश होता. मुखी देवी मातेचा गजर आणि हातात भगवे ध्वज घेऊन देवीभक्त मातेच्या दर्शनासाठी आसुसलेल्या भावनेने पायी तुळजापूरकडे जाताना दिसून आले. दरम्यान शहरातील विजापूर रोडवरून असंख्य देवीभक्त सोलापूर शहरात दाखल झाले. काही देवीभक्तांनी आपल्या घरापासूनच पायी प्रवास सुरू केला, तर काहींनी एसटीने सोलापूरमध्ये येऊन येथून आपला पायी प्रवास सुरू केला. थकवाल्याने अनेकांनी रोडच्या कडेला थोडावेळ विश्रांती घेतली. तद्नंतर पुन्हा एकदा पायी प्रवास सुरू केला. मजल दरम जल करत भाविकांनी तुळजापूर महामार्ग गाठला. त्यापूर्वी ग्रामदेवी श्रीरूपाभवानी मातेचे दर्शन घेतले. त्यानंतर पुढील प्रवास सुरू केला.

> गेल्या अनेक वर्षांपासून कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजापुरला पायी जात आहे. कोजागिरी पौर्णिमेला देवीच्या दर्शनासाठी विजापूर येथून पायी चालत येतो. आमच्या घरातील अनेक सदस्य यामध्ये सहभागी असतात. दरवर्षी दोन दिवस अगोदर आमचा प्रवास सुरू होतो. कारण सोलापूरला येण्यासाठी एक दिवस जातो. त्यानंतर एक दिवस तुळजापूरला जाण्यासाठी लागतो. देवीमातेवर आमचा विश्वास, श्रद्धा टिकून आहे. श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी नेहमी आस लागते.
> **- लक्ष्मी राठोड, देवीभक्त**

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आज सोलापुरात

● सर्व शासकीय यंत्रणांनी जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी
● जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे मंगळवारी (दि. १५) सकाळी ११ ते दुपारी दोन या कालावधीत सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. जिल्ह्यातील सर्व उद्योजक, व्यावसायिक, पत्रकार, प्रतिष्ठित व्यक्ती, आजी-माजी खासदार व आमदार, जिल्ह्यातील सर्व अधिकारी, राजकीय नेते, राजकीय पक्ष, जिल्ह्यातील प्रमुख लोकप्रतिनिधी यांच्याशी शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे ते संवाद साधणार आहेत. हा दौरा यशस्वी होण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा व दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राज्यपाल दौऱ्याच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पोलीस उपायुक्त दिपाली काळे, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, यांत्रिकी विभाग कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, तहसीलदार श्रीकांत पाटीलसह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.



> **असा राहणार राज्यपालांचा कार्यक्रम**
> सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह सोलापूर. सकाळी ११:१५ ते १२:५० वा. जिल्ह्यातील अधिकारी, पालकमंत्री, खासदार, आमदार, राजकीय पक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, लॉयर्स असोसिएशन, चार्टर्ड अकाउंटंट, जिल्ह्यातील उद्योजक, ज्येष्ठ नागरिक, मान्यवर व्यक्ती, एनजीओ, पत्रकार व अन्य यांच्याशी चर्चा. दुपारी १ वाजून ५५ मिनिटांनी पुढील कार्यक्रमासाठी रवाना.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### अक्कलकोट रोडवरील गांधी नगरात ७४ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

शहरातील अक्कलकोट रोडवरील गांधीनगर भाग १ येथील बंद घर फोडून चोरट्याने ७४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबत अनिता चंद्रमणी इंगळे (वय ५७, रा. गांधीनगर भाग १, अक्कलकोट रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी अनिता इंगळे या त्यांच्या घराच्या दरवाजाला कुलूप लावून बाहेर गेल्या होत्या. १३ ऑक्टोबरला पहाटे साडेपाचच्या सुमारास त्या परत घरी आल्या असता त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने इंगळे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरातील लोखंडी कपाटाचे लॉक तोडून रोख रक्कम, ३ ग्रॅमची सोन्याची कर्णफुले, ४ ग्रॅमचे सोन्याचे मणी, दीड ग्रॅमचे सोन्याचे बदाम, एक सायकल असा ७४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भांगे तपास करीत आहेत.

### चिप्पा ज्वेलर्समधून ६० हजारांचे दागिने पळवले

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

अशोक चौक येथील चिप्पा ज्वेलर्स या सोन्याच्या दुकानातून चोरट्याने ६० हजार रुपये किमतीचे नऊ ग्रॅमचे मोरणीचे नऊ नग अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन चोरून नेल्याची घटना ६ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा ते रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास अशोक चौक येथे घडली. याप्रकरणी व्यंकटेश तुळजाराम चिप्पा (वय २२, रा. न्यू पाच्छा पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

### लहान मुलास मारु नका म्हटल्यावर तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

लहान मुलाला मारू नका असे म्हणल्याच्या कारणावरून तरूणास लाकडी दांडक्याने मारहाण केल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १३ ऑक्टोंबर रोजी रात्री नऊ ते साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान प्रगती नगर जुना विडी घरकुल येथे घडली. याप्रकरणी विशाल संतोष अन्नम (वय २८, रा. प्रगती चौक, जुना विडी घरकूल) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शुभम स्वामी व इतर सहा ते सात जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्नम हा त्यांच्या गल्लीतील लहान मुलगा नितीन याला मारू नका असे म्हणाल्याच्या कारणावरून शुभम स्वामी व इतर सर्वांनी मिळून फिर्यादी व फिर्यादीचा मित्र अभिजीत याला हाताने व लाथा बुक्क्यांनी तसेच लाकडी दांडक्याने मारहाण केली. म्हणून एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार वाघमोडे हे करीत आहे.

### रीलस्टार चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

रीलस्टार हा मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर रीलस्टार या मल्टीस्टारर चित्रपटाचे फर्स्ट लूक मोशन पोस्टर प्रदर्शित झाले आहे. रीलस्टारची निर्मिती जोस अब्राहम, मोनिका कंबाती आणि निशील कंबाती यांनी जे फाइव्ह एंटरटेनमेंट्स, फोनिक्स ग्रुप आणि इनिशिएटिव्ह फिल्म्सच्या बॅनरखाली केली आहे. अन्य फेम सिम्मी आणि रॉबिन यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. सुधीर कुलकर्णी आणि रॉबिन यांनी पटकथा आणि संवाद लिहिले आहेत.




## आम आदमी पार्टी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढविणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

आम आदमी पार्टी महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार आहे. या अनुषंगाने इच्छुकांच्या मुलाखती आणि मोर्चे बांधणीचे काम सुरू आहे, अशी माहिती राज्य सचिव एड. सागर पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दिल्ली येथे पक्षश्रेष्ठींसोबत महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अजित फाटके - पाटील, राज्यसचिव ॲड. सागर पाटील यांची बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ जागा स्वबळावर लढण्यात येणार आहेत. त्यासाठी इच्छुकांचे अर्ज मागविण्यात आले आहेत. लवकरच इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. या निवडणुकीसाठी पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते कामाला लागले आहेत, असे ॲड. पाटील यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस प्रा. शिवानंद घोंगडे घोंगडे, जुबेर हिरापुरे, अल्ताफ तांबोळी, जाफर मदनी आदी उपस्थित होते.

## पार्क चौपाटीवरील अतिक्रमण काढले

### ● चारचाकी हात गाडी, खेळणीसह इतर साहित्य केले जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज पार्क चौपाटी परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. यावेळी चार चाकी हात गाडी, लोखंडी खेळणीसह इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, नियमितपणे कारवाई सुरू आहे. आज शहरात गजबजलेल्या पार्क चौपाटी, क्रीडा कार्यालयाच्या आवारातील अतिक्रमण हटविण्यात आले. रस्त्यावर अनधिकृतपणे चार चाकी गाडी लावून विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्यात आली. या मोहिमेत चार चाकी एक हात गाडी, दोन लोखंडी खेळणी व इतर सामान जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे



प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

## ठार मारण्याची धमकी देऊन महिलेवर अत्याचार

### आरोपीविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर -**

आई-वडीलांना व भावाला ठार मारण्याची धमकी देत महिलेवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन समर्थ सतीश खुरूद (रा. इम्रान कॅन्टीनसमोर, नई जिंदगी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ जुलै २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीत यातील पिडीतेला तुझ्या घरातील आई-वडील-भावाला ठार मारण्याची धमकी देत समर्थ खुरुद याने पिडीतेला त्याच्या घरी बोलावून तिच्यावर जबरदस्तीने अनेकवेळा अत्याचार केले. तसेच समर्थ खुरूद याने पिडीतेच्या वडीलांना प्रत्यक्ष भेटून व फोनवर तुमच्या मुलाला व तुम्हांला ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक घोरपडे पुढील तपास करीत आहेत.

# दिवाळीची चाहूल... बनताहेत आकाशकंदील

### ● जिलेटिन आकाशकंदीलची वाढती मागणी

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१४ ऑक्टोबर -**

सनातन वैदिक हिंदू धर्मातील प्रमुख सण दिवाळी अवघ्या पंधरा दिवसांवर आला आहे. याच दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आकर्षक असे पारंपारिक आकाशकंदील बनवण्यात कारागीर व्यस्त झालेले दिसत आहेत. आजच्या नव्या युगात देखील पारंपारिक जिलेटिन पेपर पासून बनवलेले लाल, हिरवे आकाशकंदील ग्राहकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

दिवाळीच्या अनुषंगाने घरावर लावण्यासाठी पारंपारिक आकाशकंदील बनवण्यात हनुमान नगर येथील कारागीर नारायण चव्हाण गेल्या दोन महिन्यांपासून व्यस्त असल्याचे दिसून येत आहेत.

सदरचे आकाश कंदील बनवण्यासाठी जिलेटिन पेपर, कामट्या, चमकीचे लेस, पुरोशन पेपर, खळ, दोरा बंडल, सुलोचन असे विविध साहित्यांची गरज भासते. ४५ वर्षांपासून पारंपारिक लाल आणि हिरवे रंगांचे लहान-मोठे आकारातील आकाशकंदील कारागीर चव्हाण हे बनवत आहेत. दोन ते तीन प्रकारातील आकाशकंदील बनविण्यासाठी एक तासाचा कालावधी लागतो आहे. दोऱ्यांच्या ४८ गाठी घेऊन हा आकाशकंदील बनवावा लागतो. यासाठी वेळ आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्च होतोय.



**हे आहेत आकाश कंदीलच्या किंमती**

- लहान : १५०
- मध्यम : २००
- मोठे : ५००
- सर्वात मोठे : ३०००



**● चौकात लावण्यासाठी मोठे आकाशकंदील**

शहर परिसरात विविध गणेशोत्सव व नवरात्र उत्सव मंडळ, सामाजिक व धार्मिक संस्था यांच्या वतीने सर्वात मोठा चौकात लावण्यासाठी आकाशकंदील बनवण्याची ऑर्डर दिली जाते. त्यानुसार ३ बाय ८ इतक्या आकाराचे सर्वात मोठे आकाशकंदील देखील बनवले जातात. शहराच्या मुख्य चौकामध्ये दोन्ही बाजूला दोरा लावून हा आकाश कंदील अडकवला जातो. त्यावर संस्थेचे नाव टाकले जाते. अशा पद्धतीने देखील पारंपारिक आकाश कंदील शहर परिसर उजळून टाकतो आहे.

**● पारंपारिक आकाशकंदील आहे टिकून**

आजचा फास्ट फॉरवर्ड जमान्यात जुन्या पद्धतीचे पारंपारिक लाल, हिरवे, पिवळ्या कागदाचे आकाशकंदील ग्राहकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. रात्रीच्या वेळी आकाशकंदील मधून येणारी लालसर रंगछटा सारा परिसर उजळून टाकते आहे. त्यामुळे नव्या अत्याधुनिक पद्धतीच्या एलईडी लाईटच्या आकाशकंदीलला देखील जुना पारंपारिक आकाशकंदील टक्कर देत लक्षवेधी ठरत आहे.

**- अभिमान बिरदे, ग्राहक**

> **पारंपारिक कंदीलाची वाढती मागणी**
> दिवाळीच्या दोन महिन्यांच्या अगोदर पासून हे आकाशकंदील बनवले जातात. सोलापूर शहर जिल्ह्यासह पुणे शहर जिल्ह्यात देखील यांची मागणी असते. मागणीनुसार सुमारे एक हजार नग तयार केले जातात. बनवलेले सर्व आकाशकंदील विकले जातात. गेल्या ४५ वर्षांपासून पारंपारिक आकाश कंदील बनवण्याचे काम केले जाते. चायनीज वस्तूंच्या जमान्यात देखील आपला पारंपारिक आकाशकंदील आतापर्यंत टिकून आहे. घरातील सर्व लहान मोठे सदस्य मिळून आम्ही हे आकाशकंदील बनवतो. व्यवसाय म्हणून न पाहता धार्मिक कार्य म्हणून हे काम केले जाते. आणि त्यातून एक वेगळे समाधान प्राप्त होते.
> **- नारायण चव्हाण,** विक्रेते हनुमान नगर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९१६

**तीळ जाळिले तांदुळ ।**
**काम क्रोध तैसेचि खळ ।।**

निसर्गत: किंवा सहवासाने का होईना पण काम, क्रोध, मत्सर, द्वेष, अहंकार हे अवगुण मानवामध्ये पोसले जातात. या अवगुणांना आपण खत, पाणी देत गेलो तर एके दिवशी हे अवगुण आपणाला त्यांच्या ताब्यात घेतात. अर्थात, माणूस मीच्या ताब्यात जातो. मीच्या अधिन झालेला माणूस जास्तीत-जास्त बाह्य देखावा करतो. हे मी केले, ते मी केले, मी असा चांगला आहे, मी तसा मोठा आहे, वगैरे प्रकारचे मी ने परीपूर्ण झालेले वाक्य माणसाच्या तोंडून सहज बाहेर पडू लागतात. मी चा अहंकार बाळगणाऱ्याजवळ काम, क्रोधांचे आसन फार मजबूत झालेले असते. असा काम, क्रोधाने व्यापलेला माणूस भजन-भक्ती, पूजा-पाठात आपण मागे नसल्याचेही दाखवतो. तो आपल्या अध्यात्मिक, धार्मिक वृत्तीतून जास्तीत-जास्त दिखावा करतो. आपण पूजा-पाठासाठी, दान-धर्मासाठी एवढा-एवढा खर्च केला, असा-असा विधी केला, एवढे उपवास-व्रत केल्याचे तो सांगतो. होम हवनासारखे प्रकारही तो करतो. होम-हवनात तीळ-तांदूळ अशा प्रकारचे पदार्थ तो जाळतो. हे बाह्य पदार्थ जाळणारा हा अहंकारी माणूस आपल्या आतील काम-क्रोधाला मात्र जाळीत नाही. जे मानवतेसाठी पीडक आहेत, ते काम-क्रोध जाळण्याऐवजी गरीब किंवा कसल्याही प्रकारची पीडा न देणारे तीळ-तांदूळ किंवा इतर पदार्थ जाळण्यात कांही अर्थ नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, तीळ जाळीले तांदूळ । काम क्रोध तैसेचि खळ ।।


तुकाराम महाराज

काम क्रोधाला आपण जाळले नाही, तर ते आपणाला जाळल्याशिवाय राहात नाहीत. काम-क्रोधामुळे अनेकांच्या जीवनाची, संसाराची राख-रांगोळी झाल्याचे आपण पाहतो. मानवतेचे हे खरे शत्रू असूनही आपण त्यांना जोपासतो, हे एक आश्चर्यच आहे.कामाधिन झालेल्या व्यक्तींकडून समाजात नको तशा अत्याचारी घटना घडत असल्याचे आपण पाहतो. कामांध व्यक्ती कधी कोणाशी कसा वागेल हे सांगता येत नाही. काम वासनेपुढे तो लिंग, वय, नाते यांपैकी कशाचाही विचार करीत नाही. काम हा जीवाच्या निर्मितीसाठी आवश्यक असला तरीही, तो मानवतेच्या वस्त्र हरणासाठी नाही, हे लक्षात ठेवावेच लागेल. कामाप्रमाणे क्रोधही विनाशकारी आहे. रागाच्या भरात माणसाकडून बऱ्याचवेळा नको ते घडून जाते. रागाचा विपरीत परिणाम भोगावा लागतो. काम आणि क्रोधाची निर्मिती निसर्गत: झाली असली तरी त्यांना नियंत्रणात ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. निती-नियमाला अनुसरुन एका मर्यादेपर्यंत या दोघांचा सहवास मानवाला सुख देऊ शकतो. पण जेव्हा हे दोघे किंवा यांपकी एखादा निती-नियमांचे उल्लंघन करुन वावरु लागतो, तेव्हा मात्र विनाशाशिवाय कांही वाट्याला येत नाही. कामांध होऊन सितेचे हरण करणाऱ्या रावणामुळे रामायण घडले, दुर्योधनाच्या क्रोध-अहंकारामुळे महाभारत घडले. रामायण-महाभारत हा काम-क्रोधाचा इतिहास छोट्या-मोठ्या प्रमाणात अनेकवेळा घडल्याचे सांगणारा भारतीय इतिहास काम-क्रोधाला साक्षी आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीत आपण ज्ञानोबा-तुकारामांच्या कृपाछत्राखाली आनंदाने जगत आहोत. आपल्या आनंदात निती-नियमबाह्य काम-क्रोधाच्या आनंदाचा समावेश होणार नाही याची दक्षता ज्याने त्याने घेणे आवश्यक आहे. आपणा वाचकांकडून कधीही व कोणत्याही परिस्थितीत काम क्रोधाचा अतिरेक होऊ नये, हीच आजच्या अभंगाप्रसंगी ज्ञानोबा-तुकाराम महाराजांच्या चरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - विद्यार्थी दिन, भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिन |
| दि. १५ ऑक्टोबर २०२४ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०, | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| मास - अश्विन | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. त्रयोदशी (२४.१९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - पू.भाद्रपदा (२२.०८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - वृद्धि (१४.१३) | |
| करण - कौलव (१४.०३) | |

### राशीभविष्य

**मेष :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा,

**वृषभ :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा.

**वृश्चिक :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. काम काजाचा विस्तार होईल.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्यामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# प्रवाशांना एसटीची दिवाळी भेट

**• १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोंबर -**

दिवाळीतील प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाकडून करण्यात आलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ अखेर रद्द करण्यात आली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाकडून दरवर्षी १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला जातो. यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान तब्बल एका महिन्यासाठी ही भाडेवाढ लागू करण्यात आली होती. मात्र, प्रवाशांना दिलासा देत एसटी महामंडळानं भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, हंगामी भाडेवाढीचा निर्णय रद्द करण्यात आल्याने महामंडळाच्या तिजोरीत जमा होणारी अतिरिक्त रक्कम मिळणार नाही. भाडेवाढीमुळे राज्यातील नागरिकांचा एसटीचा लांब पल्याचा प्रवास महागणार होता. आता मात्र त्यांना या निर्णयाचा फायदा मिळणार आहे. दिवाळीच्या सुट्यांमध्ये अनेक कुटुंबे गावी, पर्यटनस्थळांना भेटी देण्याचे बेत आखतात. दिवाळीला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी लक्षात घेऊन महामंडळ दरवर्षी जादा गाड्यांची घोषणा करते. दिवाळी आणि उन्हाळी हंगामातील गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ करत असते. महामंडळाच्या धोरणानुसार गर्दीच्या हंगामात भाडेवाढ करण्याचा अधिकार राज्य परिवहन गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ केली जात असते, त्या प्रमाणं या वर्षी देखील निर्णय घेण्यात आला होता. आता तो निर्णय रद्द करण्यात आला आहे. यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यासंदर्भातील परिपत्रक जारी करण्यात आलं होतं. एसटीची प्रस्तावित १० टक्के भाडेवाढ विठाई, शिवशाही, निमआराम बसेससाठी लागू होती. मात्र, ती भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. मुंबई ते पुणे मार्गावर शिवनेरीकरीता भाडेवाढ लागू करण्यात आलेली नव्हती. सध्या दिवसाला सुमारे २३ ते २४ कोटी रुपयांचे प्रवासी उत्पन्न महामंडळाला मिळते. हंगामी भाडेवाढीमुळे दिवसाचे उत्पन्न ६ कोटी रुपयांनी वाढण्याची शक्यता होती. त्यामुळे महिन्याभरात महामंडळाला ९५० ते एक हजार कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची अपेक्षा होती.

**प्रवाशांना मोठा दिलासा**
दिवाळीमधील सणांच्या काळात सर्वसामान्य प्रवासी एसटीला प्राधान्य देत असतात. १० टक्के हंगामी भाडेवाढ केल्याने प्रवाशांना आर्थिक फटका सहन करावा लागतो. मात्र, यंदा एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द करण्याच्या निर्णयामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.






# लोकमंगल बँक; पतसंस्थेचा उद्योजक, ग्राहक स्नेहसंवाद मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

लोकमंगल बँक व लोकमंगल पतसंस्था सांगोला शाखेच्या संयुक्त विद्यमनाने रामकृष्ण गार्डन व्हीला येथे उद्योजक व ग्राहक स्नेहसंवाद मेळावा बँकेचे अध्यक्ष तथा आ. सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे सोलापूर जिल्हा समन्वयक योगेश वाघ यांनी महामंडळाची सविस्तर माहिती ग्राहकांना दिली.

तसेच प्रधानमंत्री फूड प्रोसेसिंग कर्ज योजनेची माहिती सदर योजनेचे अधिकारी समाधान खूपसे यांनी दिली. प्रारंभी सांगोला शाखेच्या वतीने नवीन वाहन वितरित करण्यात आलेल्या वाहनांचा चावी प्रदान कार्यक्रम मान्यवरांचे हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी ग्राहकांनी आपले मनोगत व्यक्त केली. यावेळी लोकमंगल पतसंस्थेचे चेअरमन गुरणा तेली, सरव्यवस्थापिका अलका देवडकर, बँकेचे पालक संचालक विजय कुलकर्णी, पतसंस्थेचे तज्ञ संचालक ॲड. गजानन भाकरे आदी उपस्थित होते.

# शुक्रवारपासून नेत्ररोग तज्ज्ञांची राज्यस्तरीय वैद्यकीय परिषद

**• दीड हजार डॉक्टर्स आणि सुमारे १०० कंपन्यांचा राहणार सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र ऑप्थेल्मोलॉजी सोसायटीच्या वतीने दि. १८ ते २० ऑक्टोबर रोजी सोलापूर शहरात हॉटेल बालाजी सरोवर येथे नेत्ररोग तज्ज्ञांची मॉस्कॉन २४ राज्य पातळीवरील वैद्यकीय परिषद आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती अध्यक्ष डॉ. हरीश रायचूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मॉस्कॉन २४ (MOSCON) या परिषदेमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जवळपास १४०० ते १५०० नेत्ररोगतज्ज्ञ उपस्थित राहणार आहे. नेत्ररोग क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या आणि सेवा देणाऱ्या सुमारे १०० हून अधिक कंपन्यांचा सहभाग राहणार आहे. अध्यक्ष डॉ. संतोष अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणाऱ्या या वैद्यकीय परिषदेमध्ये राज्य स्तरावरील तज्ज्ञ मंडळी, अभ्यासक, जटील विषयांमधील अनुभवी मार्गदर्शक यांची व्याख्याने, चर्चासत्रे, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि वैद्यकीय ज्ञानाची देवाण घेवाण होणार आहे. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष, डॉ. पार्था बिस्वास यांची उपस्थिती राहणार आहे.

सोलापुरात होणाऱ्या या परिषदेच्या निमित्ताने मंगळवार दि. १५ ऑक्टोबर रोजी आयएमए सभागृहात मोफत मधुमेह आणि काचबिंदू तपासणी शिबीर आयोजित केले आहे. या पत्रकार परिषदेस आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. हरीश रायचूर, सचिव डॉ. जगदीश बिराजदार, सहसचिव डॉ. क्षमा कदम, कोषाध्यक्ष डॉ. नागेंद्र वनसुरे आणि सह कोषाध्यक्ष डॉ. रवींद्र वानखेडे आदी उपस्थित होते.


# ड्रीम फाउंडेशनतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन

**ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ड्रीम फाउंडेशनतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संयोजक काशिनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

ड्रीम फाउंडेशन, डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र पुणे व चाणक्य गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार १५ ते २० ऑक्टोबर दरम्यान राष्ट्र उभारण्यासाठी युवा या अभियाना अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वरिष्ठ वैज्ञानिक व्यंकटेश गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम होणार आहेत. १५ रोजी पहाटे ५ वाजता डॉ. कलाम जयंती, राष्ट्रीय विद्यार्थी दिन व वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त आसरा चौक येथील वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. सकाळी ११ वाजता पंढरपूर येथील सिरीज कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अशोक नगरकर यांचा संशोधन क्षेत्रातील डॉ. कलामांचे योगदान यावर व्याख्यान होईल. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी.पी रोंगे व प्रमुख अतिथी म्हणून प्रा. काशिनाथ भतगुणकी हे उपस्थित राहतील. सायंकाळी ६ वाजता ड्रिम आयएएस सेंटर सभागृह येथे माझ्या आठवणीतले कलाम या विषयावर मान्यवरांचा संवाद कार्यक्रम होणार आहे. वरिष्ठ वैज्ञानिक व्यंकटेश गंभीर, प्रा. आय. आय. मुजावर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा डॉ. कलाम राष्ट्रपती प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येईल. १६ रोजी सकाळी ११ वाजता स्वामी विवेकानंद प्रशाला जुळे सोलापूर येथे विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांचे प्रेरणादायी ग्रंथ देण्यात येईल. १७ रोजी सकाळी ११ वाजता ड्रीम फाउंडेशन सभागृहात युवा उद्योग मेळावा होईल. दि. १८ रोजी महिला बचत गट मेळावा व दीपावली फराळ निर्मिती उद्योगाचे उद्घाटन दुपारी १ वाजता होईल. १९ रोजी शहर जिल्ह्यातील गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप व दीपावली निमित्त नवीन कपडे व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात येणार आहे. दि. २० रोजी ड्रीम फाउंडेशन सभागृहात युवकांचे योगदान यावर चर्चासत्र होईल. या पत्रकार परिषदेस प्रा. व्यंकटेश गंभीर, प्रा.आय.आय. मुजावर आदी उपस्थित होते.



# महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त कार्यक्रम

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

भारतरत्न डॉ. आंबेडकर चौक येथे आद्य कवी महर्षी वाल्मिकी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती कोळी महासंघाचे उपाध्यक्ष अरुण कोळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोळी महासंघ संचलित एबी ग्रुपच्या वतीने डॉ. आंबेडकर चौक येथे महर्षी वाल्मिकी जयंती निमित्त रविवार दि. २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता देखाव्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी आ. रमेश पाटील हे उपस्थित राहणार आहेत. जयंतीनिमित्त दि. १७ ते २० ऑक्टोबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असेही अरुण कोळी यांनी सांगितले. यावेळी सुरेश प्याटी, पवन दोरकर, मयूर बिराजदार, सचिन सावळगी, सिद्धाराम प्याटी उपस्थित होते.

# रोटरी क्लबच्या मधुमेह तपासणी शिबिराचा दोन हजार नागरिकांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२च्या सार्वजनिक आरोग्य उपक्रमांतर्गत रोटरीतर्फे नवरात्री निरामय प्रकल्प अंतर्गत विविध ठिकाणी ब्लड शुगर (मधुमेह) तपासणी करण्यात आल्या.

रोटरी जिल्हा ३१३२ चे प्रांतपाल रोटे डॉ. सुरेश साबू यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्ह्याचे पब्लिक इमेज डायरेक्टर रोटे रवींद्र बनकर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम रोटरीतर्फे राबविण्यात आला. आराध्य देवी माता रूप भवानी मंदिर देवस्थान येथे हा शिबीर दि. ४ ते १२ ऑक्टोबर या पूर्ण कालावधीत घेण्यात आला. नवरात्रीचे औचित्य साधून येथे दररोज सकाळी या शिबीर घेण्यात आले. यात २००० हून अधिक भाविकांनी मधुमेह तपासणी करून घेतली. रुपाभवानी मंदिरा शिवाय हे कॅम्प जोडभावी पेठ डंका महोत्सव येथे सुद्धा दि. ८ ऑक्टोबर रोजी घेण्यात आले. भिक्षा मागणाऱ्या महिल तृतीयपंथी आणि देवदासी महिला एकत्र येऊन तुळजापूरच्या दिशेने उभे राहून पूजा करतात. याचे औचित्य साधून या भाविकांचे मधुमेह तपासणी करण्यात आल्या. भवानी पेठ श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर, पाथरी ग्रामपंचायत येथे सुद्धा हा शिबीर घेण्यात आला. सर्व शिबीर फॅमिली प्लांनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, डॉ. वि. एम. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुपाभवानी मंदिर ट्रस्ट यांच्या सहकार्याने घेण्यात आले. शिबीर यशस्वी करण्यासाठी रोटरी सदस्य अध्यक्ष रोटे सीए सुनील माहेश्वरी, सचिव ब्रिजकुमार गोयदानी, प्रांतपाल जयेश पटेल, डॉ. प्रत्युष काबरा, सुहास लाहोटी, कालिदास जाजू, डॉ. राजीव मोहोळकर, विशाल वर्मा, निलेश पोफलीया, संदीप झवेरी यांनी परिश्रम घेतले.





# मार्कंडेय उद्यानात ब्रतुकम्मा उत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

नवरात्रनिमित्त पूर्व भागातील तेलुगु समाजात प्रसिद्ध ब्रतुकम्मा उत्सव मार्कंडेय उद्यानात साजरा करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध तेलुगू लोकगीत 'ब्रतुकम्मा ब्रतुकम्मा उय्यालो' म्हणत व फेर धरत महिलांनी या उत्सवाचा आनंद घेतला.

भाजपा शहर मध्य विधानसभा अंतर्गत प्रभाग क्रमांक ९ मधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास माजी महापौर श्रीकांचना यन्नम, भाजपा शहरचिटणीस सावित्रा पल्लाटी शहर भाजपचे माजी अध्यक्ष रामचंद्र जन्नू, भाजप उद्योग आघाडीचे अध्यक्ष अंबादास बिंगी, माजी नगरसेवक देवेंद्र कोठे, मोनिका कोठे, माजी नगरसेवक मेघनाथ येमुल, माजी नगरसेविका राधिका पोसा, रामेश्वरी बिरु, सावित्रा पल्लाटी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उत्कृष्ट ब्रतुकम्मा सादर करणाऱ्या भगिनींना चाटला पैठणीतर्फे प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमास भाजप शहर चिटणीस नागेश सरगम, मंजुळा सरगम, ओबीसी मोर्चा सरचिटणीस श्रीनिवास जोगी, बजरंग कुलकर्णी, प्रभाकर अण्णा गोरंटी, दत्तू पोसा, आनंद बिरू, ज्ञानेश्वर गवते, अमरनाथ मासा, अजय कुलकर्णी उपस्थित होते.

# पालिकेसाठी नव्या दोन अतिरिक्त आयुक्तांची नियुक्ती

**• शिल्पा दरेकर, रवी पवार यांच्या नियुक्तीचे शासनाने काढले आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने सोलापूर महापालिकेसाठी नव्या दोन अतिरिक्त आयुक्तांची नियुक्ती केली आहे. शिल्पा दरेकर आणि रवी पवार हे दोन अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. दरम्यान, सोलापूर महापालिका प्रशासनात शासन स्तरावरील केवळ एकच अतिरिक्त आयुक्त पद रिक्त आहे तर शासनाने दोन अधिकारी पाठविले आहेत.

सोलापूर महापालिकेतील तत्कालीन अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांची बदली झाली होती. या जागी काही महिन्यानंतर शासनाने अजय चारठाणकर यांच्या नियुक्तीचे आदेश काढले होते मात्र ते रुजू झाले नाहीत. त्यामुळे महापालिकेत शासन स्तरावरील एकच अतिरिक्त आयुक्त पद रिक्त आहे. या रिक्त पदी कोण येणार ? याची प्रतीक्षा लागली होती. परंतु एक अतिरिक्त आयुक्त अपेक्षित असताना महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने पदोन्नतीने पदस्थापना करून सोलापूर महापालिकेसाठी दोन अतिरिक्त आयुक्त पदाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. तसे शासन आदेशही काढले आहेत. शासनाचे अवर सचिव अशोक लक्कस यांनी हे आदेश काढले आहेत.



सांगली- मिरज- कुपवाड महापालिकेच्या उपायुक्त शिल्पा दरेकर आणि नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले (मुख्याधिकारी गट-अ) रवी पवार या दोन अधिकाऱ्यांची सोलापूर महापालिकेत अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. एक अतिरिक्त आयुक्तांची अपेक्षा असताना शासनाने तब्बल दोन अधिकारी पाठविले आहेत. महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांना मुख्याधिकारी गट-अ /सहाय्यक आयुक्त गट अ प्रवर्गातून मुख्याधिकारी गट अ (निवड श्रेणी) उपायुक्त गट अ संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

दरम्यान, सोलापूर महापालिकेत आकृतीबंधानुसार एक स्थानिक आस्थापनेवरील आणि दुसरे शासन स्तरावरील एक अशी अतिरिक्त आयुक्तांची २ पदे शासन मंजूर आहेत. सध्या सोलापूर महापालिका प्रशासनात शासन स्तरावरील एक अतिरिक्त आयुक्त तसेच मच्छिंद्र घोलप यांची बदली झाल्याने एक उपायुक्त पद रिक्त आहे. शासन स्तरावरील एका रिक्त अतिरिक्त आयुक्तपदी एकच अधिकारी शासनाकडून येणे अपेक्षित होते. मात्र शासनाने दोन अधिकारी पाठवले आहेत.

सध्या सोलापूर महापालिका प्रशासनात १ अतिरिक्त आयुक्त, २ उपायुक्त आणि ४ सहाय्यक आयुक्त कार्यरत आहेत. यामध्ये अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे (स्थानिक आस्थापनेवरील), उपायुक्त तैमूर मुलाणी, आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले (१), ज्योती भगत (सहाय्यक आयुक्त-२), गिरीश पंडित (सहाय्यक आयुक्त-३), अर्जुन सुरवसे (सहाय्यक आयुक्त-४) हे अधिकारी काम पाहत आहेत.

**• नियमानुसार महापालिका देऊ शकते एकाच अतिरिक्त आयुक्ताचा पगार !**
शासन मंजूर आकृतीबंधानुसार सोलापूर महापालिकेत शासन स्तरावरील एकच अतिरिक्त आयुक्त पद शासनाला भरता येऊ शकते. मात्र शासनाने या पदावर दोन अधिकारी पाठवले असल्याने दुसऱ्या अधिकाऱ्याचा पगार कोण देणार हा प्रश्न निर्माण होणार आहे. नियमानुसार मंजूर एकाच अतिरिक्त आयुक्त पदाचा पगार महापालिका करू शकणार आहे. दरम्यान, नियुक्ती दिलेल्या दोघांपैकी जो अधिकारी प्रथम रुजू होईल त्यांचीच नियुक्ती ग्राह्य धरण्यात येईल, अशी शक्यता आहे.

**• स्थानिक आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त पदे भरण्याची प्रतीक्षा**
महापालिकेतील ज्येष्ठ अधिकाऱ्यांमधून शासन नियमाप्रमाणे स्थानिक पातळीवरील सहाय्यक आयुक्त ही पदे भरली जात नसल्याची ओरड गेल्या अनेक वर्षापासून होत आहे. अशी ही सर्व पदे सध्या महापालिकेत रिक्तच आहेत. आता फक्त महापालिका स्थानिक आस्थापनेवरील अधिकाऱ्यांमधून नियमानुसार रिक्त सहाय्यक आयुक्त पदे पदोन्नतीने कधी भरणार ? याची प्रतीक्षा आणि उत्सुकता सर्वांना लागली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# खोदून ठेवलेले खड्डे, पाईपमुळे रहिदारीला अडथळा

### भारत गल्लीच्या रहिवाशांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ ऑक्टोब-**

अक्कलकोट येथील भारत गल्ली येथील नागरिकांनी भाजपाचे माजी नगरसेविका ज्योती जरीपटके यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेच्या आदर्श कामकाजाबद्दल मुख्याधिकारी रमाकांत डाके यांना निवेदन दिले. गेली चार ते पाच महिने गटारासाठी खोदून ठेवलेले खड्डे, टाकलेले पाईपमुळे या मार्गावरून नागरिकांना जाणे-येणे अत्यंत कठीण बनले आहे. सदर काम त्वरीत पूर्ण करावे अन्याथा नगरपालिकेच्या आदर्श कामकाजाबद्दल रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा माजी नगरसेविका ज्योती दीपक जरीपटके यांनी दिला आहे.

भारत गल्ली येथे गवळी घराजवळील बोळात गेली ४ महिने गटारासाठी खड्डे खणून पाईप टाकली आहेत. मात्र गटार पाईप जोडणी व कॉक्रीटीकरण करण्यात आले नाही. नागरिकानां यावरून मार्गक्रमण करणे अंत्यत कठीण झाले आहे. काही वृद्ध नागरिक पडल्याने मुका मार लागला आहे. सदर गटारीचे काम त्वरीत करण्यात यावे, या मागणीकरिता परिसरातील नागरिकांनी भाजपाच्या माजी नगरसेविका ज्योती जरीपटके यांच्या नेतृत्वाखाली मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनां लेखी निवेदन देऊन काम त्वरीत पूर्ण करण्याची मागणी केली. निवेदन देण्याप्रसंगी सुरेष महिंद्रकर महादेवी उमदी, राम गवळी, सरुबाई दणके, दीपाली दणके, नंदा सुरवसे, कांदन साळुंखे, भारती सावंत, गायत्री स्वामी, अजय विभुते, मानशिंग शिंदे, ए. वाय. बेळगावकर, दीपक बागेवाडीकर, विजय जाधव, के. जी. गोटूर, सुरेश फुटाणे आदी नागरिक उपस्थित होते.

### मुख्याधिकाऱ्यांनी घेतली दखल

याबाबत मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी तात्काळ सदर कामाची पाहणीकरिता नपा अधिकारी वर्गास पाठवून दिलं. सदर प्रलंबित कामे त्वरीत प्रारंभ करण्याच्या सूचना दिल्या.

# माढ्याचा २५ वर्षांचा बॅकलॉक भरून काढू

### अभिजीत पाटील : रावण दहन करून माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ ऑक्टोबर-**

आपले महापुरुष सीमोल्लंघन करून लढाईच्या मोहिमेवर जात होते. तो आदर्श घेऊन मी पुढे जात आहे. इथल्या शेवटच्या घटकाचा विचार करून माढ्याच्या २५ वर्षांचा बॅकलॉक भरून काढण्यासाठी आणि माढ्याच्या सर्वांगिण विकासासाठी साथ मिळेल, असा विश्वास व्यक्त करत चेअरमन अभिजीत पाटील यांनी माढ्याच्या विकासाचा रथ पुढे नेऊया, असे आवाहन दसऱ्याच्या मुहूर्तावर रावण दहनप्रसंगी येथील जनतेला केले.

माढा येथे आयोजित करण्यात आलेल्या माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव या कार्यक्रमात ते बोलत होते. पाटील म्हणाले की, उद्याच्या काळात फक्त



ऊस आणि पाण्यावर बोलून चालणार नाही तर इथल्या शेवटच्या घटकाचा विचार करून माढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी काम केले पाहिजे, युवक, महिलावर्ग, बेरोजगारी, सांस्कृतिक जडणघडण याचबरोबर ज्या युवकांकडे शेतजमीन नाही त्यासाठी काम केले पाहिजे. व्यावसायिक करणाऱ्यांना चालना दिली पाहिजे, माढ्याच्या २५ वर्षांचा बॅकलॉक भरून काढावा लागेल, यासाठी येथील जनतेची साथ मिळेल असा विश्वास व्यक्त करत ते म्हणाले की कायम अधर्मावर, असत्यावर विजय मिळवता येतो. असत्य खूप काळ टिकत नाही. उद्याच्या काळात सत्याच्या बाजूने उभे राहण्यासाठी येथील जनता सज्ज आहे. प्रत्येक युवकाच्या सोबत हातात हात दिल्यानंतर जी तडफ जाणवते ती तडफ उद्याच्या परिवर्तनाची नांदी दिसत आहे असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी त्यांनी माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून कृषीविषयक मार्गदर्शन आणि सायंकाळी संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन विठ्ठल प्रतिष्ठानच्या माध्यमातून घेण्यात आल्याचे सांगत पुढील काळात असे वेगवेगळे प्रयोग घेत नाही तोपर्यंत येथील तरुणांना ऊर्जा मिळणार नाही, असे पाटील यांनी सांगितले. यावेळी संभाजी ब्रिगेड संघटक दिनेश जगदाळे, डॉ. हनुमंत क्षीरसागर, केवडचे पांडुरंग शिरसाट, आबासाहेब साठे, ऋषिकेश तांबिले, आटकेपार झेंडा ग्रुपचे दयानंद महाडिक, संजय तांबिले, यशवंत भोसले, सागर मसूरकर, समाधान गडेकर, दत्तात्रय पाटेकर, गोटू नाईक, किरण पाटेकर, दीपक इंगळे, प्रीतम पाटेकर, सूरज बारबोले, जनहित शेतकरी संघटना बालाजी बारबोले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### परिवर्तनाची गरज

उद्याच्या काळात माढेकरांना अनेक गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत. यासाठी येणाऱ्या काळात परिवर्तन करावे लागेल. माढ्याच्या भविष्यासाठी सीमोल्लंघन करूया, माढ्याच्या विकासाचा रथ पुढे नेऊया असे आवाहन अभिजीत पाटील यांनी केले.

# आ. शहाजीबापू पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोला शहरात युवासेनेच्या शाखांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ ऑक्टोबर-**

सांगोला तालुक्याचे लोकप्रिय आ.शहाजीबापू पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दि.१४ ऑक्टोबर रोजी सांगोला शहरात अनेक युवासेनेच्या शाखांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले.यावेळी आ.शहाजीबापू पाटील यांच्या कार्यावर आधारित सागर माने लिखित,निर्माता सुभाष जगदने,गायक गरुडा गुलीक यांच्या टीमच्या ध्वनीगीताचा प्रसारण कार्यक्रम संपन्न झाला.

युवासेना शाखांचे उद्घाटन युवासेना जिल्हा संपर्कप्रमुख सागर पाटील, युवा नेते दिग्विजय पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, उपतालुकाप्रमुख सोमनाथ मगर, विधानसभा प्रमुख प्रा. संजय देशमुख, ज्येष्ठ नेते आनंद घोंगडे, शहरप्रमुख माऊली तेली, शहर संघटक आनंदा माने, सहसंघटक अरुण पाटील, महिला आघाडी तालुकाप्रमुख राणी माने, शहरप्रमुख छाया मेटकरी,शहर उपप्रमुख अस्मिर तांबोळी, विजय इंगोले, गणेश माळी, महेश कदम, समन्वयक अरुण बिले, एससी सेलचे शहरप्रमुख कीर्तीपाल बनसोडे, समन्वयक शरद रणदिवे, मायाक्का प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिलिंग गावडे, उद्योगपती सचिन सदगिले, सुनील धतिंगे, ओबीसी सेलचे शहरप्रमुख आयुब मुलाणी, देविदास गावडे, ज्ञानेश्वर गाडेकर, युवासेना शहर उपप्रमुख काशिलिंग गाडेकर, सागर नरुटे, दीपक ऐवळे, इनामदार गुरुजी, बिटू मुलाणी, अण्णा गडदे, समाधान सावंत, सागर माने, सुभाष जगधने तसेच आ. शहाजीबापू पाटीलप्रेमी आनंदाभाऊ माने मित्रपरिवार उपस्थित होता. युवासेना शाखा पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार व सन्मान करण्यात आला.



### नामदार करण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावणार

दादासाहेब लवटे, प्रा. संजय देशमुख, आनंद घोंगडे यांनी स्व.बाळासाहेब ठाकरे, स्व. धर्मवीर आनंद दिघे यांची प्रेरणा घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आ. शहाजीबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला शहरात शिवसेनेच्या युवा शाखांचे मोठ्या थाटामाटात उद्घाटन झाले. आनंदा माने मित्र परिवारांची टीम मोठी असून पक्षाला खऱ्या अर्थाने ताकद देण्याचे काम ही संघटना करणार आहे. आ. शहाजीबापू पाटील यांना आमदार व नामदार करण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावूया असे आवाहन केले.



# सांगोला विद्यामंदिराच्या ६० वर्षांपूर्वीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ ऑक्टोबर-**

सांगोला विद्यामंदिरच्या १९६४ मध्ये एस.एस.सी (जुनी अकरावी) परीक्षा देऊन या प्रशालेतून बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांनी स्नेह मेळाव्याचे आयोजन रविवारी केले होते. गुरुवर्य बापूसाहेब यांच्या तैल चित्रास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.मयत झालेले वर्गमित्र व शिक्षक यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविकात वैजिनाथ घोंगडे यांनी या मेळाव्याचे आयोजन कसे घडले याविषयीची माहिती दिली.

सध्या हयात असणारे शिक्षक प्रमुख पाहुणे म्हणून म.सि. झिरपे,दि.धों.जगताप व म.शं. घोंगडे यांचा सत्कार करण्यात आला.माजी विद्यार्थ्यांमधून भागवत पैलवान,शिवाजी शिनगारे,विजय जाधव,अशोक ज्ञानमोठे,महादेव भोसेकर, चंद्रशेखर भोगडे,मीनाक्षी भोसेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी शोभा पाटणे,मालन काळे, कौशल्या म्हेत्रे,वसंत भागवत,मुरलीधर जलगिरे उपस्थित होते.दुपारी वाढेगांव येथील त्रिवेणी संगमावर सहल काढण्यात आली .त्या ठिकाणी वैजिनाथ घोंगडे यांनी नद्या विषयी व त्रिवेणी संगमाविषयी सविस्तर माहिती दिली. विजय जाधव यांनी गीत सादर केले तर कवी अनिल केंगार व गौषपाक मुलाणी यांनी मधुर कविता सादर केल्या.त्यानंतर विद्यामंदिर येथे जाऊन सर्वांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### मेळावा आमच्यासाठी सुवर्णयोग -प्रा. पी. सी. झपके

कधीही अनुभवात नसलेला योगायोग आज सांगोला विद्यामंदिरच्या माजी विद्यार्थ्यांनी अर्थात आजच्या ज्येष्ठ नागरिकांनी घडवून आणला. ६० वर्षांपूर्वीच्या माजी विद्यार्थ्यांचा हा स्नेहमेळावा म्हणजे आमच्या प्रशालेसाठी सुवर्णयोग आहे. असा योग प्रत्येकाच्या वाट्याला नेहमी यावा, अशा भावना यावेळी बोलताना प्रा. पी. सी. झपके यांनी व्यक्त केल्या.

## संक्षिप्त वृत्त

### बनावट कागदपत्रे तयार करुन उचलले १० लाखांचे कर्ज

**बार्शी, दि. १४ ऑक्टोबर-**

येथील काळभैरव नागरी सहकारी पतसंस्थेतुन एका खातेदाराने एका साथीदाराच्या मदतीने कर्जासाठी तारण ठेवणाऱ्या जागेची बनावट कागदपत्र तयार करुन त्या आधारे १० लाख रुपये उचलुन कर्ज फेडण्यासाठी टाळाटाळ करुन पतसंस्थेची व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी सदर कर्जदार व साथीदार या दोघांविरुद्ध शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्जदार सूर्यकांत अनिल जाधव, रा.नाळे प्लॉट, बार्शी व प्रभाकर दत्तात्रय मिरगणे, रा. मांडेगांव, ता बार्शी या दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. पतसंस्थेचे व्यवस्थापक सचिन क्षीरसागर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सूर्यकांत जाधव याने ग्राम पंचायत मांडेगाव येथील मिळकत गट क्रं. ६७१ मधील बांधकाम केलेली जागा व जमिनीचे कागदपत्रांचे अधारे डिसेंबर २०२१ मध्ये १० लाख रुपये कर्जाची मागणी केली होती. सदरची जागा रजिस्टर




समोर नजर गहाणखत करुन दिली व सदर जागेच्या उताऱ्यावर ग्रामसेवक यांचा रक्कम रुपये १० लाख कर्ज रक्कमेचा बोजाही नोंद करुन दिला. कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतर संस्थेने सूर्यकांत जाधव यास १० लाख रुपये कर्ज चेकने दिले. सदर कर्जदाराने प्रथम दोन कर्जाचे हफ्ते भरले. त्यानंतर कर्ज भरण्यासाठी टाळाटाळ सुरु केली. थकबाकी वाढत्याने त्यानंतर संस्थेने सहकारी पतसंस्था फेडरेशन सोलापूर मार्फत नियुक्ती वसुली अधिकारी गोकुळ सुखदेव नलवडे यांनी सदर खातेदार व जामीनदार यांना वसुली नोटीस, मागणी नोटीस देवूनही कर्जदाराने रक्कम भरण्यास सदर टाळाटाळ केल्याने कर्जदार यांनी तारण दिलेली ग्रामपंचायत मांडेगाव, ता.बार्शी हद्दीतील जागा गट नं.६७१ वर ग्रामसेवक यांच्याकडे सदर जागेवर जंगम मालमत्ता जप्तीची नोटीस दिली असता ग्रामसेवक यांनी गट नं.६७१ सूर्यकांत जाधव यांच्या नावे ग्रामपंचायत नमुना नं.८ ला मिळकत आढळून येत नाही असा दाखला दिल्याने सदर खातेदार यांनी पतसंस्थेची व शासनाची फसवणूक केल्याची फिर्याद दिली आहे. आरोपीना पोलिसांनी ताब्यात घेतले असुन पुढील कारवाही सुरु आहे.



### सोमेश्वर पतसंस्थेतर्फे आंबाबाईच्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप

**मंद्रुप, दि. १४ ऑक्टोबर-**

हत्तुर येथील सोमेश्वर नागरी सहकारी पतसंस्था व शिवसेना शिंदे गट जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर मित्र परीवारांकडून तुळजापूरला पायी चालत जाणार्या भक्तांसाठी हत्तुर बसस्थानकावर महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे. धनगर समाजाचे नेते अमोल कारंडे यांच्या हस्ते महाप्रसाद वाटप शुभारंभ करण्यात आला. चार वर्षापासून तुळजापुरला पायी चालत जाणार्या भक्तांसाठी वाटप करण्यात येत असल्याचे शिवसेना जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर यांनी सांगितले. यावेळी उमेश मळेवाडी, भिमाशंकर सतुबर, बाबूराव काळे, शिवानंद वाले, गुरूनाथ सतुबर, सचिन हडपद, विनोद न्हावी, सिध्दू निर्वाणे आदि उपस्थित होते.

# पंढरपूर ते स्वारगेट बससेवा सुरु

### ग्राहक पंचायतीकडून पुष्पगुच्छ देऊन चालक, वाहकांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.१४ ऑक्टोबर-**

पंढरपूर- टेंभुर्णी- स्वारगेट जाणारी बससेवा छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झाल्याची माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली. दरम्यान सोमवारी एसटी बसच्या चालक आणि वाहकाचे ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

ग्राहक पंचायतीने अनेक दिवसांपासून राज्य परिवहन महामंडळाकडे करकंब-टेंभुर्णी मार्गे स्वारगेटकडे जाणारी बस सेवा छ. शिवाजी महाराज चौकातून लिंक रोड, कॉलेज चौक या मार्गाने सोडावी अशी मागणी केलेली होती. त्याप्रमाणे सोमवार (दि.१४) पासून पहाटे ५-४५ ची बससेवा छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झाली आहे. या बस सेवेच्या प्रारंभी चालक रवी नवले व वाहक अरबाज शेख यांना अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे,सदस्य विठ्ठल ऐतवाडकर यांनी पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा दिल्या.



ही बस दररोज पहाटे ५-४५ वा.छ.शिवाजी महाराज चौक, ठाकरे चौक, लिंक रोड, कॉलेज चौक, सरगम चौक, करकंब-टेंभुर्णीमार्गे स्वारगेटकडे जाईल. तेथून परतीच्या प्रवासासाठी ११-४५ वा निघून याचमार्गे पंढरपूरला पोहचेल. आगार प्रमुख योगेश लिंगायत, स्थानक प्रमुख अंकुश सरगर, ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये, सचिव प्रा. धनंजय पंधे, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर, तालुका सदस्य श्रीराम साळुंखे, सागर शिंदे, अंकुश वाघमारे सतिश निपाणकर यांनी केले आहे. ही बस सुरू होण्यासाठी सहा. वाहतूक अधिकारी नवनाथ दळवे, व सहा.समाधान मेटकरी, सुमित भिंगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मनसेची धम्मयात्रा नागपूरकडे रवाना

### हजारो बौद्ध बांधवांचा सहभाग; मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ ऑक्टोबर-**

धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघाचे उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांच्या वतीने नागपूर दीक्षाभूमी येथे धम्म यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

ही धम्म यात्रा रविवारी पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील हजारो बौद्ध बांधवांना घेऊन पंढरपूर येथून नागपूरकडे रवाना झाली. या धम्म यात्रेची सुरुवात पंढरपूर येथील सारनाथ बुद्ध विहार येथे मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते पुष्पहार घालून त्रिसरण पंचशील ग्रहण करून अभिवादन करून करण्यात आली. भारतीय राज्यघटनेचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली आपल्या लाखो अनुयायांना सोबत घेऊन नागपूर येथील दीक्षाभूमी येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती.

हा दिवस धम्मचक्र परिवर्तन दिन म्हणून बौद्ध समुदायामध्ये महत्त्वपूर्ण आणि आदरणीय मानला जातो. तेव्हापासून १४ ऑक्टोबर रोजी देशभरातील लाखो बौद्ध बांधव नागपूर येथील दीक्षाभूमी येथे अभिवादन करण्यासाठी जातात. या धम्मचक्र परिवर्तन दिनाचे औचित्य साधून मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या संकल्पनेतून धम्म यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म यात्रेत पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील हजारो बौद्ध बांधवांनी सहभाग नोंदवून नागपूरकडे रवाना झाले.




### विविध यात्रांचे नियोजन

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांच्या संकल्पनेतून हिंदू-मुस्लिम बांधवांसाठी विविध यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अजमेर शरीफ यात्रा, आयोध्या वारी यानंतर आता धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त नागपूर मनसे धम्म यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

# अन्नछत्रातर्फे ८० कुस्तीगिरांना खुराकचे वाटप

### गत वर्षांपासून उपक्रम सुरु; ३७ वर्षांपासून महाप्रसाद सेवा अविरत सुरु

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि १४ ऑक्टोबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत न्यासाकडून ऑक्टोबर महिन्यातील ८० कीटचे वाटप रविवारी करण्यात आले.

तालुक्यातील जे पैलवान कुस्ती सरावासाठी कोल्हापूर,पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदी ठिकाणी



आहेत. अशा कुस्तीगरांसाठी न्यासाकडून गेल्या मकर संक्रांतीच्या दिवशी सदरचा उपक्रम सुरू करण्यात आला होता. प्रारंभी ५० जणांना किट देण्यात आले होते. गेली ३७ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे स्वामीकार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या कार्यास झळाळी प्राप्त झाली आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदी ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माद्यमातून सर्वे करून तालुक्यातील ८० पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै. मौला शेख बादोला, पै. महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी न्यासाचे सचिव शामराव मोरे, सौरभ मोरे, अभियंता अमित थोरात, बाळासाहेब पोळ, गोटू माने, प्रवीण घाटगे, एस. के. स्वामी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

### या जिन्नसांचा समावेश

समर्थ महाप्रसाद सेवेबरोबरच आता तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसादरुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने या जीन्नसांचा श्रींच्या प्रसादरुपी खुराकात समावेश आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अक्कलकोटमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ ऑक्टोबर-**

६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्था, यु. जी. कंपनी भीम नगर मित्रपरिवार संस्थापक अध्यक्ष नगरसेवक उत्तम गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली विजयादशमीदिनी अक्कलकोट शहराच्या प्रमुख मार्गावरून लेझीम ताफ्यासह मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीची सुरुवात भीमनगर अक्कलकोट येथून करण्यात आली. प्रारंभी भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीचे पूजन उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे व पोलीस उपनिरीक्षक करपे यांच्या हस्ते करण्यात आले. अक्कलकोट शहरातील राजे फत्ते-सिंह चौक ए-वन चौक, बसस्थानक परिसर, विजय कामगार चौक, कारंजा चौक , मेन रोड, राजे फत्ते-सिंह चौक ते भीमनगर मैंदर्गी रोडपर्यंत ही मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीचे प्रमुख केंद्र भगवान गौतम बुद्धांची मूर्ती होती. मिरवणूक पाहण्यासाठी अबालवृद्धानी गर्दी केली होती. शेवटी आभार म ाजी नगरसेवक उत्तम गायकवाड व युवा नेते तुषार गायकवाड यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### नागणसूर केंद्रात टॅलेंट हंट स्पर्धा

**अक्कलकोट, दि. १४ ऑक्टोबर-**

नागणसूर (ता. अक्कलकोट) केंद्राची केंद्रस्तरीय टॅलेंट हंट स्पर्धा नागणसूर मूले कन्नड येथे केंद्राचे केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे, केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव, प्राचार्य शंकर व्हनमाने, मुख्याध्यापक दोडमनी, गुरुनाथ नरूणे यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. शिवाजी शिंदे यांनी स्पर्धेबद्दल मार्गदर्शन केले. पर्यवेक्षकांनी अतिशय वस्तुनिष्ठ पद्धतीने गुणदान केले. सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन शरणप्पा फुलारी यांनी आभार शिवशरण म्हेत्रे यांनी मानले.

### भाजपा माढा तालुका सरचिटणीसपदी राहुल केदार

**मोडनिंब, दि. १४ ऑक्टोबर-**



भारतीय जनता पक्षाच्या माढा तालुका सरचिटणीसपदी मोडनिंब( ता. माढा) येथील राहुल केदार यांची नियुक्ती करण्यात आली. माढा येथे भाजपाची पदाधिकारी संवाद बैठक पार पडली. माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, नूतन तालुकाध्यक्ष योगेश पाटील यांनी ही निवड केली. केदार यांनी या अगोदर भाजपा माढा तालुका उपाध्यक्ष तसेच जिल्हा उपाध्यक्ष पदावर काम केले आहे.सामाजिक आणि राजकीय कार्य पाहून त्यांची या पदावर निवड करण्यात आली आहे.

### महात्मा फुले समता परिषद उत्तर सोलापूर तालुकाध्यक्षपदी उमा अकोलकर-माळी

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**



मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथील रहिवासी उमा नागेश अकोलकर-माळी यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, उतर सोलापूर तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांना निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष किशोर माळी यांनी दिले. यावेळी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस सुवर्णा झाडे-खेलबुडे, राष्ट्रवादी उत्तर महिला तालुकाध्यक्ष जलवंता मठे व पदाधिकारी उपस्थित होते. निवडीनंतर उमा अकोलकर-माळी यांचा उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष छगनराव भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली समाजासाठी काम करणार आहे. महिलाचे संघटन करून महिलांच्या अडचणी सोडवणार आहे. विकास कामांबरोबर सामाजिक काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### एनटीपीसीतर्फे सलगर जि. प. शाळेला दहा लाखांच्या साहित्यांचे वाटप

**अक्कलकोट, दि. १४ ऑक्टोबर-**

सलगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेमध्ये मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या प्रयत्नांतून एनटीपीसीकडून प्रत्येकी ७५ हजार रुपयांच्या किंमतीचे दहा संगणक संच, एक प्रिंटर आणि दहा ३२ जीबी पेन ड्राईव्हचे साहित्य जि. प. सलगर शाळेस भेट देण्यात आले. याप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर अध्यक्षस्थानी होते. एनटीपीसीचे चीफ जनरल मॅनेजर तपनकुमार बंडोपाध्याय होते. एनटीपीसी कंपनीचे एचआरचे जीएम मनोरंजन सारंगी, डीजीएम कविता गोयल, सिनिअर मॅनेजर विजयकुमार कोनाफरेड्डी, मोहम्मद लबीब अख्तर, पोलीस पाटील श्रीशैल बिराजदार, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगरचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत बिराजदार, उपाध्यक्ष रुपाली म्हेत्रे, सदस्य बसनिंगप्पा भासगी, मुख्याध्यापक गोब्बूर, सय्यद बागवान, हणमंतराव गुंडरगी, मल्लिनाथ चनपटणे, अनिता काटकर, हाजराबी बागवान, संध्या बशेट्टी, दिनकर भारती उपस्थित होते. तपनकुमार बंडोपाध्याय यांनी दिनकर भारती यांनी निर्माण केलेल्या क्युआर कोडचे कौतुक केले. मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांनी संगणक कक्षाची निर्माण करण्याच्या संकल्पनेचे विशेष कौतुक केले. अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, मनोरंजन सारंगी, कविता गोयल, विजयकुमार कोनाफरेड्डी, मोहमद लबीब अख्तर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन दिनकर भारती यांनी केले. आभार हाजराबी बागवान यांनी मानले.

### प्राथमिक समभागाच्या विक्रीची आजपासून होणार सुरुवात

**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

क्रिसिल अहवालानुसार वर्ष २०२३ मधील प्रवासी वाहनांच्या विक्रीवर आधारित जगातील तिसरी सर्वात मोठी ऑटो ओईएम असलेल्या हुंडाईची मोटर ग्रुपचा एक भाग हुंडाईची मोटर इंडिया लिमिटेड मंगळवार,१५ ऑक्टोबर रोजी इक्विटी शेअर्सची (ऑफर) प्राथमिक समभाग विक्री सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे.प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीची तारीख बीड ऑफरच्या एक कार्यालयीन दिवस आधी म्हणजेच सोमवार,१४ ऑक्टोबर असणार आहे. बोली, ऑफर गुरुवार, १७ ऑक्टोबर रोजी बंद होईल.प्रती इक्विटी शेअरसाठी १८६५ रुपये ते १९६० रुपयांपर्यंतचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे.

## केममध्ये मालधक्का नसल्याने कुंकू कारखानदार अडचणीत

### केमचे कुंकू जातं मुंबईला; व्यापाऱ्यांना यावं लागतं सोलापुराला

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ ऑक्टोबर-**

देशासह जगात प्रसिद्ध असलेल्या करमाळा तालुक्यातील केमच्या कुंकूची वाहतूक व्यवस्था रस्त्याच्या दूरावस्थेमुळे कोलमडलेली आहे. रेल्वेचा पूल डोकेदुखी बनलेला असून केम येथे रेल्वेचा मार्ग असूनही कुंकू कारखानदार अडचणीत सापडले आहेत.

या स्थानकावरून माल धक्का सुरू करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. करमाळा तालुक्यातील केम हे कुंकू निर्मितीसाठी प्रसिद्ध आहे. केम येथील कुंकवाला देशभरातून मागणी आहे. या ठिकाणी ५० कुंकवाचे कारखाने आहेत. या कारखान्यातून दररोज ७० टन कुंकूची निर्मिती होते. दरमहा वीस ते बावीस



कोटींची उलाढाल येथे होते. येथील कुंकवाला देशभरात प्रसिद्ध असलेल्या मंदिराच्या परिसरात मोठी मागणी आहे. केम येथून कुंकू बाजारात पाठवण्यासाठी वाहतुकीची व्यवस्था चांगली नसल्याने कारखानदारासमोर मोठ्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. केम गावाची जोडल्या जाणाऱ्या रस्त्याची दूरावस्था झालेली

> केम रेल्वे स्टेशनवर जलद गाड्यांना थांबा नाही. यामुळे येथील कारखानदारांना कुर्डूवाडी येथून प्रवास करावा लागतो. कुंकवाची वाहतूकसुद्धा सोलापूर किंवा कुर्डूवाडी रेल्वे स्टेशनवरून करावी लागते. कुंकूच्या वाहतुकीसाठी कुर्डूवाडी येथील मालधक्का केम येथे मंजूर करून सुरू करावा.
>
> **- अजित तळेकर, माजी सरपंच, केम**

असून रेल्वेचा पूल अरुंद व कमी उंचीचा असल्याने पुलाखाली सतत पाणी साठलेले असते. त्याशिवाय पुलाखाली मोठमोठे खड्डे आहेत. त्या पुलातून कुंकवाच्या वाहनांची वाहतूक होऊ शकत नाही. गावाला जोडणारा टेंभुर्णीकडून येणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत आहे. त्यामुळे मालमोटार चालक वाहतूक करण्यासाठी तयार होत नाहीत. शिवाय वाहतूक भाड्याची जास्त मागणी करत असल्याने कारखानदारांना नुकसान सहन करावे लागत आहे. केम रेल्वे स्थानकावर चेन्नई-मुंबई एक्सप्रेसला थांबा होता. परंतु कोरोना महामारीनंतर थांबा बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे केम परिसरातील नागरिकांना सोलापूर येथे जाण्यासाठी सकाळी रेल्वे नाही.

> **केम रेल्वे स्टेशनवर या गाड्या येतात**
>
> केम रेल्वे स्टेशनमधून २०२३-२४ या आर्थिक वर्षात ४९ हजार ६१४ प्रवाशांनी प्रवास केला. रेल्वे स्टेशनला ३७.२७ लाखाचे उत्पन्न मिळाले आहे. केम रेल्वे स्टेशनवर हैदराबाद मुंबई एक्सप्रेस, पुणे हरंगुळ एक्सप्रेस, पुणे सोलापूर डेमो दिवस रात्र, दौंड सोलापूर स्पेशल डेमो दिवसा, कन्याकुमारी पुणे एक्सप्रेस पुणे कडे जाताना, दादर पंढरपूर-सातारा एक्सप्रेस आठवड्यातून तीन दिवस.

## बार्शीत महाराष्ट्रातील पहिले खरेदी केंद्र

### कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीन, उडीद, मूग खरेदी केंद्राचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ ऑक्टोबर-**

शेतकऱ्यांच्या सोयाबीन, उडीद, मूग या शेतीमालाला योग्य दर मिळावा म्हणून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे महाराष्ट्र राज्यातील पहिल्या खरेदी केंद्राचा शुभारंभ आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आला.

खरेदी केंद्र सुरु झाल्याने योग्य दर मिळणार आहे. एनसीसीएफ यांच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य पणन महासंघ मुंबई यांच्यामार्फत तुळजाभवानी कृषी व साधन पुरवठा सहकारी संस्था मर्या. उंबरगे या संस्थेंतर्गत धनश्री कृषी केंद्र, प्लॉट नं. १३६, मार्केट यार्ड, बार्शी येथे हे खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना सोयाबीन, उडीद, मूग हा शेतीमाल या केंद्रावर विक्री करता येणार आहे. यंदा पावसामुळे खरीप पिकांची काढणी लांबणीवर पडलेली होती. शिवाय बाजारभावापेक्षा हमीभावाचा दर हा कमी असल्याने खरेदी केंद्र ही सुरु करण्यात आलेली नव्हती. पण आता खरिपातील पिकांची काढणी कामे झालेली आहेत. त्यामुळे आवक वाढत आहे. शेतकऱ्यांची गरज ओळखून हे खरेदी केंद्र सुरु केल्याचे आ. राजेंद्र राऊत यांनी सांगितले.



> **ही कागदपत्रे आवश्यक**
>
> शेतकऱ्यांनी सोयाबीन, उडीद, मूग खरेदी केंद्रावर आणताना पीक नोंदणी असलेला ७/१२, आधारकार्डशी संलग्न असणारे बँक पासबुक झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स, कार्यरत असलेला मोबाईल नं., तलाठी पीकपेरा (ई पीक पाहणी २०२४) ही कागदपत्रे जमा करावीत.

## अक्कलकोट संस्थानतर्फे विजयादशमी उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ ऑक्टोबर-**

दसरा सण मोठा नाही, आनंदाला नाही तोटा याप्रमाणे ऐतिहासिक अक्कलकोट राजघराणे संस्थानच्यावतीने शाही दसरा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

शाही दसरा उत्सवाची सुरुवात श्रीमंत राजकुमार मालोजीराजे भोसले तिसरे यांनी जुन्या राजवाड्यातील प्रथम देवदेवतांचे पूजन केले. मानकरी सर्व उप-स्थित मान्यवरांसमवेत सांगवी रोडवरील शरण म ठातील शमीवृक्षाची पूजा करण्यात आली. यावेळी धार्मिक विधी पार पडला. या शमी पूजनानंतर पुन्हा राजवाड्यात येऊन रयतेच्या मानकरी यांच्या उप-स्थितीमध्ये सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. शाही दसरा सभारंभात यंदा तालुक्यातील नऊ नारीशक्तींचा सन्मान सोहळा झाला. यामध्ये नागम्मा बजे (खे-ळाडू), सीमाली कोळी (सहायक पोलीस निरीक्षक), कुंदा नखाते (संगीत कलाकार), रूपाली शहा (शैक्षणिक), सुमती फडतरे (इतिहास संशोधिका), डॉ. गिरीजा राजीमवाले (वैद्यकीय व सामाजिक), आरती काळे (लेखिका), सोनल जाजू (सामाजिक), वनिता तंबाके (उद्योजक) अशा विविध क्षेत्रात



उल्लेखनीय कामगिरी केलेल्या स्त्री-शक्तीचा अक्कलकोट राजघराण्यातर्फे सन्मान करण्यात आला. प्रारंभी नीरव पोतदार या छोट्याशा मुलाने शिवगर्जना दिली आणि ओंकार जाजू यांनी दांडपट्ट्याचा खेळ सादर केला. वक्तृत्व स्पर्धामध्ये यश प्राप्त केलेल्या प्रथम प्रचिती पाटील, द्वितीय शिवानी भोसले, तृतीय श्रेया माशाळ, उत्तेजनार्थ मानसी खानुरे, कन्याकुमारी पाकणीकर, पुष्पा खानापुरे आदींचा मालोजीराजे भोसले यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राजमाता जयप्रभादेवी राजेभोसले, मामा आशिष कदम यांच्यासह सर्व मानकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवानी भोसले यांनी केले, तर आभार आरती काळे यांनी मानले.

## रामराज्य निर्माण करणारा निवडून यावा

### डॉ. शिरीष कुमठेकर : जुळे सोलापुरातील रावण दहनप्रसंगी प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १३ ऑक्टोबर-**

जो जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी नेहमी तत्पर असतो, तोच रामराज्य निर्माण करू शकतो. त्यामुळे दिलीप माने यांच्यासारखा नेता आमदार म्हणून निवडून आला पाहिजे, असे प्रतिपादन कुमठेकर हॉस्पिटलचे डॉ. शिरीष कुमठेकर यांनी केले.

विजयादशमीच्या पावन पर्वावर जुळे सोलापूर येथे दिलीप माने विचार मंचच्या वतीने आयोजित रावण दहन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला हजारो सोलापूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सोलापुरातील 'केएलई' मैदाना-वर झालेल्या रावण दहन कार्यक्रमात फटाक्यांच्या आतषबाजीत हजारो नागरिकांच्या उपस्थितीत रावणाचा पु-तळा जाळण्यात आला. यावेळी काढण्यात आलेल्या शोभायात्रेत पारंपारिक वेशभूषा केलेल्या नागरिकांनी उत्साहात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संयोजक पृथ्वीराज माने आणि मयुरा माने होते. याप्रसंगी माजी आमदार दिलीप माने यांचा सत्कार अश्विनी मेडिकल कॉलेजचे डायरेक्टर अमित पटेल यांच्या हस्ते करण्यात आला.



कार्यक्रमाला गांधी टेक्स्टाईलचे अमित गांधी, स्टार ग्रुपचे अध्यक्ष सचिन चव्हाण, डॉ. शिरीष कुमठेकर, सागर मल्लूहाड, डॉ. राहुल कुलकर्णी, डॉ. नेहासिंग रोडा, व्यंकटेश पटवारी, ज्येष्ठ पत्रकार शांतकुम ार मोरे, डॉ. नम्रता शिंदे, डॉ. सिद्धेश्वर महिंद्रकर, डॉ. वैशाली महिंद्रकर, डॉ. अमित कोठाळे, डॉ. राहुल कुलकर्णी, डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. धनराज गंभीरे, सरकारी वकील गिरीश सरवदे आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले, तर आभार पृथ्वीराज माने यांनी मानले.

> **जनहितासाठी सदैव कटिबद्ध : माजी आ. माने**
>
> विजयादशमी हे सत्याच्या विजयाचे प्रतीक आहे. या दिवशी आपण अन्याय आणि वाईट प्रवृत्तींवर विजय मिळवण्याचा संकल्प करतो. जनतेच्या हितासाठी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. दक्षिण सोलापूरच्या जनतेने सदैव मला साथ दिली आहे आणि आगामी काळातही त्यांच्या आशीर्वादाने आपण रामराज्याच्या दिशेने वाटचाल करू, असे मत दिलीप माने यांनी व्यक्त केले.

## मोहोळमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सघोष पथसंचलन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १४ ऑक्टोबर-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोहोळ शाखेचे सघोष पथसंचलन शनिवारी शहरात उत्साहात पार पडले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना होऊन २०२५ साली १०० वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजेच या दसऱ्या दिवशी संघाच्या शताब्दी वर्षाला सुरुवात होत आहे. त्यानिमित्त यंदाच्या वर्षी मोहोळ तालुक्यात तीन ते चार ठिकाणी संचलन काढण्यात येणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हे मोहोळमध्ये घोषासहित संचलन झाले.

मार्केट यार्ड मैदान शिवाजी चौक, पोलीस लाईन, बुधवार पेठ, आदर्श चौमुखी मारुती, व्यापारी मोफत वाचनालय, उद्या मारुती ते परत मार्केट यार्ड असे जवळजवळ ४५ मिनिटे हे संचलन झाले. दंडासह गणवेश आणि घोष असा आकर्षक पेहराव केलेले जवळजवळ १८० स्वयंसेवक त्यात सहभागी झाले होते. जागोजागी नागरिकांनी संचालनावर



पुष्पवृष्टी केली. यापूर्वी ६ ऑक्टोबर रोजी मिरी (ता. मोहोळ) येथे संचालन झाले होते. यानंतर येत्या २० ऑक्टोबर रोजी आष्टी येथे संचलन होणार असल्याचे मोहोळ शाखेच्या वतीने सांगण्यात आले. या संचलनात तालुका संघचालक ॲड. अमोल देशपांडे, तालुका कार्यवाह महावीर जाधव, सहकार्यवाह प्रा. मदन लाळे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे, अविनाश पांढरे, मच्छिंद्र गाडे-पाटील, महेश सोवनी, सतीश काळे, सुशील क्षीरसागर, अरविंद माने, मंगेश सोवनी, पद्माकर कोळेकर, अरविंद माने सहभागी झाले होते.

## उत्साहपूर्ण वातावरणात रंगला दांडिया महोत्सव

### ॲड. सोमनाथ वैद्य : कोणतीही अडचण असू द्या, या भावाला हाक द्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

उत्साह पूर्ण वातावरणात मांगल्य मंगल कार्यालयात दांडिया जलसा महोत्सव रंगला. पारंपारिक वेशभूषेत सुमारे २ हजार महिला व मुलींनी उत्स्फूर्तपणे हजेरी लावली. दरम्यान, कोणतीही अडचण असू द्या, या भावाला हाक द्या. मी नेहमी मदतीसाठी तत्पर राहील, अशी ग्वाही स्वयंम् शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक ॲड. सोमनाथ वैद्य यांनी यावेळी दिली.

ग्रोथ डान्सिंग स्कूल प्रस्तुत दांडिया जलसा २०२४ हा कार्यक्रम रविवारी मांगल्य सभागृहात मोठ्या उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून स्वयंम् शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक एड. सोमनाथ वैद्य यांची उपस्थिती होती. उदे ग अंबे उदे... आई राजा उदे उदे चा नारा देत दांडिया जलसा २०२४ची सुरुवात झाली.



प्रारंभी एड. सोमनाथ वैद्य यांच्या हस्ते नटराज मूर्तीचे पूजन करण्यात आले. श्रीफळ वाढवून या दांडिया कार्यक्रमास प्रारंभ झाला.

या दांडियास महिला व मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दांडिया आणि गरब्याच्या तालावर हजारो महिला व युवती थिरकल्या. सर्वांसोबत सोमनाथ वैद्य यांनीही ठेका धरला. या दांडिया मध्ये सुमारे २ हजार हून अधिक महिलांनी भाग घेतला होता. विविध गाण्यांच्या ठेक्यावर नृत्य करीत उत्तरोत्तर दांडियाची रंगत वाढवली. ग्रोथ डान्सिंग स्कूल प्रस्तुत सर्व संयोजक सहकाऱ्यांनी नेटक्या पद्धतीने नियोजन केले होते.

आरती आणि भोंडल्याने या दांडियाची सुरुवात झाली. पारंपरिक पेहरावात महिला व मुलींनी बहारदार गाणी अशा उल्हास पूर्ण वातावरणात हा दांडिया रंगत गेला. वाद्यवृंदांचा ठेका आणि नेटक्या संयोजनामुळे या कार्यक्रमाला बहर आला होता.

वैविध्यपूर्ण नेपथ्य, आकर्षक रोषणाई, जोशपूर्ण गाणी आणि उत्तम वाद्यवृंदाने सर्वांना आकर्षित केले. नव्या वळणाच्या दांडिया ठेका सादर करून उपस्थितांनी धमाल उडवून दिली. मराठमोळी संस्कृती जोपासत पारंपरिक वेशभूषेत दांडिया खेळून सर्वांचे लक्ष वेधले. या दांडिया जलसा म होत्सवात पारंपरिक वेशभूषा खास आकर्षण ठरली. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार अभय दिव-ाणजी आणि व्यंकटेश पटवारी हे सहकुटुंब उपस्थित होते.

> **आमदार झाल्यावर माधुरी दीक्षितला आणू : ॲड. वैद्य**
>
> तब्बल १९ वर्षाचा विधिमंडळ आणि मंत्रालयातील कामाचा तगडा अनुभव आहे. दक्षिण सोलापूर मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्याचे माझे ध्येय आहे. आपले सहकार्य असेच राहू द्या. कोणतीही अडचण असू द्या, या भावाला सर्व लाडक्या बहिणींनी हाक द्यावी. तत्पर मदतीसाठी हा भाऊ तयार आहे. या विधानसभा निवडणुकीत सर्वांनी पाठबळ द्यावे. मी आमदार झाल्यानंतर पुढील वर्षी नवरात्र महोत्सवात दांडियासाठी सिने अभिनेत्री माधुरी दीक्षित यांना आणूया, असे आश्वासन ॲड. सोमनाथ वैद्य यांनी यावेळी दिले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तेरखेडा परिसरात गूढ आवाज; नागरिक भयभीत

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१४ ऑक्टोबर -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा परिसरात सोमवारी दि.१४ रोजी अचानक गूढ आवाज आला आहे.

सकाळी ९ च्या दरम्यान घरावरील पत्रे थरथरले असल्याचे जाणून आले होते.

हा आवाज नेमका कशाचा आहे? यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये थोडावेळ चर्चा होती.

गेले अनेक दिवसांपासून वारंवार तेरखेडा भागात असे गूढ आवाज ऐकू येत आहेत मात्र, हे आवाज नेमके कशामुळे येत आहेत त्याचे रहस्य उलगडले नाहीत.

प्रशासनाकडून याचा कसलाच खुलासा होत नसल्याने प्रशासन मात्र याबाबत मौन बाळगून आहे. यामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत.



## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ठरणार महायुतीच्या उमेदवारासाठी 'गेम चेंजर'

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१४ ऑक्टोबर -**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे राज्यातील महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत मोठे बळ मिळणार असुन या योजनेमुळे तुळजापुर तालुक्यातही महायुतीच्या उमेदवाराला विधानसभा निवडणुकीत मोठा फायदा होणार असल्याचे दिसुन येत आहे. तुळजापुर तालुक्यात जवळपास ७० हजार महिलांना या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा फायदा झाला आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरणार असल्याचे दिसुन येत आहे.

लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला म्हणावे तसेच यश प्राप्त झाले नव्हते त्यामुळे महायुतीमध्ये अस्वस्थतता पसरली होती. त्यातच विधानसभा निवडणुक होणार असल्याने व नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला घावघवीत यश मिळाल्याने महाविकास आघाडीचे नेते विधानसभा निवडणुकीतही महायुतीचा दारुण पराभव करून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असे भाकीत करत होते. आणि लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे त्यामध्ये तथ्यही होते. त्यामुळे महायुतीच्या गोटामध्ये अस्वस्थतता पसरली होती. अशा कठीण प्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मध्यप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणही योजना सुरु केली. या योजनेमुळे तसेच या योजनेला महिलांचा मिळालेला उदंड प्रतिसाद यामुळे राज्यात बॅकफुटवर गेलेली महायुती पुन्हा एकदा फॉर्मात आली. राज्यसरकार केवळ ही योजना जाहीर करून थांबले नाही



तर या योजनेसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक महिलांच्या खात्यावर महिन्याला १५०० रुपये याप्रमाणे पाच महिन्याचे ७५०० रुपये जमा केले आहेत त्यामुळे या महिला महायुतीच्या सरकारवर आज प्रचंड खुश आहेत. याचा फार मोठा परीणाम येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी तुळजापुर तालुक्यातील ७० हजार महिला पात्र ठरल्या आहेत यातील बहुतांश महिलांच्या खात्यावर ऑक्टोबर महिन्यापर्यंत पैसे जमा झाले आहेत. त्यामुळे या लाडक्या बहिणी निश्चितपणे विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या पाठीशी राहण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन महाविकास आघाडीच्या उमेदवाराला ५० हजारपेक्षा जास्त मताधिक्य मिळाले होते. वास्तविक पाहता या मतदार संघात महायुतीचे आमदार असतांना हे महायुतीसाठी योग्य नव्हते. मात्र त्यावेळी परीस्थितीच तशी विचित्र होती. मात्र आज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे ती परीस्थिती राहिली नाही. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे तुळजापुर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीचे तिकीट मिळावे म्हणुन आज अनेकजण प्रयत्न करत आहेत. मात्र लाडकी बहीण योजनेमुळे व त्या योजनेला महिलांचा मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे महायुतीमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आ. पाटील यांनी तुळजापुर विधानसभा मतदार संघातील जास्तीत जास्त महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा फायदा व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट या तीनही पक्षाचे या मतदार संघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वी व्हावी यासाठी प्रयत्न केले. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी या योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांचे अर्ज भरण्यासाठी मोफत सोय केली होती. त्यामुळे या मतदार संघातील जास्तीतजास्त महिलांना या योजनेचा फायदा झाला आहे.

## उमरगा व मुरूम बसस्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी १० कोटी रुपये निधी मंजूर

### आमदार ज्ञानराज चौगुले यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**
महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाकडून उमरगा व मुरूम बसस्थानकाच्या पुनर्बांधणी, नूतनीकरणासाठी प्रत्येकी ५ कोटी रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे.

उमरगा हे राष्ट्रीय महामार्गावरील शेवटचे व सीमावर्ती भागातील तालुक्याचे ठिकाण असून याठिकाणी शिक्षण व व्यापार यासाठी दररोज हजारो लोक येत असतात.

यामुळे येथील बसस्थानकावर नेहमीच वर्दळ असते. परंतु येथील बसस्थानकाची सध्याची इमारत जीर्ण झाल्याने प्रवाशांना विविध गैरसोयीचा



सामना करावा लागत होता.

तसेच मुरूम बसस्थानक हे संपूर्ण मोडकळीस आल्याने नागरिक, विद्यार्थी व विशेषतः महिलांची गैरसोय होत होती.

या अनुषंगाने आ. ज्ञानराज चौगुले यांच्या पाठपुराव्यामुळे या दोन्ही बसस्थानकाच्या पुनर्बांधणी व नुतणीकरणासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

सदर कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. चौगुले यांनी मुख्यमंत्री तथा परिवहन मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष भरतशेठ गोगावले, तसेच याकामी वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड यांचे आभार मानले आहेत.

## शिराढोण येथे धनगर समाजाचे शेळ्यांमेंढ्यासह ढोल बजाओ आंदोलन


**तभा वृत्तसेवा**
**शिराढोण, दि.१४ ऑक्टोबर -**
धनगर जमातीच्या अनुसूचित जमाती आरक्षणाचा शासन निर्णय तात्काळ काढून मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळावा यासाठी कळंब तालुक्यातील शिराढोण येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात शेळ्या-मेंढ्यासह ढोल बजाव आंदोलन करण्यात आले. या आंदोलनासाठी रविवार असतानाही धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी एस.टी. आरक्षणाची अंमलबजावणी झालीच पाहिजे या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. सकाळी ९.३० या सुमारास या आंदोलनास सुरुवात झाली. यावेळी उपस्थित बांधवांनी एस.टी. आरक्षण अंमलबजावणी साठी निर्वाणीचा इशारा दिला.

शासनाने या आंदोलनाची दखल घेऊन समाजाला सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रवाहात येण्याची वाट मोकळी करून द्यावी.

जर शासनाने सकारात्मक निर्णय नाही घेतला तर महाराष्ट्राचा धनगर समाज आपला अधिकार मिळवण्यासाठी आक्रमकपणे आंदोलन करेल व त्याचे गंभीर परिणाम शासनाला भोगावा लागेल असा इशारा आंदोलकांच्या माध्यमातून यावेळी देण्यात आला.

## चर्मकार समाजाच्या स्मशानभूमीची दुरावस्था; लाईटची सोय करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ ऑक्टोबर -**
नळदुर्ग येथील चर्मकार समाजाच्या स्मशानभुमीची मोठी दुरावस्था झाली असुन स्मशानभुमीत ना जायला रस्ता आहे ना स्मशानभुमीत लाईटची सोय आहे. आज स्मशानभुमी झाडे-झुडपे आणि गवतामध्ये शोधावे लागत आहे. नगरपालिका प्रशासनाने तात्काळ या स्मशानभुमीत जायला रस्ता आणि लाईटची सोय करावी अशी मागणी होत आहे.



नळदुर्ग शहरात आज कोट्यावधी रुपये खर्चाची विकास कामे सुरु आहेत. मात्र नगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चर्मकार समाजाच्या स्मशानभुमीची आज मोठी दुरावस्था झाली आहे. या स्मशानभुमीत जाण्यासाठी साधा रस्ता नाही अतिशय अडचणीतुन वाट काढत मृतदेह अंत्यविधीसाठी स्मशानभुमीत न्यावे लागते. पावसाळ्यात तर अतिशय वाईट अवस्था याठिकाणी आहे कारण उघड्यावरच अंत्यविधी करावे लागते कारण या स्मशानभुमीला केवळ बाजुनी संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. वरती कांहीच नसल्याने उघड्यावरच मृतदेहावर अंत्यसंस्कार करावे लागते. त्यात पाऊस आला तर अतिशय वाईट परीस्थितीला मृताच्या नातेवाईकांना सामोरे जावे लागते. आज विकासाच्या मोठं मोठ्या गप्पा सुरु आहेत मात्र या विकासाच्या गप्पामध्ये चर्मकार समाजाच्या स्मशानभुमिकडे पाहायला कुणाला वेळ नाही. ही मोठी शोकांतिका आहे.

वास्तविक पाहता हा विषय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडे गेला असता तर क्षणात त्यांनी याठिकाणी चांगल्या दर्जाची व सर्व सोईनीयुक्त अशी स्मशानभुमी बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे काम केले असते.

## तुळजाभवानी महाविद्यालयात बालिका दिन व नवदुर्गा उत्सव संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ ऑक्टोबर -**
तुळजाभवानी महाविद्यालयात जागतिक बालिका दिन व नवदुर्गा उत्सव दि.११ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

नवदुर्गा उत्सव साजरा करणे एक आनंददायी आणि सामुदायिक अनुभव असू शकतो. विद्यार्थिनींमधे देवी दुर्गेच्या नव रूपांची महती आणि तिच्या शक्तीचे स्मरण करून उत्साह निर्माण करणे हा या उत्सवाचा मुख्य उद्देश असतो. त्याचप्रमाणे 'उल्हास' नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत आजच्या नवीन पिढीला शिक्षणाचे महत्त्व मुलींनी नवदुर्गाचे स्मरण करून त्यांचे गुण आत्मसात करावे असा संदेश देण्यात आला.



या कार्यक्रमात लेक वाचवा, लेक वाढवा, लेक घडवा असा संदेश प्रमुख पाहुणे मीना सोमजी यांनी दिला. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ. छाया दापके यांनी महिला सुरक्षा व महिला विषयक कायदे याविषयी मार्गदर्शन केले व आधुनिक शिक्षणाची कास धरून स्वावलंबी व्हावे असा मोलाचा संदेश देण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी कनिष्ठ विभाग प्रमुख प्राध्यापक डी.एच. लोंढे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के.एस. कदम यांनी केले तर प्रस्ताविक व्ही.के. बाबर यांनी केले आणि आभार ए.जी. लकशेट्टी यांनी मानले. सदर कार्यक्रम प्रसंगी कनिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थिनी व गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते.

## उमरगा शहरात सहा सार्वजनिक प्रसाधनगृहे बांधकामासाठी निधी मंजूर : आ. चौगुले



### महिलांची गैरसोय होणार दूर...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**
उमरगा शहरात विविध ठिकाणी शौचालये नसल्याने किंवा नादुरुस्त असल्याने शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील अनेक महिलांना विशेषतः उमरगा शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांना याचा जास्त त्रास सहन करावा लागत आहे.

ही गरज ओळखुन आमदार ज्ञानराज चौगुले यांनी नगरविकास विभागाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत उमरगा शहरातील उपजिल्हा रुग्णालय परिसर, शासकीय झोपडपट्टी, इंदिरा चौक, शिंदे गल्ली, गौतम नगर व आरोग्य नगरीचे कॉर्नर या सहा ठिकाणी नवीन शौचालय बांधणे व उर्वरित नादुरुस्त शौचालयांची दुरुस्ती करणे यासाठी एकूण २.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे.



याअंतर्गत भारतीय व पाश्चात्य पद्धतीचे सीट व मुतारी उपलब्ध होणार असुन प्रत्येक शौचालयाशेजारी स्वतंत्र विंधन विहीर व सोलार पॅनलचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. नव्याने होणाऱ्या सार्वजनिक शौचालयाचा उपयोग त्या त्या भागातील सुमारे ७५० कुटुंब व शहर व शहरात येणाऱ्या असंख्य नागरिकांना करता येणार आहे.

सदर कामासाठी निधी मंजुर केल्याबद्दल आ. ज्ञानराज चौगुले यांनी मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे व सदरकामी वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड यांचे आभार मानले आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### धनगर समाजाच्या वतीने तेर गाव कडकडीत बंद

**तेर, दि.१४ ऑक्टोबर -**
धनगर समाज बांधवांचा एसटीमध्ये समावेश करण्याचा मागणीसाठी तेर येथे १४ आक्टोबरला कडकडीत बंद पाळण्यात आला. सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने तेर बंदचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून तेर येथील व्यापारी यांनी कडकडीत बंद पाळला. धनगर समाज बांधवांच्या वतीने मंडळ अधिकारी शरद पवार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.



### रतन टाटा यांना राजेगावात श्रद्धांजली

**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**
३० सप्टेंबर १९९३ भूकंप झाला तेव्हा उद्योग सम्राट पद्मभूषण, पद्मश्री, रतनजी टाटांनी राजेगाव हे गाव पुनर्वसन करून आपला दानशूरपणा दाखवून दिला. आशा महान व्यतिमत्वास आज दि.१४ ऑकटोबर रोजी ग्रामपंचायत कार्यालय राजेगाव व शरद पवार विद्यालय राजेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. प्रसंगी गावचे सरपंच सुरेश देशमुख, प्रशासकीय अधिकारी मोरे, मेजर चंदकांत देशमुख, ग्रा.प. सदस्य देशमुख प्रविण, कालिदास बनसोडे, अंगणवाडी कर्मचारी देशमुख, गावातील प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.




### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर सचिवपदी नवीन बनसोडे

**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यतत्पर जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते आणि प्रदेश सरचिटणीस सुरेश पाटील, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष अतुल जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा कार्यालय धाराशिव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय शहर सचिवपदी नवीन अरुण बनसोडे यांची नियुक्तीपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकारी उपस्थित होते.



### तेर येथे विजयादशमी उत्साहाने साजरी

**तेर, दि.१४ ऑक्टोबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे विजयादशमी उत्साहाने साजरी करण्यात आली. विजयादशमी निमित्ताने श्री संत गोरोबा काका यांची पालखी व श्री कोष्टांबिकादेवीची पालखीची मुख्य रस्त्यावरून प्रतिवर्षाप्रमाणे मिरवणूक काढण्यात आली. पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक भक्त शिमोल्लघंनासाठी सहभागी झाले होते. यावेळी हभप रघुनंदन महाराज पुजारी, सोमनाथ यादव, पद्माकर फंड, नवनाथ पांचाळ,अमोल कस्तुरे, गणेश फंड व नागरिक सहभागी झाले होते. विजयादशमी निमित्ताने श्री. कोष्टांबिकादेवी मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

## २१ हजार लोक वर्गणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घेतले स्काऊट गाईड पथसंचलन युनिफॉर्म




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**
श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी ता उमरगा येथील स्काऊट अँड गाईड विभागासाठी गावातील सामाजिक बांधिलकी जोपासणारे कुटुंबीय आणि व्यक्तीच्या माध्यमातून २९ हजार रुपये लोक वर्गणी गोळा करून विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड युनिफॉर्म पतसंचलन किट ते राज्यपाल पुरस्कार फीस आणि जाणे-येणे प्रवास खर्च लोक वर्गणी गोळा करून विद्यार्थ्यांना परीक्षा फॉर्म भरले. संस्थेचे माजी सचिव कै.स्वा.से. चंद्रशेखर बदोले त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या सूनबाई सौ पद्मजादेवी विठ्ठलराव बदोले यांच्यातर्फे ६ हजार ५०१ रुपये तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष कै. गोपाळराव अण्णाराव पाटील त्यांच्या स्मरणार्थ ज्येष्ठ सुपुत्र राजाराम गोपाळराव पाटील यांच्यातर्फे ६ हजार ५०१ रुपये तसेच इतर मान्यवराकडून लोकवर्गणी गोळा करून विद्यार्थ्यांना राज्यपाल पुरस्कार परीक्षा बसवण्यासाठी युनिफॉर्मची कमतरता होती. पालकांच्या आर्थिक अडचणामुळे तीन हजार रुपये खर्च करणे शक्य नसल्यामुळे स्काऊट गाईड विभाग प्रमुख मनोजकुमार गुरव यांच्या पुढाकारातून लोकवर्गणीच्या माध्यमातून आर्थिक मदत घेऊन स्काऊट गाईड युनिफॉर्म आणि इतर खर्च गोळा करण्यात आले. यामध्ये मोठा पुढाकार पद्मजादेवी विठ्ठलराव बदोले यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त अवस्था व खर्च टाळून वाढदिवसा वरती होणारा खर्च स्काऊट गाईड विभागास देण्याचे मानस व्यक्त केले.

राजाराम पाटील यांच्या वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांनी पण आर्थिक मदत केले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे, ज्योती आमले, सूर्यवंशी, पूजा बदोले, संजय पाटील, बसवराज कुंभार, शिवपुत्र बोळशेट्टे, पाटील यासह माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## कैलास पाटील पुन्हा आमदार होणार नाहीत तोपर्यंत पायतान घालणार नाही : साळुंके

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**
आमदार कैलास पाटील हे अतिशय प्रभावी नेतृत्व असल्याचे धाराशिव व कळंब मतदार संघातील सर्व जनतेने पाहीले आहे. विकास कामांसाठी त्यांचीच पुन्हा गरज आहे. ते पुन्हा जोपर्यंत आमदार होणार नाहीत तोपर्यंत मी पायतान म्हणजे चप्पल किंवा बूट घालणार नसल्याचा दृढ संकल्प शिवसेना (ठाकरे) चे प्रशांत साळुंके यांनी आई येडेश्वरी मातेसमोर केला असल्याचे साळुंके यांनी सांगितले.

पुढे बोलताना साळुंके म्हणाले की, गेल्या पंचवार्षिक निवडणुकी दरम्यान कैलास पाटील हे आमदार व्हावेत यासाठी येडेश्वरी मातेला धाराशिव ते येडेश्वरी चालत जाण्याचा व अजमेर येथील शरीफ दर्ग्यास चादर चढविण्याचा नवस केला होता.

ते आमदार झाल्यानंतर अजमेर येथील शरीफ दर्ग्यास चादर चढविण्यासह येडेश्वरी मातेला पायी चालत जाऊन नवस फेडल्याचे त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त...

### शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज महाविद्यालयांनी तात्काळ सादर करावे

**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

इतर मागास बहुजण कल्याण विभागाकडून व्हीजेएनटी,ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजनेचे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरण्यासाठी http:// mahadbtmahit.gov.in हे संकेतस्थळ २५ जुलै २०२४ पासून सुरू केले आहे. सन २०२४- २५ करिता बहुतांश विद्यार्थ्यांनी महाडीबीटी प्रणालीवर अर्ज भरले आहेत व ते अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अद्यापपर्यंत अर्जांची पडताळणी करून सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजण कल्याण या कार्यालयाकडे सादर केले नाहीत.जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांनी सन २०२४ - २५ करिता आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिन वरती प्रलंबित असलेले व्हीजेएनटी, ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे पात्र अर्ज मंजुरीकरीता तात्काळ कार्यालयाकडे सादर करावे. अर्ज सादर करतांना शाळा सोडलेला दाखलाव गुणपत्रक हे मुळ प्रतच असावेत याची दक्षता घ्यावी.ज्या अर्जामध्ये त्रुटी असतील असे अर्ज त्रुटी पुर्तता करुनच कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करावेत. महाविद्यालयाच्या लॉगिनला एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही.याची दक्षता घ्यावी.तसेच ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी महाविद्यालय स्तरावरून सूचित करावे.असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक बाबासाहेब अरवत यांनी कळविले आहे.




# आपली तीर्थक्षेत्रे राष्ट्रीय नकाशावर ठळकपणे मांडण्याचा प्रयत्न

## संत गोरोबाकाकांचे कळंब आयटीआयला नाव : आमदार राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**



संतांच्या मांदियाळीत ज्येष्ठ अशी ख्याती असलेल्या संतश्रेष्ठ गोरोबाकाकांच्या नामफलकाचे अनावरण करताना एक वेगळीच ऊर्जा आपल्या सर्वांगात संचारली आहे. गोरोबाकाकांची भक्ती आणि तुळजाभवानीची शक्ती, असा अलौकिक संगम म्हणजे आपला धाराशिव जिल्हा. गोरोबाकाकांचे भक्तीपीठ आणि तुळजाभवानी देवीचे शक्तीपीठ देशाच्या नकाशावर अधिक ठळकपणे आणण्यासाठी आपले सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्यातून पर्यटन आणि रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आपल्या सर्वांचा मानबिंदू असलेले संतश्रेष्ठ गोरोबाकाकांचे नाव कळंब येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला दिले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

रविवारी सायंकाळी कळंब येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांच्या नामफलकाचे अनावरण आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. वारकरी सांप्रदायामध्ये वारकरी संप्रदायामध्ये संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. संत, ज्ञानेश्वर, सोपानदेव, निवृत्तीनाथ आणि चिमुकली मुक्ताई संत नामदेवांसह तेर येथे गोरोबा काकांच्या भेटीला आले होते. सर्व संतमंडळीच्या ठायी काकांच्या प्रति असलेला आदरभाव यातून स्पष्ट होतो. मराठी भाषेतील पाहिले विचार संमेलन म्हणूनही या प्रसंगाकडे पाहता येईल. काकांनी त्यांच्या अभंग रचनांमधून व्यापक मानवी कल्याणाची धरलेली आस आपल्या सर्वांसाठी आजही प्रेरणादायी आहे. त्यामुळेच काकांचे नाव कळंब येथील शासकीय अद्योगिक संस्थेला देण्याची विनंती आपण राज्यसरकारला केली होती. त्यानुसार आज काकांच्या नावाच्या फलकाचे आपल्या सर्वांच्या उपस्थितीत अनावरण होत आहे. या अपूर्व क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य आपल्या सर्वांना लाभल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची संत गोरोबाकाकांवर अतुट श्रध्दा आहे. त्यामुळेच त्यांनी संत गोरोबाकाकांच्या नावाचा सरकारकडे आग्रह धरला. मागील अनेक वर्षांपासून विविध शासकीय निमशासकीय संस्थांना संत, महंतांची नावे द्या, अशी आपण सातत्याने मागणी केलेली आहे. संत, महंतांच्या नावामुळे शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांसोबतच शिक्षणाच्या पावित्र्याची वृध्दी झाल्याखेरीज राहणार नाही. महायुती सरकारने गोरोबाकाकांचे नाव कळंबच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला देवून संत-महंतांप्रति असलेला राज्य सरकारचा आदरभाव त्यांनी नमुद केला आहे. त्यासाठी आमदार पाटील आणि राज्य सरकारचे आपण धन्यवाद मानतो, असे मत अखिल भारतीय वारकरी परिषदेचे अध्यक्ष हभप. प्रकाश बोधले महाराज यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास शिक्षक आमदार विक्रम काळे, हभप. प्रकाश बोधले महाराज, नितीन काळे, अजित पिंगळे, शिवाजी लकडे, विकास बारकुल, शिवाजी गिड्डे, दत्ता साळुंके, अमित शिंदे यांच्यासह औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा अभियान

# भोसले हायस्कुलने पटकावला प्रथम क्रमांक; २१ लाखांचे बक्षीस



## लातूर विभागात सर्व शाळांना टाकले मागे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने मुख्यमंत्री माझी शाळा- सुंदर शाळा अभियान-२ अंतर्गत टप्पा लातूर विभागातून प्रथम क्रमांक पटकावत २१ लाखांचे बक्षीस पटकावले.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथे पार पडलेल्या शानदार बक्षीस वितरण समारंभात राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व धनादेश आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, संस्था सरचिटणीस प्रेमाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील डॉ.मंजुळाताई पाटील व प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांना प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्रातील सर्वात मोठी विदयार्थी संख्या असलेल्या मराठी शाळेचे कौतुक राज्य सरकारने केल्याबद्दल संस्थाध्यक्ष सुधीर पाटील यांनी मुख्यमंत्री व शिक्षण मंत्र्याचे आभार मानून राज्यातीत मराठी शाळा वाचल्या पाहिजेत, अशी आग्रही मागणी यावेळी केली तर त्यास दुजोरा देत शिक्षणमंत्र्यांनी आपले सरकार यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद केले.

यावेळी उपप्राचार्य संतोष घार्गे उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक सुनील कोरडे, राजेंद्र जाधव, धनंजय देशमुख, निखीलकुमार गोरे, मोहन शिंदे, विनोद आंबेवाडीकर, कुमार निकम तसेच कार्यालयीन अधिक्षक बालाजी घोलप उपस्थित होते.

# केंद्राच्या ३० एप्रिलच्या परिपत्रकाविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार : अनिल जगताप

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे खरीप २३ व २४ मधील दीड हजार कोटीचे नुकसान टाळण्यासाठी केंद्राच्या ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रकाविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

केंद्र शासनाने लोकसभेची आचारसंहिता सुरू असताना अचानक पणे ३० एप्रिल २४ रोजी एक परिपत्रक काढून महाराष्ट्रातील शेतकऱ्यावर अन्याय केला असून ७५ टक्के शेतकरी पिक विमा पासून वंचित राहणार आहे तसेच त्यांनी तयार केलेल्या सूत्रानुसार केवळ पाच ते सहा हजार रुपये प्रति हेक्टर नुकसान भरपाई मिळणार असल्याने जाचक परिपत्रक रद्द करावे यासाठी उच्च न्यायालयात आठवडाभरात याचिका दाखल करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी दिली आहे.

राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे तक्रार देऊन व शांततेच्या मार्गाने आंदोलन करून काहीच फायदा नाही.

या परिपत्रकाविरुद्ध अनिल जगताप यांनी राज्यस्तरीय तक्रार समितीकडे याचिका दाखल केली होती त्याची चार जूनला मंत्रालयात सुनावणी झाली मात्र केंद्राचा विषय असल्याने राज्य शासनाने केंद्राकडे बोट दाखवीत प्रकरण निकाली काढले. त्यानंतर जगताप यांनी हे प्रकरण जनतेच्या न्यायालयात नेत २६ जुलै रोजी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, ९ ऑगस्ट ला तुळजापूर येथे ,तर २० ऑगस्टला उमरगा येथे धरणे आंदोलन केले मात्र त्याचा शासनावरती काही एक परिणाम झाला नाही. शेतकऱ्याप्रती केंद्राची व राज्याची नियत साफ नसल्याने यावर्षी देखील कृषी विभागाने ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रकानुसार नुकसान भरपाई देण्याचे ठरवले आहे त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे दीड हजार कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. मंत्र्यांकडून व सत्ताधारी यांच्याकडून आश्वासनाशिवाय शेतकऱ्यांना काहीच मिळाले नाही.

सत्ताधारी आमदार केवळ फोन आला आहे, पत्र दिले आहे एवढेच सांगतात केंद्रीय कृषिमंत्री २१ ऑगस्ट रोजी परळी येथे कृषी महोत्सव निमित्त आले असता त्यांनी दिल्लीत गेल्यानंतर परिपत्रक रद्द करू असे सांगितले मात्र परिपत्रक अद्याप रद्द झाले नाही. केंद्राच्या या परिपत्रकामुळे गेल्या वर्षीपासून शेतकरी त्यांच्या हक्काच्या पिक विमा पासून वंचित राहत आहे केवळ महाराष्ट्रातील एक कोटी सत्तर लाख गेल्यावर्षीच्या व यावर्षीच्या एक कोटी ६५ लाख शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीचा हा प्रश्न असल्याने उच्च न्यायालयात जाण्याचा अनिल जगताप यांनी निर्णय घेतला आहे.

### तेरणात पायथॉन लँग्वेजचे मोफत प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्व विद्यार्थ्यांना डिजिटल स्किल नॉलेज मिळावे या उद्देशाने तेरणा महाविद्यालयात दिनांक. ०७ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत NSCOMM² company ,Pune मार्फत मोफत Python या भाषेचे प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी कंपनीचे कर्मचारी रामा स्वामी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यासाठी महाविद्यालयातील संगणक शास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक घोलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या दोघांची राज्यस्तरीय योगा स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**



लातूर येथे झालेल्या विभागीय योगा स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी गणेश खंडागळे व अजिंक्य खंडागळे या दोघांनी विजय मिळवून यांची राज्यस्तरीय योगा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

तसेच राज्यस्तरीय ज्युडो स्पर्धेसाठी सोनाली होगाडे व भोसले भक्ती या दोन विद्यार्थिनीची निवड झालेली आहे. तसेच दिपक काळे या विद्यार्थ्याची रोलर स्केटिंग राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच धाराशिव येथे झालेल्या मैदानी स्पर्धेत सहा कि. मी. धावणे स्पर्धेत चंदाप्पा होगाडे व राधा ममाळे ५ कि.मी. स्पर्धेत विजय मिळवून विभागीय स्पर्धे साठी निवड झालेली आहे.

यशस्वी विद्यार्थ्याचे भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे व सर्व संचालक मंडळांनी कौतुक केले. महाविद्यालयाच्या वतीने यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एन. अस्वले, उपप्राचार्य डॉ.व्ही.एस. इंगळे, डॉ.पी.ए. पिटले कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य जी.एस. मोरे व पर्यवेक्षक एस.ए. महामुनी, क्रीडा शिक्षक जी.बी. गायकवाड प्रा. विजय पवार डॉ.आर.एम. सूर्यवंशी प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे, बालाजी खंडागळे उपस्थित होते.

# धाराशिव अनुभवणार राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचा थरार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ऑक्टोबर -**

राज्यस्तरीय शालेय हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा (१९ वर्षाखालील मुले व मुली) सन २०२४-२५ चे आयोजन छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय धाराशिव येथे दि.१५ ते १७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान करण्यात आलेले आहे. या राज्यस्तर शालेय स्पर्धेत राज्यातील १९ वर्षे वयोगटातील आठ विभागातील एकूण १६ संघ सहभागी होणार आहेत. राज्य स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी राज्यातील आठ विभागातुन २५० खेळाडू, संघव्यवस्थापक, मार्गदर्शक व निवड चाचणीसाठी आठ विभागातुन एकूण ४० खेळाडू, तांत्रिक समिती सदस्य, निवड समिती सदस्य, संघटनेचे प्रतिनीधी व स्वयंसेवक असे एकूण ३५० जण सहभागी होणार आहेत.

राज्यस्तर शालेय हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे उदघाटन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, लातूर विभागाचे क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, राज्याचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी अंकुश पाटील, राजकुमार दिवटे, राजकुमार दहीहांडे, रविंद्र जानगवळी, गिरजाप्पा दहीहांडे. जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे आश्रयदाते मनथप्पा पाळणे, राजर्षी शाहु शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा शशिकलाताई घोगरे, उपाध्यक्ष अविनाशराव देशमुख कार्याध्यक्ष एम.डी. देशमुख, सचिव धनंजय पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे इ. उपस्थित राहणार आहेत. शालेय राज्यस्तर व्हॉलीबॉल स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याचा संघ निवडला जाणार आहे. महाराष्ट्र राज्याचा व्हॉलीबॉल संघ निवडण्यासाठी राज्य शासनाच्या क्रीडा विभागाने ५ सदस्यांची निवडसमिती नियुक्त केलेली आहे. निवडला गेलेला महाराष्ट्राचा १९ वर्षाखालील मुलांचा संघ तेलंगाना येथे व १९ वर्षाखालील मुलींचा संघ आंध्र प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहे. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी बी.के.नाईकवाडी, कैलास लटके, अक्षय बिरादार, क्रीडा मार्गदर्शक श्रीमती डिम्पल ठाकरे, शुभांगी रोकडे सह सर्व कर्मचारी, धाराशिव जिल्हा हॉलीबॉल संघटनेचे सचिव सचिन पाळणे, सहसचिव संजय देशमुख, छत्रपती शिवाजी हायस्कुलचे मुख्याध्यापक पी.एन.पाटील, यांच्यासह कर्मचारी इ. प्रयत्न करत आहेत. राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचा आस्वाद घ्यावा असे अवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# अण्णासाहेब जावळे यांच्या नावाने महामंडळाच्या निर्णयाचा छावा संघटनेच्यावतीने जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**



महायुती सरकारने अण्णासाहेब जावळे यांच्या नावे मराठवाडा आर्थिक विकास महामंडळ करण्यासाठी समिती गठीत करण्याचा आज झालेल्या कॅबिनेट बैठकीमध्ये घेतला आहे.

या निर्णयाचा अखिल भारतीय छावा संघटनेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यावर पुष्पवृष्टी करीत, फटाके फोडून व पेढे वाटून दि.१४ ऑक्टोबर रोजी जल्लोष करण्यात आला.

माहिती सरकारने आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कै. अण्णासाहेब जावळे यांच्या नावे मराठवाडा आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी निर्णय घेतला आहे.

या निर्णयाचे धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अखिल भारतीय छावा संघटनेच्यावतीने जल्लोष केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके, भाजपायुमोचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, माजी उपनगराध्यक्ष अभय इंगळे, छावाचे जिल्हा संघटक अमोल गोरे, सचिव ज्योतीराम काळे, शहराध्यक्ष प्रशांत पवार,

शहर उपाध्यक्ष अमोल मोरे, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे सदस्य खंडू राऊत, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे संतोष घोरपडे, अजिंक्य तनमोर, राजकुमार ढोबळे, परमेश्वर माळी, आकाश भोसले, योगेश आतकरे, मनोज शिंदे, व्यंकटेश पडिले, सागर साळुंके, सचिन तोडकरी यांच्यासह मराठा चळवळीमधील विविध संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# उध्दवराव दादांचे नाव अनेकार्थाने प्रेरणादायी: आ.राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**




केवळ राज्यातच नव्हे, तर देशभरात नैतिक राजकारणाचा मापदंड म्हणून आजही मोठ्या आदराने भाई उध्दवराव पाटील यांचा नामोल्लेख केला जातो. शेतकर्यांचे कैवारी असलेल्या झुंजारसेनानी भाई उध्दवराव पाटील यांनी केवळ शेती आणि शेतकरी एवढ्यापुरते स्वतःला सिमीत ठेवले नव्हते. जिथे अन्याय, तिथे ते पाय रोवून उभे राहत. स्वातंत्र्याचा लढा, महाराष्ट्र एकीकरण संघर्ष अशा अनेक आंदोलनातून आपल्या न्याय्य हक्कासाठी दादांनी मोठे योगदान दिलेले आहे. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे केंद्रबिंदू असलेल्या या संस्थेला त्यांचे नाव दिल्यामुळे अनेकांना त्यातून मोठी प्रेरणा मिळणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

धाराशिव छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला झुंजारसेनानी भाई उध्दवराव पाटील यांचे नाव अधिकृतपणे जाहीर करण्यात आले. त्यांच्या नामफलकाचे अनावरण ज्येष्ठ शिक्षणतज्ञ एम. डी. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

भाई उध्दवराव दादांनी स्वयंरोजगाराची कास सर्वसामान्य कुटुंबातील मुलांनी धरायला हवी, असा विचार सातत्याने मांडला. काळाची गरज ध्यानात घेवून मोलमजुरी करणार्या कुटुंबासाठी आवश्यक असलेल्या बाबींचा ते आग्रह धरीत. स्वयंरोजगाराच्या अनुषंगाने महत्वपूर्ण असलेल्या या संस्थेला त्यांचे नाव दिल्यामुळे गोरगरीब कुटुंबातील मुलामुलींना मोठी ऊर्जा मिळणार आहे.

दादांच्या प्रभावातूनच आपली जडणघडण झाली आहे आणि एका शासकीय संस्थेला दिलेल्या दादांच्या नामफलकाचे अनावरण आपल्या हस्ते करता आल्याचा आनंद मोठा आहे. राज्य शासनाचे त्यासाठी मनापासून धन्यवाद, अशी भावना ज्येष्ठ शिक्षणतज्ञ एम. डी. देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.

सामान्य कुटुंबातील मुले या संस्थेत शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या संस्थेला दक्ष प्रकल्पाच्या अंतर्गत २५ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. एकीकडे झुंजारसेनानी भाई उध्दवराव पाटील यांचे नामकरण आणि दुसरीकडे हा भरीव निधी असा दुग्धशर्करा योग या निमित्ताने आपल्या सगळ्यांच्या वाट्याला आला आहे.

राज्याच्या आणि देशाच्या सभागृहात उध्दवराव दादांनी केलेली भाषणे आजही अनेक सामाजिक समस्यांवर रामबाण उपाय ठरावित, अशीच आहेत. त्यांच्या कार्याची, व्यापक योगदानाची दखल घेवून शासकीय औद्योगिक संस्थेला त्यांचे नाव देण्याबद्दल आपण विनंती केली होती.

महायुती सरकारने अत्यंत सकारात्मकपणे उध्दवराव दादांच्या एकूण योगदानाची सन्मानपूर्वक दखल घेत धाराशिव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला त्यांचे नाव देण्याचा निर्णय जाहीर केला.

दादांच्या नावाप्रमाणे या संस्थेचा लौकिकही राष्ट्रीय पातळीवर पोहोचल्याखेरीज राहणार नाही. त्यामुळे आता दादांचे नाव आणि त्यांचा लौकिक अधिक जबाबदारीने जोपासण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. महायुती सरकारने घेतलेल्या या स्तुत्य निर्णयाबद्दल आपण त्यांचे मनपूर्वक धन्यवाद मानतो, अशा शब्दात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी भावना व्यक्त केल्या.

यावेळी नितीन काळे, देशमुख, मधुकर तावडे, सतीश दंडनाईक, रामदास कोळगे, राजसिंह राजेनिंबाळकर, अभय इंगळे, संदीप इंगळे, पुष्पकांत माळाळे, बिलाल रजवी, गणेश इंगळगी, विनोद निंबाळकर यांच्यासह औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

SBI
**भारतीय स्टेट बँक**
**शाखा उमरगा (०६७५५ )**

**दागिन्यांसाठी लिलाव सूचना**

आमच्या बँकेकडे दागिने तारण ठेवलेले आहेत/कर्जदाराने खालील कर्जदाराला कायदेशीर नोटीस पाठवूनही सदर सोनेतारण केलेल्या ग्राहकाने सदर सोन्याचे दागिने सोडवून घेतलेले नाहीत. त्यामुळे दिनांक. १८.१०.२०२४ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत कर्जदाराने थकबाकीची परतफेड केली नाही तर तारण असलेल्या दागिन्यांचा लिलाव केला जाईल.दिनांक.१८.१०.२०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता

**लिलावासाठी अट**

१. लिलावात भाग घेण्यास इच्छुक असलेल्यांनी रु.२,४३,७४५ /- तसेच अधिकचा चार्जेस जमा करावेत.दिनांक १८.१०.२०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता
२. ज्यांनी लिलावात दागिन्यांसाठी २४३७४५ आगाऊ रक्कम भरली आहे तेच या दरम्यान भेट देऊ शकतात. लिलावाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत आणि दागिन्यांची तपासणी, व्यवस्थापक आणि सोन्याचे मूल्यांकनकर्ता या दोघांच्या उपस्थितीत.
३. दागिने जसे आहेत तसे लिलाव केले जातील आणि लिलाव केलेल्या दागिन्यांच्या गुणवत्तेसाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
४. कोणतेही कारण न देता लिलाव नाकारण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार बँकेकडे आहे.
५. हे मृत झालेल्या कर्जदाराच्या कायदेशीर वारसांना लागू होते.

| अ.क्र. | शाखेचे नाव | कर्जदाराचे नाव | खाते क्रमांक | मंजुरीची तारीख | ग्रॅममध्ये वजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक शाखा उमरगा | गजानन उद्धव गायकवाड | ४११२०१४९८१३ | १३/०७/२०२२ | ६५.८०/५८.४० |

तारीखः १८/ १०/२०२४
ठिकाणः भारतीय स्टेट बँक शाखा, उमरगा

स्वाक्षरित/-
शाखा व्यवस्थापक,
भारतीय स्टेट बँक शाखा, उमरगा

# किनवटचा उच्चपातळी बंधारा कामधेनु ठरणारः आ. भीमराव केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट,दि. १४ ऑक्टोबर**

प्रत्यक्ष आमदार म्हणून काम करण्यासाठी मला दोन अडीच वर्षाचा कालावधी मिळाला या कालावधीत मी क्षणभरही विश्रांती न घेता झपाट्याने चौफेर विकास साधण्याचा प्रयत्न केला.या भागातील शेतीसिंचन आणि पाणीटंचाईचा प्रश्न लक्षात घेऊन पैनगंगा नदीवरील रखडलेले उच्च पातळी बंधाऱ्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होणे आवश्यक होतं. तुमच्या आणि राज्य सरकारच्या आशीर्वादामुळे मी सिंचनाचा मोठा प्रकल्प मार्गी लावला.मला आशा आहे की शेतकरी व जनतेसाठी हा बंधारा कामधेनू ठरेलं असे मौलिक प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी केले आहे. गेल्या दहा-बारा वर्षांपासून रखडून असलेल्या किनवट येथील २०१ कोटी रु च्या उच्च पातळी बांधाऱ्याचे भूमिपूजन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते झाले त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मंचावर भाजप नेते सुधाकर भोयर माजी नगराध्यक्ष ईसाखान सरदार खान, व्यंकटराव नेम्मानीवार,दिनकर चाडावार,सुनील पाटील,अनिल तिरमनवार,वैजनाथ करपुडे पाटील,अशोक नेम्मानीवार बालाजी आलेवार, बालाजी मुरकुटे, संजय सिडाम, आनंद मच्छेवार,श्रीनिवास नेम्मानीवार,संदीप केंद्रे,स्वागत आयनेनीवार, दत्ता आडे,शारदा कन्स्ट्रक्शनचे मोरगे,आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.



पुढे बोलताना आ. केराम म्हणाले की मला आमदार म्हणून प्रत्यक्ष काम करण्यासाठी जो काही दोन अडीच वर्षाचा कालावधी मिळाला त्या कालावधीत क्षणभरही विश्रांती न घेता दळणवळण, ग्रामीण भागातील पाणीपुरवठा, विजेचे प्रश्न श्रद्धास्थळाच्या विकासासाठी मी कोट्यावधी रु खेचून आणले.या भागातला शेतकरी शेतमजूर सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी सिंचन क्षेत्राला प्राधान्य देऊन रखडलेले बंधारे मार्गी लावले. वन विभागाच्या काही तांत्रिक अडचणीमुळे किनवटचा बंधारा रखडून होता.या संदर्भात मी सातत्याने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरवा केला आणि यश मिळाले. जे पंधरा वर्षात घडलं नाही ते मी दोन-तीन वर्षांत करून दाखविले. माझ्या काळात २ हजार ४०० कोटीची पायाभूत विकासाची कामे पूर्णत्वास गेली. केवळ बंधाऱ्यासाठी आतापर्यंत ११०० कोटी निधी मंजूर करून घेतला.रस्त्याबरोबरच वर्षानुवर्षे जीर्ण झालेले व कायम प्रतीक्षेत असलेले जवळपास ४५ लहान मोठे पुल नव्याने बांधून दळणवळणची उत्तम सोय केली.मला प्रसिद्धीची हाव नाही. माझी विकासकामे बोलतात.तुमच्या आणि सरकारच्या आशीर्वादामुळे मी अल्पशा काळात या मतदार संघाचा चौफेर विकास करू शकलो.राज्यातील शिंदे फडणवीस सरकार हे शेतकरी, शेतमजूर, कामगार तसेच महिलांचे हित साधनारे आहे.किनवटचा उच्चपातळी बंधारा शेतकरी व नागरिकांसाठी कामधेनू ठरणार असल्याचे स्पष्ट करत या बंधाऱ्यामुळे बारमाही शेतीसिंचन होऊन पाणीटंचाई प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे असे आ. केराम म्हणाले. माजी नगराध्यक्ष ईसाखान सरदार खान व भाजप नेते सुधाकर भोयर यांनी त्यांच्या मनोगतातुन किनवट माहूर तालुक्यातील विकासकामे व आ.भीमराव केराम यांच्या कार्याचे कौतुक केले. प्रस्ताविकातून जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता शेख सलीम यांनी बंधाऱ्यासंबंधी विस्तृत माहिती दिली. २०१० साली हा बंधारा मंजूर झाला परंतु वन विभागाच्या तांत्रिक अडचणीमुळे गेल्या तेरा चौदा वर्षांपासून काम रखडले होते. परंतु आमदार भीमराव केराम यांच्या अविरत पाठपुराव्यामुळे तसेच जलसंपदा विभागाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार मुख्य अभियंता श्री गवळी यांच्या कर्तव्यदक्षतेमुळे हा पाणी प्रकल्प अखेर मार्गी लागला. बंधाऱ्याची मूळ किंमत २०१ कोटी रु असून १३ दरवाजे आहेत. बंधाऱ्याची पाणी साठवणूक क्षमता १०.६० दलघमी इतकी आहे. कामपूर्ण करण्याचा कालावधी तीन वर्षाचा असला तरी मुदतीच्या आत दर्जेदारपद्धतीने काम पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंढरीनाथ ठाकरे यांनी केले तर भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले. भूमिपूजनाच्या कार्यक्रमाला महायुती सरकारमधील भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच किनवट शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## संक्षिप्त वृत्त

### रावी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**मुखेड**- तालुक्यातील मुक्रमाबाद परीसरातील रावी येथे अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आले आहे. वै.ह.भ.प. श्री. गुरूवर्य धोंडोपंत दादासाहेब व वै.ह.भ.प. श्री संत पिराजी महाराज यांच्या ७२ व्या पुण्यतिथी निमित्त १४ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत साजरा



होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताहाच्या दैनंदिन कार्यक्रम रोज सोमवार सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वर पारायण, सकाळी ११ ते १ गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन, रात्री १२ ते ४ हरिजागर होईल पहाटे ४ ते ६ काकडा आरती होईल असे दैनिक कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविले आहे. १४ ऑक्टोबर रोजी सोमवारी रात्री ९ वाजता प्रसिद्ध किर्तन व प्रवचनकार .ह.भ.प.श्री. भागवत महाराज चांदेगावकर, ह.भ.प.श्री. एकनाथ महाराज वंटगीरकर, ह.भ.प.श्री. रमेश महाराज सोलापूरकर, ह.भ.प.श्री. संगय्याप्पा स्वामी कंठाळीकर, ह.भ.प.श्री, निवृत्ती महाराज पंढरपूर,ह.भ.प.श्री. अमोल महाराज पल्ले, ह.भ.प.श्री. उमेश महाराज दशरथे (आळंदी देवाची), निवृत्ती महाराज रावीकर यांचे काल्याचे कीर्तन होईल. तरी मुखेड तालुक्यातील भावीक भक्तांनी कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### बितनाळ केंद्रिय मुख्याध्यापक भगवान संपतवार यांना जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित



**उमरी**-तालुक्यातील मौजे बितनाळ येथिल जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भगवानराव संपतवार यांना जिल्हास्तरीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे नांदेड येथिल कुसूम सभागृह येथे जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून जिल्हा शिक्षक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटक माजी मुख्यमंत्री तथा विधेमान राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या शुभ हस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करनवाल होत्या तर प्रमुख शिक्षणाधिकारी डॉ सविता बिरगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, अनिल राठोड, शिक्षण अधिकारी (मा ) माधव सलगर, दिलीप बनसोडे, संतोष सेटकार आदी मान्यवराच्या उपस्थित मुख्याध्यापक भगवान संपतवार यांना जिल्हास्तरीय पुरस्कार सन्मान चिन देवून गौरविण्यात आले. भगवान संपतवार सर बितनाळ जि प केंद्रिय शाळेत मुख्याध्यापक म्हणून रजू झाले पासुन त्यांच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा उचांवला आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात उमरी तालुक्यात सलग दुसऱ्यांदा नंबर वन क्रंमाक पटकविला असुन जिल्हास्त मुल्यांकनासाठी शाळेची निवड झाली आहे संपतवार सरानी शाळेचे व बितनाळ गावचे नाव रोशन केले आहे . अशोका विजया दशमी दिनी ओ.बी सी समाजाचा तृतीय मेळाव्यात ही आदर्श शिक्षक म्हणून मुख्याध्यापक भगवान संपतवार यांचा गोल्ला गोलेवार समाजाचे नांदेड भुषन नेते नामदेव आयलवाड यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानचिन देवून हि सत्कार करण्यात आला आहे असे अनेक पुस्कार यापुर्वी भगवान संपतवार यांना प्राप्त झाले आहेत मुख्याध्यापक संपतवार यांना जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान झाल्याने बितनाळ गावचे सरपंच प्र मारोती उमाटे, माझी सरपंच प्र मारोती वाघमारे, उपसरपंच प्र देविदास आक्कमवाड, चेअरमन भुजंग पा जाधव, संचालक गणेश आन्नेमवाड, शालेय शिक्षण समिती चे अध्यक्ष नागनाथ घुमलवाड, ग्रा प सदस्य प्र गोंविद पहेलवान बकेवाड, माजी उपसरपंच बालाजी सुर्यवंशी, सुदाम पल्लेलवाड, साईनाथ घोसलवाड ,दत्ताहरी कानगुलकर, पिंटू नागदरवाड, गंगाधर लगदिवे, गणेश कोंडेवाड, पिराजी जिडेवाड, राजू पलेवाड, दिगांबर मंतलवाड, फेरोज सय्यद, साईनाथ तोटेवाड, संभाजी डोगंरे, लक्ष्मण वाघमारे, पत्रकार साहेबराव तुरेराव यासह सर्व गावकरी मंडळी कडून व तालुक्यातुन शिक्षणविभाग आणी विविध स्तरावरून मुख्याध्यापक भगवान संपतवार यांच्या वर अभिनंदना चा वर्षाव व कौतुक होत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाच्या नांदेड शहराध्यक्षपदी ॲड. संघरत्न गायकवाड यांची निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड,दि. १४ ऑक्टोब**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या आदेशाने आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या संमतीने सामाजिक न्याय विभागाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाच्या नांदेड शहराध्यक्षपदी ॲड. संघरत्न गायकवाड यांची नियुक्ती केली आहे. सदर नियुक्तीपत्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते नियुक्ती देण्यात आली.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाच्या नांदेड शहर अध्यक्षपदी निवड केली जावी, याकरिता राष्ट्रवादी ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोनकांबळे, नांदेड शहर राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष फेरोज पटेल यांच्या शिफारशीनुसार प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे यांनी नांदेड सामाजिक न्याय विभागाच्या शहराध्यक्षपदी ॲड. संघरत्न गायकवाड यांची नियुक्ती केली आहे. नियुक्तीपत्र मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते नाशिक येथे देण्यात आले. यावेळी ॲड. भीमरत्न कांबळे, सखाराम शितळे यांची उपस्थिती होती.

# हुस्सा येथील शालेय समिती अध्यक्षपदी हंबर्डे तर उपाध्यक्षपदी प्रदीप वाघमारे

**तभा वृतसेवा**
**नायगाव,दि. १४ ऑक्टोबर**

नायगाव तालुक्यातील हुस्सा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी बालाजी आनंदराव हंबर्डे तर उपाध्यक्षपदी प्रदीप गणपतराव वाघमारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.तालुक्यातील हुस्सा येथील जिल्हा परिषदे मध्ये सरपंच गावातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीमध्ये शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडी संदर्भात नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकी वेळी शालेय समितीच्या अध्यक्ष पदी बालाजी आनंदराव हंबर्डे तर उपाध्यक्षपदी प्रदिप गणपतराव वाघमारे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, पालक वर्गात समाधान व्यक्त करून अध्यक्ष बालाजी हंबर्डे व प्रदिप वाघमारेचा यथोचित पुष्पहाराने सत्कार केला व पुढील कारकिर्दीस यावेळी शुभेच्छा दिल्या. बालाजी आनंदराव पाटील हंबर्डे यांनी मागील काळात अनेक अतिशय निस्वार्थपणे व अविरतपणे शाळेमध्ये सुनियोजित व्यवस्थापन



केले असून त्यांना एकुण चांगलाच अनुभव आहे असे गावकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे त्यांच्या अनुभवाप्रती पुन्हा एकदा बालाजी हंबर्डे यांना संधी देण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी नवनिर्वाचित प्रदीप वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे सदर निवडी दरम्यान बालाजी हंबर्डे व प्रदीप वाघमारे यांचं उपस्थित नागरिकांकडून व शाळेतील शिक्षक वृंदा कडून ही सत्कार करण्यात आला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत .दरम्यान गावातील सरपंच प्रतिनिधी रमेश माली पाटील, मुख्याध्यापक नारे सर, बंडेवार सर, कदम सर, गावातील जेष्ठ नागरिक धोंडीबा रावसाहेब हंबर्डे, नंदकिशोर हंबर्डे, संदीप भगवान गायकवाड, उणकेश्वर हंबर्डे, बालाजी अर्जुन हंबर्डे, रामजी वाघमारे, माधव गायकवाड, यासह उपस्थित होते.

# बांधकाम मजूरांना २०० किटचे वाटप; एकही मंजूर वंचित राहाणार नाहीः प्रविण चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा,दि. १४ ऑक्टोबर**

महाराष्ट्र शासनाची योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहचली पाहिजे, यासाठी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठीशी ठामपणे उभे रहा असे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा भाजपाचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी तहसिल कार्यालयांच्या प्रांगणात बांधकाम कामगारांना किटचे वाटप कार्यक्रमांत म्हणाले. तहसिल कार्यालयाच्या पाठीमागील गोदाम परिसरात बांधकाम विभागाच्या वतीने नोंदणीकृत बांधकाम कामगारांना संसार उपयोगी भांडी किट कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आला होते.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा भाजपाचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्येक्रम आयोजित केला होता. यावेळी भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य माणिकराव मुकादम, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपसभापती रोहीत पाटील आंडगेकर, माजी नगरसेवक भास्करराव पाटील पवार, बंडू पाटील वडजे,माधव पाटील पवारपारडीकर,नारायणयेलरवाड,दिपक पाटील कानवटे, सचिन मुकादम,लोहा पं.स.चे गटविकास अधिकारी डि. के. आडेराघो, घरकुल विभागाचे दिनेश तेलंग,भारत पाटील कदम, आशिष हंबर्डे आदी उपस्थित होती.

विभागीय आयुक्तांना माहित देऊन चर्चा केली.आपला तालुका आगोदर नव्हता आगोदर वाटपासाठी पर्यंत केले.बांधकाम मंत्र्याना भेटुन लोहा -कंधार तालुका वाटपासाठी आगोदर घेण्यासाठी प्रयत्न केले. २०० लोकांना किट मिळत आहे उर्वरित लोकांना तीन चार दिवसानतर मिळेल या किट पासून कुणीही वंचित राहणार नाही सर्वांना मिळतील, राज्यात शासन योजना राबवित आहे. शासन आपली दारी जन सेवा करी आशा संदेश सर्वांपर्यंत पोहचला पाहिजे यासाठी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहाव् असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक भास्करराव पाटील पवार यांनी केले तर आभार सचिन मुकादम यांनी मानले.

# निराधारांना आधार देण्यासाठी समिती अहोरात्र काम करणार, लाभार्थ्यांच्या तात्काळ खात्यावर अनुदान जमा करा : अध्यक्ष भागवत देवसरकर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि.१४ ऑक्टोबर**

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या माध्यमातून हदगाव तालुक्यातील निराधार पात्र गरजू लोकांना शासनाचे अनुदानाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाला सोबत घेऊन समिती अहोरात्र प्रयत्न काम करणार व सणासुदीच्या काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या माध्यमातून प्राप्त निराधारांचे अनुदान तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करावे अश्या सूचना हदगाव तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी बैठकीत प्रशासनाला केल्या आहेत,यावेळी बैठकीला समितीचे सचिव तथा तहसीलदार श्रीमती सुरेखाताई नांदे, सदस्य सर्वश्री बाबुसराव कदम,अमोल पाटील रुईकर,विशाल परभणकर गजानन मस्के श्रीहरी काळे,ओम इंदेवार,नायब तहसीलदार एन.टी तामसकर आदी उपस्थित होते. तालुक्यातील अपंग निराधार विधवा व इतर गरजू लोकांनी एक हजारच्यावर अर्ज शासनाच्या अनुदान लाभ मिळवण्यासाठी



समितीकडे केले आहेत,समितीने शासनाच्या नियमाप्रमाणे सर्व अर्ज तपासून पात्र अपात्र लाभार्थ्यांची यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, बैठकीत आलेले सर्व अर्ज समितीने छाननी करून तपासणी केले आहेत, तालुक्यातील एकही गरजू निराधार बांधव शासनाच्या अनुदान लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी समितीच्या वतीने घेण्यात येईल,यावेळी नवनिर्वाचित तहसीलदार श्रीमती सुरेखाताई नांदे यांचे स्वागत समितीच्या वतीने तर प्रशासनाच्या वतीने समितीचे अध्यक्ष व सर्व समिती सदस्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. दसरा दिवाळीच्या निमित्ताने दरमहा शासनामार्फत निराधारांना मिळणारे अनुदान निराधाराच्या तात्काळ खात्यावर वर्ग करावे,व निराधारांची दसरा दिवाळी साजरी करावी अशा प्रशासनाला सूचना बैठकीत अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी दिल्या आहेत, तालुक्यातील पात्र नागरिकांनी लाभ घेण्यासाठी स्वतः अर्ज भरून तलाठी ग्रामसेवक मंडळ अधिकारी वैद्यकीय अधिक्षक्ष यांचे प्रमाणपत्र घेऊन सेतू सुविधा केंद्र मार्फत ऑनलाईन व ऑफलाइन अर्ज आपल्या गावातील तलाठी किंवा संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे कर्मचारी अमोल दासरवार यांच्याकडे सादर करावेत असे आवाहन अध्यक्ष भागवत देवसरकर व सचिव श्रीमती सुरेखाताई नांदे यांनी केले आहे.

# वंदना कांबळे यांना आदर्श तालुका स्तरीय गुर गौरव पुरस्कार




**तभा वृतसेवा**
**हदगाव,दि. १४ ऑक्टोबर**

निवघा (बा) जिल्हा परिषद शाळा शिरड येथील शिक्षिका वंदना चांदू कांबळे यांना २०२३ चा आदर्श तालुका स्तरीय गुर गौरव पुरस्कार आमदार माधवराव पाटील जळगावकर यांच्या हस्ते देण्यात आला मिळाल्याबद्दल यांचे अभिनंदन केले मुख्याध्यापक डोके सर बेळगे सर कीर्तनकार मॅडम पत्रकार महेश बोरकर व सर्व शिक्षक शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी यांचे अभिनंदन केले.

# उमरी येथे डाक विभागाची अतिक्रमण हटाव मोहीम

**तभा वृतसेवा**
**उमरी,दि. १४ ऑक्टोबर**

भारतीय डाक विभाग भारत सरकार यांच्या मालकीचे उमरी नगरपालिका हद्दीतील विभागीय प्लॉटवरील अतिक्रमण हटविण्यासाठी दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार आहे.उमरी नगरपालिका हद्दीतील डाक विभागाच्या मालकीचे विभागीय प्लॉट नगरपालिका मालमत्ता क्रमांक ७७ आणि ७८ यावरील अतिक्रमण स्वतः हून काढून घेण्यासाठी डाक विभागातर्फे अतिक्रमण धारकांना दि.८ ऑक्टोबर पासून १३ ऑक्टोबर २०२४ पर्यंत ध्वनीक्षेपकाच्या



सहाय्याने जाहीर प्रकटनाद्वारे सुचित करण्यात आले होते. परंतु, अद्यापही अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण काढून घेतलेले नाही.त्या अनुषंगाने कार्यवाहीस्तव दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता धडक अतिक्रमण हटाव मोहिमेद्वारे सदरचे अनधिकृत बांधकाम,अनधिकृत शेड डाक विभागाद्वारे नष्ट करण्यात येणार असल्याची माहिती डाक विभागाच्या नांदेड विभागीय कार्यालयाद्वारे देण्यात आली आहे.

# शिक्षक बिघडले तर राष्ट्र बिघडायला वेळ लागत नाहीः देवीदास फुलारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड,दि. १४ ऑक्टोबर**

मौजे टेळकी ही शूरवीरांची, हुतात्म्याची आणि स्वातंत्र्य सैनिकांची भूमी असून, येथील शिक्षकही ध्येयाने प्रेरित झालेले आहेत. या परिसरात ज्यांनी ज्यांनी शैक्षणिक क्रांती केली त्यांचा हा होत असलेला सन्मान म्हणजे एका अर्थाने राष्ट्राचा सन्मान होय. कारण शिक्षक बिघडले तर राष्ट्र बिघडायला वेळ लागत नाही, असे प्रतिपादन साहित्यिक देवीदास फुलारी यांनी केले.

क्रांतीची भूमी असलेल्या मौजे टेळकी ता.लोहा येथे गुरु गौरव सोहळा आयोजित केला होता. या गुरु गौरव सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष बालासाहेब हंबर्डे तर प्रमुख पाहूणे म्हणून साहित्यिक महेश मोरे व रामकृष्ण शेळके हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता माता सरस्वती, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, नांदेड जिल्ह्याचे पहिले खासदार शंकररावजी टेळकीकर, पहिले आमदार गोविंदरावजी मोरे, पहिले कृषी सभापती आनंदरावजी मोरे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून स्वागत गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली. जि.प.प्रा. शाळा टेळकी या ज्ञानालयात गुरुजींचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी देवीदास फुलारी यांनी गुरुजनांच्या शैक्षणिक समर्पणाबद्दल त्यांना धन्यवाद दिले व त्यांनी केलेले कार्य याचाच हा परिपाक म्हणून त्यांचा येथोचित सन्मान या ठिकाणी गावकऱ्यांच्या वतीने केला जातो आहे, याची जाणीव करून दिली. या गुरुजनांच्या हातून अनेक विद्यार्थी उच्च पदावर गेले आहेत. न्यायाधीश,



डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनियर, विद्यापीठीय कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, वीज वितरण अशा व इतर सर्वच क्षेत्रात कार्यरत असणारे विद्यार्थी आहेत. आज ज्यांनी हा या ज्ञानवंतांचा सोहळा घडवून आणला त्यांनाही धन्यवाद दिले. तसेच यावेळी साहित्यिक महेश मोरे यांनी नीतिमूल्य जोपासणाऱ्या कविता सादर केल्या. ही शाळा परिसरातीलच नव्हे तर पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना हेवा वाटावा अशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. या शाळेतील सर्वच शिक्षक हे सॉक्रेटिस निर्माण करणारे आहेत, असा त्यांचा गुणगौरवही करीत मोरे यांनी आपल्या अभंगातून वारकऱ्यांसमोर पंढरपूरचा विठ्ठल साक्षात उभा केला. शाळेतील माजी शिक्षक वी.रा. शिंदे आणि चंद्राकात लामदाडे यांनीही मनोगतात व्यक्त केले. लामदाडे यांनी गावातील विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाविषयी केलेले मार्गदर्शन आणि गावकऱ्यांचे माझ्यावर असणारे प्रेम याबद्दल मनोगत व्यक्त केले. गुरु गौरव प्राप्त शिक्षिका सविता कदम आणि सेवानिवृत्त शिक्षक नंदकुमार वैजनाथराव भाजीभाकरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रामुख्याने जोशी मेडेवार, अंकुशराव मोरे, कटकमवार, भगवानरावजी मोरे, रमेशरावजी इंगोले, सुरेश बड्डुरवार, प्रकाश पांपटवार, जामकर, श्रीमंगले, शिरसाळकर, पंदनवाड, अस्टुरे, सौ. पुठेवाड, सौ. पाटोदेकर, सौ.पारशेवार, चंद्रकांत लामदाडे, शैलेंद्रकुमार नरंगले, सोळंके, चौडेकर (मु.अ.), बालाजीराव धोंडगे, वाघमारे, गायकवाड, राठोड, इंदुरकर, अशोक मोरे, जाधव (मु.अ.), कोटलवार, देशपांडे, हमगे, गुट्टे, हाके, खेराव, कामठेकर मॅडम, गोसावी मॅडम, लक्ष्मण मोरे, दिलीप गोरे, दिलीप मोरे, पंजाब मोरे, सचिन मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन मोरे यांनी केले, तर आभार देशपांडे यांनी मानले आणि या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. या कार्यक्रमासाठी सर्वच कर्मचारी, गावकरी यांनी परिश्रम घेतले.

# गुरुद्वारा कर्मचाऱ्यांना ३ टक्के इंक्रीमेंट मंजूर

## गाडीवाले यांची मांगणी मान्य ; कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**तभा वृत**
**नांदेड,दि. १४ ऑक्टोबर**

स. जर्नेल सिंघ भुजंग सिंघ गाडीवाले महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवाटी काँग्रेस पार्टीचे सिख समाज सेल चे राज्य प्रमुख तथा माजी सदस्य-प्रशासकीय समिती, नांदेड यांनी गुरुद्वारा बोर्ड प्रशासनाला निवेदन सादर करुन विनंती केली होती की, गुरुद्वारा बोर्ड कर्मचाऱ्यानां या वर्षाचे इंक्रीमेंट लागू करावे, प्रशासकांनी ही मागणी मान्य केली यामुळे गुरुद्वारा बोर्ड कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या बाबत अशी माहिती आहे की, गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे तत्कालिन प्रशासक साहिब यांनी गुरुद्वारा बोर्ड कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करून प्रति वर्ष जुलाई मध्ये बेसिकचे ३% इंक्रीमेंट देण्या सबंधी ठराव पारित केला आहे. हे इंक्रिमेंट लागू करण्याचे अधिकार अधीक्षक गुरुद्वारा बोर्डास दिलेले आहे. परंतु गुरुद्वारा बोर्डाच्या कर्मचाऱ्यांना प्रति वर्ष जुलाई मध्ये हे इंक्रीमेंट लावले जात नहीं. या करिता स. जर्नेल सिंघ गाडीवाले यानी गुरुद्वारा सचखंड साहिब चे मा. प्रशासक साहिब डॉ विजय सतबीर सिंघ यानां निवेदन देऊन विनंती केली की रोकलेले ३% इंक्रीमेंट माहे जुलाई २४ पासून लागू करण्यात यावे.

गाडीवाले यांच्या मागणीवर डॉ. विजय सतबीर सिंघ माजी सनदी अधिकारी तथा प्रशासक साहिब, नांदेड यांनी याबाबत सहानुभुतीपूर्वक विचार करुन दिनांक १३ अक्टोबर रोजी ही मागणी मान्य करुन गुरुद्वारा बोर्डाच्या सर्व कर्मचाऱ्यांना १ जुलाई २०२४ पासून ३% इंक्रीमेंट लागू करण्याचे आदेश पारित केले. गुरुद्वारा बोर्डाचे जवळपास १२०० स्थाई कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. यामुळे गुरुद्वारा सचखंड साहिब परिसरात व गुरुद्वारा बोर्ड कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत सर्व कर्मचाऱ्यांनी डॉ. विजय सतबीर सिंघ प्रशासक गुरुद्वारा सचखंड साहिब, नांदेड, स. जसवंत सिंघ जी बॉबी, स जर्नेल सिंघ गाडीवाले यांचे व यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वोच आभार व्यक्त केले.

लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयात उद्या राष्ट्रीय परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १४ ऑक्टोबर-**
येथील चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयात बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि असोसिएशन ऑफ फार्मसी टीचर्स ऑफ इंडियाच्या वतीने 'फार्मास्युटिकल प्रॉडक्ट डेव्हलपमेंट' बाय टलऊ अप्रोच याविषयावर एक दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित करण्यात आली आहे.

या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे उदघाटन सकाळी १० वाजता संस्थेचे सचिव भीमाशंकर देवणीकर, प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. सुब्रह्मण्यम सी.व्ही.एस., प्रा डॉ. एस.गी. गट्टाणी, निमंत्रक प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, कार्यक्रम समन्वयक तथा फार्मास्युटिक्स विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवप्पा नागोबा सह संयोजक प्रा.डॉ.ओमप्रकाश भुसनुरे, प्रा. डॉ. अनंत देशपांडे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. त्यानंतर पहिल्या सत्रात सकाळी ११ वाजता हैदराबादच्या गोकराजू रंगराजू फार्मसी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सुब्रह्मण्यम हे ' उत्पादन विकासासाठी डिझाइननुसार गुणवत्ता' या विषयावर तर दुसऱ्या सत्रात स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या स्कुल ऑफ फार्मसीचे वरिष्ठ प्रा. डॉ. एस.जी. गट्टाणी हे' हर्बल उत्पादन विकासामध्ये क्यूबीडीचा वापर' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तर तिसऱ्या सत्रात डॉ. सुब्रह्मण्यम हे ' डीडी सॉल्व्हर आणि पीके सॉल्व्हर सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

### संक्षिप्त वृत्त



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलशाला दहा फूटाचे पुष्पचक्र अर्पण

**रेणापूर, दि. १४ ऑक्टोबर-**
लातुर जिल्हयातील पानगांव (ता.रेणापूर) येथे असलेल्या विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलश स्थळी ६८ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी अस्थी कलशाला १० फुट उंचीचे (१०।१०) पुष्पचक्र अर्पन करून सामुहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. येथील हर हून्नरी कलाकार रत्नराज आचार्य यांच्या संकल्पनेतून गेल्या वर्षी ६७ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनी ६०० फुटांची पुष्पमाला अर्पन करण्यात आली होती. याप्रसंगी विष्णू आचार्य, रत्नराज आचार्य, गौतम आचार्य, पंडीत आचार्य, धर्मपाल आचार्य, रमेश तिगोटे, गौतम गोडबोले, मिलींद आचार्य, कुंडलीक आचार्य, नरसिंग आचार्य,नारायण आचार्य, स्वप्नील आचार्य, ज्योती आचार्य, प्रणिता आचार्य, मालन आचार्य, सत्यशिला आचार्य, आरती आचार्य, अनिता आचार्य, कालींदा गोडबोले, मनाली आचार्य, आरती तिगोटे, शांताबाई लोखंडे, सखुबाई आचार्य, राजश्री आचार्य, सपना आचार्य, दिक्षा आचार्य, भागीरथी आचार्य उपस्थित होते.



## मैत्री ग्रुपच्यावतीने निलंगा-दीक्षाभूमी नागपूर रॅलीचे आयोजन

**निलंगा, दि. १४ ऑक्टोबर-**
शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जोपासत तो वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी निलंगा येथील मैत्री ग्रुपच्यावतीने निलंगा ते दीक्षाभूमी नागपूर धम्म रॅली काढून मैत्री ग्रुपने एक आगळा वेगळा आदर्श समाजासमोर ठेवण्यात आला आहे. हजारो वर्षापासून या देशातील दलीत समाजाला चिखलाच्या दलदलितून बाहेर काढण्यासाठी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केला.व लाखो अनुयायांना धम्माच्या ओटीत टाकले. अश्या या पवित्र दिनाचे औचित्य साधून अशोकनगर निलंगा येथील विचारांनी प्रेरित झालेल्या अमोल मैत्री ग्रुप चे कांबळे,बलवान सूर्यवंशी,अमोल सूर्यवंशी,विष्णू कांबळे,गिरीश पात्रे, पवन सूर्यवंशी यांनी समाजाचं काही देणं लागतो या उद्देशाने एकत्र येऊन जवळपास १२५ धम्म बंधू भगिनींना सोबत घेऊन निलंगा ते दिक्षाभूमी नागपूर धम्म रॅली काढून अंधश्रध्दा, अंधविश्वास या रूढी परंपरेला फाटा देण्याचा प्रयत्न केला आहे.याबद्दल मैत्री ग्रुपचे सर्वत्र अभिनंदन होत आहे..




## राज्यस्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी 'किलबिल'च्या संघाची निवड

**अहमदपूर, दि. १४ ऑक्टोबर-**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत विभागीय शालेय बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा दिनांक १३/१०/२०२४ रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये एकूण १४,१७,१९ वयोगटातील मुले व मुली अशा एकूण २३ संघांचा समावेश होता. यात किलबिल नॅशनल स्कूल शाळेच्या १४ व १९ वर्षे वयोगट मुले या दोन्ही संघाने आपली चमकदार कामगिरी केली. सदरील दोन्ही संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली . १४ वर्षे वयोगटातील संघामध्ये श्रीरामे कृष्णा, जाजू अमर, सूर्यवंशी व्यंकटेश, जाधव परम ेश्वर, जगताप प्रणव, भुरे यश, काजी फहाद, धसवाडीकर राजवीर, पदमपल्ले अखिल या खेळाडू विद्यार्थ्यांचा समावेश होता तर १९ वर्ष वयोगटाखालील संघामध्ये अनुक्रमे सूर्यवंशी ऋषिकेश, हत्ते सुशांत, मुळे सिद्धेश्वर, सूर्यवंशी पवन, सय्यद अलीयान, देशमुख हर्षवर्धन, खोमणे प्रथमेश, शिंदे कल्पेश, मोघेकर संस्कार या खेळाडूंचा समावेश होता. त्याचबरोबर १७ वर्ष वयोगटामध्ये सृष्टी गुट्टे, अपेक्षा बिरादार, श्रद्धा होनराव, कार्तिक गुट्टे या चार विद्यार्थ्यांची निवड चाचणी मार्फत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना शाळेतील क्रीडा शिक्षक अर्शद शेख, कासिम शेख, विशाल सरवदे, निलेश बन यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरमसिंग शिराळे, पोलीस उपनिरीक्षक असद शेख, कार्यालयीन अधीक्षक सचिन जगताप, राजकुमार कदम यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करून पुढील साम न्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मोबाईल भेटीच्या निर्णयाची महिन्यातच वचनपूर्ती

### सहकारी संस्थांची सक्षमीकरणाकडे वाटचाल

### मोबाईलमुळे संस्थांचे कामकाज गतिमान

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १४ ऑक्टोबर-**
दिवसेंदिवस बँक व्यवहारात मोबाईल व डिजिटल सेवांचा वापर वाढत आहे. यामुळे विविध क्षेत्रात राज्यात आघाडीवर असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने विविध ऑनलाईन बँकींग व डिजीटल बँकींगमध्ये पुढचे पाऊल टाकले आहे. बँकेचे सभासद असलेल्या सहकारी संस्थांनाही या सेवांमध्ये सहभाग वाढवून प्रोत्साहन देण्यासाठी बँकेने संस्थांना मोबाईल भेट देण्याचा निर्णय घेतला. वार्षिक सर्वसाधारण सभेत घेतलेल्या या निर्णयाची महिन्याच्या आत वचनपूर्ती केली असून संस्थांना दसऱ्याच्या महुर्तावर मोबाईल वाटप सुरू केले आहे. यामुळे सहकारी संस्थांची सक्षमीकरणाकडे वाटचाल सुरू झाली असून संस्थांचे कामकाज मोबाईलमुळे गतीमान होणार आहे.

पहिल्या टप्प्यात गाव पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सरकारी संस्थांना मोबाईलचे वाटप करण्यात येत आहे. दसऱ्यानिमित्त लातूर, रेणापूर, उदगीर व देवणी तालुक्यांतील संस्थांना शनिवारी (दि. १२) मोबाईल वाटप केल्यानंतर सोम वारी (दि. १४) औसा, चाकुर, शिरुर अनंतपाळ व अहमदपूर तालुक्यांतील संस्थांना मोबाईल वाटप केलेले आहेत. उर्वरित सर्वच सभासद सहकारी संस्थांना लवकरच मोबाईलचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष तथा लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख यांनी दिली. मोबाईलमुळे संस्थांचा संपर्क



वाढणार असून संस्थांचे विविध कामकाज मोबाईलवरूनही होणार आहे. राष्ट्रीयकृत बँकांच्या बरोबरीने जिल्हा बँकेने ग्राहक व सभासदांसाठी मोबाईल अॅप, डिजीटल व मोबाईल बँकींग, इंटरनेट बँकींग आदी सेवा व सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. काही दिवसापूर्वीच बँकेने युपीआय पेमेंटची सुविधा देत डिजीटल बँकींगमध्ये पुढचे पाऊल टाकले. यामुळे ग्राहक व सभासदांना बँकेत न येता खात्यावरील सर्व व्यवहार करता येत आहेत. या व्यवहारात सभासद संस्थांचा सहभाग वाढवा व या व्यवहारांसाठी संस्थांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने बँकेचे मार्गदर्शक माजीमंत्री तथा सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमख यांच्या सुचनेनुसार बँकेचे अध्यक्ष तथा लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाने सर्व सभासद संस्थांना अँड्राईड मोबाईल भेट देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार बँकेच्या १२ सप्टेंबर रोजी झालेल्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत माजीमंत्री सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांनी बँकेच्या सर्व प्रकारच्या सभासद संस्थांना अँड्रॉईड मोबाईल भेट देण्याचा निर्णय जाहिर केला. या निर्णयाची बँकेचे अध्यक्ष आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाने तातडीने निविदा काढून महिन्याच्या आत वचनपूर्ती केली असून मोबाईलचे प्रत्यक्षात वाटप सुरू केले आहे. पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांशी संबंधित विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांना मोबाईलचे वाटप करण्यात येत असून विजयादशमीपासून त्याची सुरुवात करण्यात आली आहे. उर्वरित सर्व सभासद संस्थांनाही लवकरच मोबाईलचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष आ. धीरज देशमुख यांनी दिली.

संस्थांचे कामकाज गतीमान होणार
जिल्हा बँकेने भेट दिलेल्या मोबाईलमुळे बँकेच्या ग्राहकांप्रमाणेच बँकेचे सर्व ऑनलाईन व बँकींग सेवा व सुविधांचा उपयोग संस्थांनाही करता येणार आहे. संस्थेची संबंधित माहितीची देवाणघेवाण व पत्रव्यवहार मोबाईलवरून करता येणार आहे. संस्थांसोबत तातडीने संपर्क होणार आहे. संस्थेच्या खात्यावरील व्यवहाराचा तपशील तातडीने उपलब्ध होण्यासोबत खात्यावरील बँक व्यवहाराचे मेसेजही म ोबाईलवर येणार आहेत. यामुळे संस्थेच्या कामकाजात गतीमानता येणार असल्याचे बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी सांगितले.

## १३ कोटींच्या रस्त्याचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. १४ ऑक्टोबर-**
चाकूर तालुक्यातील सुगाव येथे आ. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते १३ कोटी ३० लाखांच्या कामाचे भूमिपूजन सोहळा झाला. यामध्ये मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत सुगाव ते आष्टा १३ कोटी ३० लक्ष रूपये व सुगाव ते सावरगाव साठी ३० लक्ष रूपये आमदार बाबासाहेब पाटील यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आले आहेत. सुगाव हे माझे आवडते गाव असून माझ्या गावाला आजपर्यंत जे दिले आहे ते सुगावला देणार असून सुगावसाठी आजपर्यंत भरिव निधी दिला आहे व भविष्यातही मोठ्या प्रमाणात सुगावलाही निधी देण्यात येईल, असे प्रतिपादन आमदार पाटील यांनी केले.

मतदारसंघात आडीच हजार कोटींचा विकास निधी दिला आहे. सर्व मतदारांना विश्वासात घेऊन मतदार संघाच्या विकासासाठी अजित पवार यांच्या सोबत गेलो असून या अगोदरही घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवली आहे आणि आताही घड्याळ याच चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याचे आ. बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.तसेच शेतकऱ्यांच्या जिवनात अर्थीक परीवर्तन करायचे आहे.विकासासाठी सर्व मतभेद बाजूला ठेवून मतदार संघात विकास कामे केले आहेत. काही नेते फक्त निवडणूक आली की भेटायला येतात आणि चार वर्षे गायब राहतात मी फक्त निवडणूकी वेळीच येत नाही तर कायम तुमच्या सुख दुःखात सोबत असतो.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजीराव काळे होते. उपअभियंता डी.आर.मुकदम, कनिष्ठ अभियंता आर. जे. राठोड, माजी जिल्हा परिषद सदस्य दयानंद सुरवसे, यशवंत जाधव, बालाजी सूर्यवंशी, नगरसेवक मुज्जमिल सय्यद, गणपत नितळे, मार्शल माने, गणपत कवठे, विश्वनाथ एडके,अनिल वाडकर, विष्णू तिकटे, सुग्रीव काळे, भानुदास पोटे, राहुल सुरवसे, हाणमंत लवटे, सावता माळी आदी उपस्थित होते.

यावेळी संदीप शेटे, शिवशंकर हाळे, सरपंच शक्ती अर्जुने, मनोज पाटील, उपसरपंच हरिभाऊ काळे, सोपान मनाळे,नामदेव शिंगडे, शिवदीप निकम, व्यंकट पाटील, गणेश सिंदाळकर, पप्पू सावंत,इरशाद मुजावार,अमेर खुरेशी, नारायण काचे उपस्थित होते.

## प्रभावी कचरा व्यवस्थापन करुन शहर स्वच्छ बनवावे

### आ.अमित देशमुख यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १४ ऑक्टोबर-**
लातूर शहरातील कचरा व्यवस्थापनाचे कंत्राट महापालिकेने आता नवीन एजन्सी अशोका एंटरप्राइजेसला दिले आहे. कचरा व्यवस्थापन करण्यासाठी, कचरा घंटा गाडीची नोंद होण्यासाठी प्रत्येक दारासमोर क्युआर कोड स्कॅनर बसवण्यात येत असून माजी मंत्री आम दार अमित विलासराव देशमुख यांनी शहरातील सावेवाडी या ठिकाणी स्कॅन करून सदरील सुवीधेचा शुभारंभ केला. एजन्सीकडून नव्याने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमा बददल कौतूक करुन प्रभावी कचरा व्यवस्थापन करुन संपूर्ण शहर स्वच्छ सुंदर करण्याचे निर्देश त्यांनी याप्रसंगी दिले.

लातूर शहरातील सावेवाडी परीसरात म ाजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख तसेच खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उपस्थितीत लातूर शहर पालीकेच्या स्वच्छता



अभियाना अंतर्गत तयार करण्यात आलेल्या क्युआर कोड सुवीधेचा शुभारंभ करण्यात आला. शहरातील प्रत्येक घरासमोर क्युआर कोड स्टिकर लावण्यात येणार आहेत. या सुवीधेमुळे दररोज येणाऱ्या घंटागाडीची नोंद होणार आहे. यामुळे नागरीकांची गैरसोय दूर होऊन शहर स्वच्छ होण्यास मदत होणार आहे. या प्रसंगी बोलतांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी नव्या एजन्सीने अधिकची यंत्रणा लावून शहरात ठिकठिकाणी साचलेला कचरा उचलण्यात यावा असे असले तरी ही यंत्रणा अधिक गतिमान करावी, कोणत्याही परिस्थितीत घंटागाडी दररोज नियमित करावी, शहर स्वच्छ आणि सुंदर दिसण्यासाठी यापुढे कुठेही कचरा साचणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी नवीन एजन्सी व महापालिका प्रशासनाला दिल्या आहेत. मागच्या काही महिन्यापासून लातूर शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता. आमदार अमित देशमुख व महापालिका आयुक्त श्री बाबासाहेब मनोहरे यांच्याकडून मिळालेल्या सूचनेनुसार, लातूर शहरात ठीकठिकाणी साचलेला कचरा उचलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून त्यासाठी अतिरिक्त यंत्रणान लावण्यात आली आहे, येत्या काही दिवसात पूर्वी हे काम पूर्ण करून त्यानंतर अगदी शास्त्रशुद्ध पद्धतीने शहरातील कचरा व्यवस्थापन करण्यात येईल, घंटागाडीची नियमीतता तपासण्यासाठी शहरातील प्रत्येक घरासमोर क्युआर कोड स्कॅनीग स्टकर बसवण्यात येत आहेत. आता पर्यंत शहरातील १ लाख घरासम ोर हे स्टिकर बसवण्यात आले असून एक दोन दिवसात टप्प्याटप्प्याने सर्व क्युआर कोड ऑन लाईन स्टिस्टीमवर येतील त्या नंतर कोणत्या घरासमोर घंटगाडी गेली नाही हे लगेच लक्षात येणार आहे, असे स्वच्छता निरीक्षक रमाकांत पिडगे, बंडू किसवे यांनी यावेळी सांगीतले.

## नवरात्र उत्सवानिमित्त मल्लन्ना देव पालखी उत्सव



**वलांडी, दि. १४ ऑक्टोबर-**
महाराष्ट्रासह कर्नाटक आंध्र प्रदेश तेलंगणा येथील भाविकांची श्रद्धास्थान असलेल्या व दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भालकी तालुक्यातील खानापूर येथील मैलार मल्लांना खंडोबा यांचा नवरात्र महोत्सवानिमित्त विजयादशमीच्या दिवशी महाआरती होऊन पालखी सोहळा संपन्न झाला. या पालखी सोहळ्यात जिल्हा प्रभारी मंत्री ईश्वर खंडरे माजी मंत्री बंडपा खासिमपूर मत्स्य व्यवसाय महामंडळाचे अध्यक्षा मला डी. नारायणराव पंडित चिद्री बसवराज हेडे मंदिर व्यवस्थापन समि तीचे अध्यक्ष प्रकाश म्हेत्रे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंत कुलकर्णी व्यवस्थापक संजीव कुमार सुंदला मुख्य पुजारी बसप्पा हिरीवगे आकाश हिरीवगे प्रकाश हिरीवगे, मल्लिकार्जुन हिरीवगे यांच्यासह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पानगावच्या विठ्ठल मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचे भूमिपूजन

### मंदिर परिसर विकासासाठी आणखी पाच कोटी रुपये मिळून देण्याची आ. रमेश कराड यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**रेणापूर, दि. १४ ऑक्टोबर-**
प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या पानगाव येथील पुरातन विठ्ठल मंदिराच्या दुरुस्ती आणि वास्तु जतन कामासाठी पुरातन विभागाकडून मंजूर झालेल्या ९ कोटी ३४ लक्ष रुपये खर्चाच्या कामाचा भूमिपूजन भाजपाचे नेते आ रमेश कराड यांच्या हस्ते रविवारी सकाळी झाला या मंदिर परिसराच्या विकासासाठी आणखी पाच कोटी रुपयांचा निधी मिळवून देऊ अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

रेणापूर तालुक्यातील मुझे पानगाव येथे आ. रमेश कराड यांच्या माध्यमातून विविध विभागाअंतर्गत मंजूर झालेल्या विठ्ठल मंदिर जिर्णोद्धार कामासह १२ कोटी १६ लक्ष रुपये खर्चाच्या विविध कामाचा लोकार्पण आणि भूमिपूजन सोहळा भाजपाचे नेते आ रमेश कराड यांच्या हस्ते पार पडला. आ कराड यांचे ग्रामस्थांकडून जीसीबीतून फुलांची उधळ करत स्वागत करण्यात आले ठीक ठिकाणी महिला भजनी मंडळ आराधी मंडळ यांच्यासह लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांनी औक्षण करून स्वागत केले. यावेळी भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, संगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, माजी उपसभापती अनंत चव्हाण, माजी सरपंच सुकेश भंडारे, ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव अनामेमामा, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी, चंद्रकांत आरडले, भाजपा शहराध्यक्ष गणेश तूरूप, श्रीकृष्ण जाधव, अमर चव्हाण, ललिता कांबळे, शीला आचार्य, सरपंच मीनाताई मोटाडे, उपसरपंच प्रेमीला वाघमारे, चेअरमन गणेश वांगे यांच्यासह अनेकांची



प्रमुख उपस्थिती होती.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी जेव्हापासून लातूर ग्रामीणची जबाबदारी माझ्या खांद्यावर दिली तेव्हापासून प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. कराड म्हणाले की, पानगावच्या विठ्ठल मंदिरासह मतदार संघातील साडेतीनशे मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे भाग्य आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे मला मिळाले. पानगावच्या विठ्ठल मंदिराला साडेनऊ कोटी रुपये निधी मिळेल असे पानगावकरांनाही वाटले नव्हते मात्र आज या कामाचे भूमिपूजन झाले. निश्चितपणे अत्यंत दर्जेदार काम होऊन हे मंदिर लवकरच नव्या रूपात भाविक भक्तांना पाहायला मिळेल. या मंदिराच्या परिसर विकासासाठी येत्या काळात आणखी पाच कोटी रुपयांचा निधी मिळून देऊ त्याचबरोबर मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना बांधकामाकरिता ५० लाख आणि अस्थी परिसर विकासासाठी निधी देणार असल्याचे सांगून पानगावच्या ग्रामीण रुग्णालयाचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे कदाचित आचारसंहितेपूर्वी मंजुरी मिळेल असे त्यांनी बोलून दाखविले. प्रास्ताविक ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी म्हणाले की आ. रमेश कराड यांनी केले. सूत्रसंचालन बाबुराव कस्तुरे यांनी केले तर शेवटी सुकेश भंडारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी वामनराव संपत्ते, भागवत गीते, गेटू आप्पा हलकुडे, शिवाजीराव जाधव, लक्ष्मण भंडारे, गोपाळ शेंडगे, नाथराव गीते, सुरेश बुड्डे, रामभाऊ भंडारे, मारुती गालफाडे, नागनाथ फुले, सुरेंद्र हरिदास, दत्ता आंबेकर, भागवत बनसोडे, बंडू केंद्रे, रमाकांत लहाने, बालाजी बच्चेवार, बालाजी केंद्रे, योगीराज शिरसाट, गोविंद हरिदास, शफीक पठाण रमाकांत वाघमारे इस्माईल मणियार वैजनाथ मोटाडे, हरिकृष्ण गुरले, राणी मोटाडे, शिवकन्या गंनगने, इलाई शेख, वैजनाथ मोटाडे, राहुल मोटाडे, सतीश भंडारे, दिगंबर येडले उपस्थित होते.